



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह






धाराशिव | रविवार, २० सप्टेंबर २०२६ | वर्ष ४ थे अंक १९१ | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com





## विचारपुष्प



एका व्यक्तीच्या शहाणपणापेक्षा सामुदायिक शहाणपण हे केव्हाही श्रेष्ठ असते. सर्वांनी एकत्र बसून, चिंतन करून जो निर्णय घेतला जातो तो निर्णय सर्वांच्या मालकीचा असतो आणि सर्व जण आपला निर्णय म्हणून तो स्वीकारतात.

**- पद्मविभूषण स्व. पी. परमेश्वरन्**
संस्थापक, भारतीय विचार केंद्र, पूर्व अध्यक्ष विवेकानंद केंद्र

# शासन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार

### | मुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही | राज्यात अनेक जिल्ह्यांत दुष्काळी स्थिती



**नागपूर, १९ सप्टेंबर**

पावसात खंड पडल्यामुळे राज्यात अनेक जिल्ह्यांत दुष्काळी स्थिती आहे. कमी पावसामुळे मोठ्या प्रमाणात पिके खराब होत आहेत. दुष्काळी परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली.

विविध विकास योजनांचा आढावा घेण्यासाठी नागपुरातील रामगिरी या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी बैठक घेण्यात आली. त्याप्रसंगी ते पत्रकारांशी बोलत होते. ते पुढे म्हणाले, एल निनोचे संकट येणार असल्याचे माहिती असल्यामुळे आधीपासूनच नियोजन अन् काही उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. दुष्काळी स्थितीत अनेक ठिकाणी पिकाचा उतारा कमी येईल, अशी परिस्थिती तयार झालेली आहे. या सगळ्या गोष्टींचा आढावा घेण्यात येत आहे. मंत्रिमंडळ बैठकीत सर्वच मंत्र्यांनी यावर चर्चा करून आपापल्या जिल्ह्यांत मूल्यमापन करण्याबाबत सांगण्यात आले आहे. पुढील आठवड्यात आम्ही प्राथमिक आढावा घेणार आहे.

त्यानंतर पंचनामे झाल्यानंतर तातडीची मदत केली जाणार आहे. मुख्यतः शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे काम सुरू असून, तीन याद्या तयार करण्यात आल्या आहेत. उर्वरित याद्या वेगाने पूर्ण कराव्यात, असा आदेश दिला आहे. पिण्याचे पाणी, चाऱ्याची व्यवस्था तसेच शेतकऱ्यांना तातडीची मदत करणे गरजेचे झाले आहे. एल निनोचे संकट येणार असल्यामुळे चाऱ्याची लागवड करून ठेवलेली आहे. जिथे चाऱ्याची टंचाई जाणवेल, तिथे पुरवठा केला जाईल. याशिवाय शेतकऱ्यांना अतिरिक्त वीज मिळावी, याचीही तजवीज केलेली आहे. काही ठिकाणी सिंगल फेज असल्यामुळे वीज दिली जात नव्हती; पण, आता तिथेही वीज देण्यासंदर्भात निर्देश देण्यात आला आहे. (तभा वृत्तसेवा)

### सरकारच्या वतीनेही मदत

विरोधकांच्या काळातही तेच 'जीआर' होते. 'जीआर'प्रमाणे कधी काय करावे, याचेही नियम आहेत. त्या नियमांचे पालन केले, तरच 'एनडीआरएफ'चे पैसे मिळतात. एकीकडे आपण त्या नियमांचे पालन करत आहोत, दुसरीकडे राज्य सरकारच्या वतीनेही न थांबता आपण मदत करत आहोत, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### मोठ्या धरणांमध्ये पाणी उपलब्ध

दरम्यान, राज्यातील मोठ्या धरणांमध्ये सुदैवाने मुबलक पाणी आहे. परंतु, मराठवाड्यातील छोट्या धरणांमध्ये पाणी कमी आहे. अशा भागांत पिण्याच्या पाण्याचे संकट येऊ नये, म्हणून पाणी राखून ठेवावे लागते. मोठ्या धरणांतही आपण पाणी राखून ठेवलेले आहे. पुढील अंदाज येईपर्यंत राखून ठेवलेले पाणी पिण्यासाठी वापरले जाईल.

### पंचनामे करून केंद्राला प्रस्ताव पाठविणार

केंद्राकडे मागणी करण्याची जी पद्धत आहेत, त्यात ५ ऑक्टोबरनंतरचे पंचनामे, या आधारावर प्रस्ताव द्यावा लागेल. तोपर्यंत आपण आपली प्रक्रिया करत आहोत. जेणेकरून, पंचनामे करून केंद्राला प्रस्ताव पाठवला जाईल. ज्या ठिकाणी पाणी आहे, त्या ठिकाणी रब्बीचे नियोजन आपण करणार आहोत, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



उत्तरप्रदेशातील मेरठ येथे झालेल्या 'एअर शो'दरम्यान भारतीय वायुदलाच्या 'सूर्यकिरण ॲरोबॅटिक टीम'ने चित्तथारक प्रात्यक्षिक सादर केले

# सौदी अराम्कोकडून तेल पुरवठा खंडित

### | हुथींच्या हल्ल्यात पाईपलाईन उद्ध्वस्त झाल्याने निर्णय | युरोपियन देशांचाही पुरवठा थांबवला

**रियाध, १९ सप्टेंबर**

येमेनमधील इराण-समर्थित हुथी बंडखोरांनी सौदी अरबच्या तेल वाहतूक करणाऱ्या महत्त्वाच्या पूर्व-पश्चिम पाईपलाईनवर केलेल्या ड्रोन हल्ल्यांचे गंभीर परिणाम आता भारतासह युरोपियन देशांना भोगावे लागणार आहे. सौदी अरबची प्रमुख तेल कंपनी सौदी अराम्कोने भारतासह युरोपियन देशांचा ऑक्टोबर महिन्यापासून तेलपुरवठा खंडित करण्याचा निर्णय घेतला आहे. हुथींच्या ड्रोन हल्ल्यात १२०० किमी पाईपलाईनचे नुकसान झाल्याने तेलाचा पुरवठा करणे शक्य होणार नसल्याचे सौदी अराम्कोने निवेदनात म्हटले आहे.

आखाती देशातील सौदी हा प्रमुख तेल निर्यात देश असून, भारतासह युरोपियन देशांना पूर्व-पश्चिम पाईपलाईनच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात तेल पुरवठा केला जातो. मात्र, हुथीच्या हल्ल्यात पाईपलाईन आणि तेल उत्पादन प्रकल्प उद्ध्वस्त झाल्याने सौदीच्या अडचणी वाढल्या.

तेल उत्पादन आणि पुरवठा करणे शक्य होत नसल्याने त्यांनी आयातदार देशांना ऑक्टोबरपासून तेलाचा पुरवठा करणार नसल्याचे कळवले आहे. यात भारत आणि युरोपियन देशांचा समावेश आहे. या निर्णयामुळे भारतीय तेलशुद्धीकरण कंपन्यांना इतर स्त्रोतांकडून महागात कच्चे तेल खरेदी करावे लागणार असल्याने आर्थिक भार वाढण्याची शक्यता आहे.

सौदी अराम्कोची पाईपलाईन पूर्वेकडील भागातील तेल लाल समुद्रापर्यंत पोहोचवते. येथून तेल इतर देशांमध्ये पाठवले जाते. दुरुस्तीसाठी तीन महिन्यांचा कालावधी लागणार असल्याने संबंधित देशांनी पर्यायी व्यवस्था करावी असेही अराम्कोने म्हटले आहे. या पाईपलाईनमधून दररोज ४० ते ५० लाख बॅरल कच्चे तेल वाहून नेण्याची क्षमता आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या हल्ल्यात तेल वाहून नेणाऱ्या तीन पाईपलाईन आणि पंपिंग स्टेशन्स नुकसान झाले आहेत. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### नौदल अकादमीतून बांगलादेशीला अटक

**तिरुवनंतपुरम :** बनावट कागदपत्रांच्या आधारे भारतीय नागरिक असल्याचे भासवून केरळममधील एझिमाला नौदल अकादमीत काम करणाऱ्या बांगलादेशी नागरिकाला अटक करण्यात आली आहे. बिप्लब सोरेन, असे आरोपीचे नाव आहे. तो अकादमीच्या लॉन्ड्री विभागात कंत्राटी कर्मचारी म्हणून काम करत होता. नौदल अधिकाऱ्यांनी शुक्रवारी रात्री ८:१५ वाजता त्याची चौकशी केली. त्याच्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार, तो वैध कागदपत्रांशिवाय भारतात राहत होता. नौदल अधिकाऱ्यांना बिप्लबच्या वर्तनावर संशय आला होता. त्यानंतर त्याच्यावर नजर ठेवण्यात आली. त्यानंतर त्याला ताब्यात घेण्यात आले. तपासादरम्यान त्याच्या मोबाईलमधून अशी कागदपत्रे आणि माहिती मिळाली, ज्यावरून तो बांगलादेशी नागरिक असल्याचे संकेत मिळाले. त्यानंतर नौदल अधिकाऱ्यांनी त्याची चौकशी करत कागदपत्रांची पडताळणी केली. तो अकादमीत कधीपासून काम करत होता, याचीही अधिकारी चौकशी करत आहेत.

# विश्वजित कोवासेंना अटक

### माजी खासदार मारोतराव कोवासे फरार

**गडचिरोली, १९ सप्टेंबर**

धानोरा तालुक्यातील जपतलाई येथील आश्रमशाळेत सर्पदंशाच्या घटनेत तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याप्रकरणी महिनाभरापासून फरार असलेले आश्रमशाळेचे सचिव तथा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष विश्वजित कोवासे यांना पोलिसांनी अखेर अटक केली. आज त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

या प्रकरणात आश्रमशाळेचे संस्थाचालक व माजी खासदार मारोतराव कोवासे तसेच महिला अधीक्षक भाग्यश्री चिलमवार अद्याप फरार असल्याची माहिती आहे. तिघांनीही अटकपूर्व जामिनासाठी प्रयत्न केल्याची माहिती यापूर्वी पुढे आली होती. दरम्यान, मारोतराव कोवासे यांची प्रकृती ठीक नसल्याने त्यांना धानोरा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, या चर्चेला अधिकृत दुजोरा मिळाला नाही. (तभा वृत्तसेवा)



जपानमधील नागोया येथे शनिवारी २० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेच्या नयनरम्य उद्घाटन सोहळ्यादरम्यान स्पर्धेचा शुभंकर 'होनोहोन' सह आपली कला सादर करताना कलावंत

# बाप्पाच्या विसर्जनाला राज्यात बरसणार!

**मुंबई :** गणरायाच्या विसर्जनाची लगबग सुरू असतानाच राज्याच्या विविध भागांत पुन्हा पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. मुंबईसह कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही भागांत आगामी दिवसांत पावसाच्या सरी पडण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे बाप्पाला निरोप देताना भाविकांना पावसाची साथ मिळण्याची शक्यता आहे.

मुंबईत २० सप्टेंबरला हलका पाऊस, तर २१ आणि २२ सप्टेंबरला काही ठिकाणी पाऊस किंवा मेघगर्जनेसह सरी पडण्याची शक्यता आहे. बदलत्या हवामानामुळे विसर्जन मिरवणुकांवर पावसाचे सावट कायम आहे. कोकण-गोवा भागात २१ आणि २२ सप्टेंबरला मुसळधार पावसाची शक्यता असून, मध्य महाराष्ट्रातही २० ते २२ सप्टेंबरदरम्यान जोरदार तर मराठवाड्यात १९ ते २२ सप्टेंबरदरम्यान काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस होण्याची शक्यता आहे. (तभा वृत्तसेवा)

### 'पर्यावरण संरक्षणात भारत मार्गदर्शक'

**नवी दिल्ली, १९ सप्टेंबर**

पर्यावरण आणि निसर्गाप्रती भारताची वचनबद्धता दीर्घकाळापासूनची आहे आणि याच वचनबद्धतेच्या आधारावर देश सध्याच्या पर्यावरणीय आव्हानांना सामोरे जात आहे. गेल्या १२ वर्षांत भारताने पर्यावरणाशी संबंधित जवळपास प्रत्येक क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. देशाचा मुख्य भर नवीकरणीय ऊर्जेवर आहे, ज्याने पर्यावरण संरक्षणात मोठी भूमिका बजावली. आज भारत पर्यावरण संरक्षणासाठी जगाचा मार्गदर्शक बनला आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी केले.

सौर ऊर्जा, पीएम सूर्य घर योजना, हायड्रोजन ट्रेनने कार्बन उत्सर्जन नियंत्रणात आणण्याचा मार्ग भारताने दाखवला, असे राजधानी दिल्लीत राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने आयोजित केलेल्या 'पर्यावरण आणि हवामान बदलाचे भविष्य' या आंतरराष्ट्रीय परिषदेला संबोधित करताना ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

# दिल्ली विद्यापीठ निवडणुकीत अभाविपची बाजी

### तीन जागांवर विजय, उपाध्यक्षपदाची माळ अपक्षाच्या गळ्यात

**नवी दिल्ली, १९ सप्टेंबर**

दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थी संघाच्या निवडणुकीचे निकाल शनिवारी जाहीर झाले.या निकालात अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने चार पैकी तीन महत्त्वाच्या पदांवर विजय मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले, तर एनएसयूआयला दारुण पराभव पत्करावा लागला.अध्यक्षपदावर अभाविपचे यश डबास तर उपाध्यक्षपदी अपक्ष उमेदवार दीपांशू शौकीन विजयी झाले. सचिव आणि सहसचिवपदी अभाविपच्या उमेदवारांनी बाजी मारली.

दिल्ली विद्यापीठाच्या विद्यार्थी संघाच्या निवडणुकीसाठी १७ सप्टेंबरला मतदान झाले होते. मतदानाची टक्केवारी ४०.४६ टक्के होती. शनिवारी दिल्ली विद्यापीठाच्या स्पोर्टस स्टेडियममधील मल्टीपर्पज हॉलमध्ये मतमोजणी झाली. प्रमुख चार पदांचे निकाल जाहीर झाले असून, अभाविपने तीन पदांवर विजय मिळवला तर एका जागेवर अपक्षाने बाजी मारली. या निवडणुकीत प्रमुख लढत अभाविप आणि एनएसयूआय यांच्यात झाली. सचिव पदावर अभाविपच्या रिया छावडी विजयी झाल्या.त्यांना २१,६५० मते मिळाली. सहसचिव पदावर अभाविपच्या लक्ष्य राज सिंह यांनी विजय मिळवला.



दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याजवळ जल्लोष करताना अभाविपचे विजयी उमेदवारी

**यशने केला विजय मीणाचा पराभव**

अध्यक्षपदासाठी अभाविपचे यश डबास आणि एनएसयूआयचे विजय मीणा यांच्यात प्रमुख लढत झाली. अभाविपच्या यश डबास यांना २४,५७६ मते, तर एनएसयूआयच्या विजय शंकर मीणा यांना २२,५२३ मते मिळाली. अनन्या रतुड़ी यांना ५,३७७, समीर कुमार १,०१५, अश्मित कुमार १,३८८, एजाज मन्सुरी ८३७ आणि समर्थ बेनिवालला ८१९ मते मिळाली. ४,३१० मतदारांनी नोटाचा वापर केला. (वृत्तसंस्था)

### दीपांशूला उमेदवारी नाकारणे एनएसयूआयला भोवले

उपाध्यक्षपदी अपक्ष उमेदवार दीपांशू शौकीन यांनी विजय मिळवत सर्वांनाच आश्चर्यचकीत केले. दीपांशूला ३०,६१५ मते मिळाली. इशु मौर्यला १६,९१० तर वीर छत्रथला ४,३१३ मते मिळाली. अरन्या सिंह राठोडला २,२७४ आणि अक्षत शिखरला २,३८३ मते मिळाली. तर ४,३५९ मतदारांनी नोटाचा वापर केला.विशेष म्हणजे, दीपांशू मूळचे एनएसयूआयचे असून त्यांना उमेदवारी नाकारल्यामुळे ते अपक्ष म्हणून रिंगणात उतरले होते.

# बाप्पा पावला, पाऊस बरसला...

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ सप्टेंबर-**

गेल्या दीड महिन्यांपासून पावसासाठी चातकाप्रमाणे वाट बसलेल्या शेतकऱ्यांच्या दृष्टीने शनिवार, दि.१९ सप्टेंबर २०२६ हा दिवस जणू 'बाप्पा पावला, पाऊस बरसला...' असा ठरला. शनिवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास वरुणराजाच्या बरसण्यास प्रारंभ झाला. ढगांच्या गडगडाटासह जवळपास अर्धातास चांगला पाऊस पडला.

रविवार, दि.१३ ते शनिवार, दि.२६ सप्टेंबर २०२६ अस उत्तरा नक्षत्राच्या पावसाचा कालावधी असून या नक्षत्राचे वाहन मेंढा आहे. हा पाऊस शेती व हवामानच्या अनुषंगाने महत्वपूर्ण मानले जाते.

सोलापूर जिल्ह्यात जुलै महिन्यात चांगला पाऊस पडला होता. परिणामी खरिपाच्या पेरण्या मोठ्या प्रमाणात करण्यात आल्या. पुणे जिल्ह्यातील जोरदार पावसानेही उजनी धरण १०० टक्के भरले. जिल्ह्यातील काही मध्यम व लघु प्रकल्पातही बऱ्यापैकी जलसाठा निर्माण झाला होता.

मात्र, ऑगस्टचा महिना व सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात पावसाने पाठ फिरविल्याने पिके करपून चालली. दरम्यान, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या अनुकूल परिस्थितीमुळे महाराष्ट्रात



पावसाचे पुनरागमन होईल, असा अंदाज हवामान खात्याने दोन दिवसापुर्वी व्यक्त केला होता.

शनिवारी सैफुल, आसरा चौक, होटगी रोड, नीलमनगर, जुना विडी घरकुल, दत्त नगर, दाजी पेठ, साखर पेठ, घोंगडे वस्ती, अशोक चौक, कोंतम चौक, एसटी स्टॅन्ड परिसर, बुधवार पेठ यांसह शहरातील अन्य भागातही जोरदार पाऊस पडला. दरम्यान, ग्रामीण भागातील गावांमध्येही काही वेळ रिमझिम पाऊस बरसल्याचे सांगण्यात आले.



राज्यातील शेतकरी अडचणीत आहेत. शेतकऱ्यांना नक्कीच शासनातर्फे सहकार्य केले जाईल. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. चारा-छावण्याबाबतही विचार केला जाईल, पशुधन आणि दुग्ध व्यवसायाचा निर्णय दिवाळीच्या आसपास घेतला जाईल.
- **दत्तात्रय भरणे**, कृषिमंत्री


# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.tarunbharat.net
रविवार २० सप्टेंबर २०२६





आम्ही हिंदीसह कोणत्याही भाषेच्या विरोधात नाही. केवळ ती लादली जाण्याला विरोध आहे. आम्ही एक वेगळे राज्य म्हणून वागत नाही. आमची स्वतःची एक वेगळी ओळख आहे.
- **उदयनिधी स्टॅलिन**, तामिळनाडू विधानसभा, विरोधी पक्षनेते



आसामच्या गुवाहाटीजवळील खामरेंगा येथे अन्नाच्या शोधात फिरत असलेला रानटी हत्तींचा कळप

# अमेरिका अडकला इराणच्या सापळ्यात

## पेंटॅगॉनच्या अहवालातून 'ऑपरेशन एपिक फ्युरी'चे वास्तव समोर

**संघर्षात ४३.६ अब्ज डॉलर्सचा चुराडा**

**अत्याधुनिक क्षेपणास्त्रे-ड्रोनची टंचाई**

**वॉशिंग्टन, १९ सप्टेंबर**

जगाच्या नकाशावरून इराणचे नाव कायमस्वरूपी नष्ट करून, तेथील सत्ताधाऱ्यांना काही तासांमध्ये चिरडून टाकू, अशा आविर्भावात अमेरिकेच्या नेतृत्वाने २८ फेब्रुवारी रोजी 'ऑपरेशन एपिक फ्युरी' मोहीम राबवत भीषण हल्ला केला. मात्र गेल्या आठ महिन्यांहून अधिक काळ लोटला असताना अमेरिकेला त्यात यश आले नाही, उलट अमेरिकन सैन्यच इराणच्या सापळ्यात अकडले असताना, पेंटॅगॉनने (अमेरिकेच्या संरक्षण विभागाचे मुख्यालय) अमेरिकन काँग्रेसला सादर केलेल्या एका अहवालाने धक्कादायक माहिती समोर आली आहे.

इराणविरुद्ध संघर्षात अमेरिकेचा खर्च ४३.६ अब्ज डॉलर्सवर (अंदाजे ३.२० लाख कोटी )पोहोचण्याची शक्यता वर्तवण्यात आली. याशिवाय युद्धामुळे शस्त्रास्त्रांची टंचाई निर्माण झाल्याची माहिती अहवालातून देण्यात आली. संघर्षाच्या तीव्रतेनुसार दरमहा सुमारे तीन अब्ज डॉलर्सचा खर्च वाढत राहणार आहे. अमेरिकन सैन्याकडून महागड्या दारुगोळ्याचा वापर सुरूच आहे. शस्त्रास्त्रांवरील खर्च सहा अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त वाढला. काँग्रेसला सादर केलेल्या अहवालामध्ये युद्धनौका, विमाने आणि तळ चालवण्याचा खर्च, तसेच उपकरणांचे नुकसान आणि सैनिकांना दिलेल्या वैद्यकीय मदत खर्च समाविष्ट आहे. जीवितहानीमध्ये १८ सैनिकांचा मृत्यू आणि ८३० हून अधिक जखमी असल्याचेही पेंटॅगॉनने म्हटले आहे. इराणच्या हल्ल्यांमुळे कुवेत, बहरीन, कतार, संयुक्त अरब अमिराती, सौदी अरब, इराक, ओमान आणि जॉर्डनमधील अमेरिकी तळांवरील शेकडो इमारती आणि इतर वास्तूंचे नुकसान झाल्याचाही उल्लेख आहे.

**राखीव साठ्यात तुटवडा**

संरक्षण मंत्री पीट हेगसेथ यांनी काँग्रेसकडे ६७ अब्ज डॉलर्सच्या अतिरिक्त निधीची मागणी करताना स्पष्ट केले की, अतिरिक्त निधीशिवाय पेंटॅगॉनला गंभीर तुटवड्याचा सामना करावा लागू शकतो. अशातच इराण युद्धामुळे अमेरिकेचा केवळ दारुगोळाच खर्च झाला नाही, तर आणिबाणीच्या काळात राखीव साठ्यात तुटवडा आला आहे.

संरक्षण क्षेत्रातील उत्पादन क्षमता वाढवण्यासाठी प्रदीर्घ कालावधी लागतो, या वास्तवावरही पेंटॅगॉनच्या अहवालातून बोट ठेवण्यात आले आहे. ◂ (वृत्तसंस्था)



### आखातातील लष्करी सुविधांच्या पुनर्बांधणीचे आव्हान

पेंटॅगॉनच्या अहवालात स्पष्ट करण्यात आले की, इराणच्या हल्ल्यांमुळे आखाती देशातील अमेरिकन तळांवरील शेकडो इमारती आणि संरचनांचे नुकसान झाले किंवा त्या नष्ट झाल्या. नुकसानीमध्ये सुविधांच्या दुरुस्तीचा खर्च यात समाविष्ट केलेला नाही. कारण याच्या पुनर्बांधणीबाबत पेंटॅगॉनने कोणताही निर्णय घेतलेला नाही. मात्र, नष्ट झालेल्या सुविधा पुन्हा उभारण्यासाठी अब्जावधी डॉलर्सचा खर्च करावा लागणार आहे. ■

### ३.७ अब्ज डॉलर्सच्या उपकरणांचे नुकसान

पेंटॅगॉनच्या महानिरीक्षकांनी घेतलेल्या आढाव्यानुसार, २९ जूनपर्यंतच्या संघर्षात २२.३ अब्ज डॉलर्सचा दारूगोळा वापर, लष्करी मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी ७.४ अब्ज डॉलर्सचा अतिरिक्त खर्च आणि ३.७ अब्ज डॉलर्सच्या उपकरणांचे नुकसान यांचा समावेश आहे. डझनभर विमाने आणि ड्रोनचे नुकसान झाले आहे. युद्धात इराणची मोठी हानी झाली आहे. मात्र, युद्ध सुरु ठेवण्याची क्षमता त्यांच्याकडे अजूनही कायम असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले. ■

### काश्मिरात जमीन घोटाळा; एकाला अटक

**श्रीनगर, १९ सप्टेंबर**

काश्मीर गुन्हे शाखेच्या आर्थिक गुन्हे शाखेने ९३ लाख रुपयांच्या जमीन आणि मालमत्ता घोटाळा प्रकरणात बडगाममधील रहिवासी गुलाम मोहिउद्दीन दारला ताब्यात घेण्यात आले आहे.

श्रीनगरच्या न्यायालयाने जारी केलेल्या आदेश आणि वॉरंटच्या अनुपालनात ही अटक करण्यात आली. आरोपी अनेक वर्षभरापासून अटकेपासून पळ काढत होता. तो अनेक गुन्हेगारी प्रकरणांमध्ये सामील आहे. हे फसवणुकीचे प्रकरण एका लेखी तक्रारीशी संबंधित आहे.दार व कर्नाटकचा रहिवासी सह-आरोपी सूम नाथ कौल या दोघांनी संगनमताने पीडित व्यक्तीची ९३ लाख रुपयांची फसवणूक केली आहे. आरोपींनी बनावट करारांचा वापर करून जमीन विकण्याचा प्रस्ताव दिला होता. ◂ (वृत्तसंस्था)

# रशियात संसदीय निवडणूक, पुतिन यांचा विजय निश्चित

### युक्रेनचा दावा असलेल्या भागात मतदान

### युद्धाला विरोध करणारा पक्ष निवडणुकीतून बाहेर

**मॉस्को, १९ सप्टेंबर**

रशियात शुक्रवारपासून तीन दिवसांची संसदीय निवडणूक सुरू झाली आहे. युक्रेन युद्धाचा उघडपणे विरोध करणारा याब्लोको पक्ष निवडणुकीतून बाहेर पडल्याने राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्या युनायटेड रशिया पक्षाचे संसदेत वर्चस्व कायम राहण्याची आणि त्यांचा निवडणुकीत बहुमताने विजय होणे निश्चित मानले जात आहे. रशियाच्या ताब्यात असलेल्या युक्रेनच्या भागांमध्येही मतदान होत आहे. युक्रेन आणि युरोपीय संघाने तेथे होत असलेले मतदान बेकायदेशीर ठरवले आहे.

२०२२ मध्ये युक्रेनवर रशियाने केलेल्या लष्करी हल्ल्यानंतरची ही पहिली संसदीय निवडणूक आहे. क्रेमलिनसाठी ही निवडणूक केवळ संसदेचे सदस्य निवडण्यापुरती मर्यादित नाही. पुतिन यांची इच्छा आहे की मोठ्या संख्येने लोकांनी मतदान करावे, जेणेकरून युक्रेनमधील युद्धाच्या पृष्ठभूमीवरही जनता सरकार आणि रशियन सैनिकांच्या पाठीशी उभी आहे, असा संदेश जाईल. पुतिन यांनी शुक्रवारी ऑनलाईन मतदान केले. निवडणुकीपूर्वी त्यांनी म्हटले की, जनतेचा निर्णय हे दाखवून देईल की लाखो लोक रशियन सैनिकांच्या पाठीशी उभे आहेत आणि देश एकसंध आहे.

रशियाच्या स्टेट ड्युमामधील २२५ जागांसाठी लोक राजकीय पक्षांना मतदान करतील, तर उर्वरित २२५ जागांसाठी वेगवेगळ्या भागांतून उभ्या राहिलेल्या उमेदवारांपैकी एकाची निवड करतील. युनायटेड रशियाव्यतिरिक्त कम्युनिस्ट पार्टी, एलडीपीआर, ए जस्ट रशिया आणि न्यू पीपल यासारखे पक्षही निवडणूक लढवत आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'रामायण'चा इंग्रजी वर्जन असणार छोटा

**मुंबई** : रणबीर कपूर, यश आणि साई पल्लवी अभिनीत 'रामायण : भाग १' च्या प्रदर्शनाची सर्वच जण आतुरतेने वाट पाहत आहेत. ट्रेलर आणि 'जय जय राम' या गाण्याने प्रेक्षकांचे लक्ष वेधले आहे. मात्र 'रामायण : भाग १' ची इंग्रजी आवृत्ती हिंदी आवृत्तीपेक्षा अंदाजे ३० मिनिटांनी लहान असेल. इतकेच नाही, तर आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांना लक्षात घेऊन या आवृत्तीत गाणी नसतील आणि काही दृश्येही लहान केली जातील. निर्मात्यांनी आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांना डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेतला आहे. भारतीय प्रेक्षकांना तीन तास किंवा त्याहून अधिक लांबीचे चित्रपट आणि गाणी सहज समजतात, परंतु जगभरातील प्रेक्षकांच्या बाबतीत असे असेलच असे नाही. याच कारणामुळे, चित्रपटाची आंतरराष्ट्रीय आवृत्ती थोड्या वेगळ्या पद्धतीने तयार करण्यात आली आहे. ■




### ललित मोदीवर तयार होणार बायोपिक



**मुंबई** : इंडियन प्रीमियर लीगचे संस्थापक ललित मोदी यांच्या जीवनावर चित्रपट तयार होणार आहे. या बायोपिकची निर्मिती साजिद नाडियाडवाला त्यांच्या नाडियाडवाला ग्रँडसन एंटरटेनमेंट या बॅनरअंतर्गत करणार आहेत. चित्रपटाची पटकथा लिहिण्याचे काम माजी टीव्ही कार्यकारी आणि निर्मात्या स्नेहा रजनी करत आहेत. हा चित्रपट ललित मोदी यांचे सुरुवातीचे आयुष्य, आयपीएलची सुरुवात, त्यांचे यश आणि त्यानंतर निर्माण झालेल्या वादांवर आधारित असेल. काही काळापूर्वी रणवीरसिंहने ललित यांची भूमिका साकारण्यात रस दाखवला होता. एका मुलाखतीत ललित मोदी यांनीही रणवीरला आपली भूमिका साकारायची असल्याचे स्पष्ट केले होते. ललित मागील सुमारे १६ वर्षांपासून लंडनमध्ये राहत आहेत. निर्मात्यांना या बायोपिकमध्ये ललित मोदींच्या केवळ ठळक बातम्या आणि वादांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी त्यांच्या वैयक्तिक आयुष्याचे आणि कारकीर्दीतील विविध पैलू दाखवायचे आहेत. ■





उत्तराखंडातील ऋषीकेश येथील नीम बीचजवळ एक व्यक्ती बेपत्ता झाल्यानंतर राज्य आपती प्रतिसाद दलाच्या जवानांनी गंगा नदीत शोधमोहीम राबवली

### पत्नीसह तीन मुलांची हत्या

**दमोह, १९ सप्टेंबर**

कौटुंबिक वादातून एका तरुणाने पत्नी व तीन निष्पाप मुलांची कुऱ्हाडीने वार करून हत्या केली. ही घटना मगरोण पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कबीरपूर गावात शुक्रवारी पहाटे घडली.

गावकऱ्यांकडून माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत रक्ताने माखलेल्या कुऱ्हाडीसह आरोपीला अटक केली. पोलिसांनुसार, आरोपी द्वारका पटेलचा गत वर्षभरापासून त्याची पत्नी खेमासोबत वाद सुरू होता. सुमारे सहा महिन्यांपूर्वी केलेल्या छळाच्या तक्रारीवरील रागातून त्याने हत्या केली. ◂ (वृत्तसंस्था)

# भगवंत मान यांच्या ताफ्यावर फेकले टोमॅटो

### भाजपा नेते रवनीत बिट्टूंना अटक

**लुधियाना, १९ सप्टेंबर**

पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या ताफ्यावर शनिवारी लुधियानात माजी केंद्रीय मंत्री रवनीतसिंग बिट्टू आणि भाजपा कार्यकर्त्यांनी टोमॅटो फेकून मारले. या घटनेनंतर पोलिसांनी रवनीत यांना ताब्यात घेतले आहे. विशेष म्हणजे, एक दिवसापूर्वीच रवनीतसिंग बिट्टू यांच्या ताफ्यावर हल्ला करण्यात आला होता.

मुख्यमंत्री भगवंत मान पंजाब कृषी विद्यापीठातील एका कार्यक्रमात सहभागी झाले होते. कार्यक्रमातून निघताना रवनीतसिंग बिट्टू यांनी भाजपा कार्यकर्त्यांसोबत त्यांच्या ताफ्यावर टोमॅटो फेकले. रवनीत यांनी स्वतः या घटनेची माहिती दिली.

**मादक पदार्थांच्या सेवनाला प्रोत्साहन दिल्याचा आरोप**

रवनीतसिंग बिट्टू यांनी आरोप केला की, पंजाबमध्ये आप सरकारकडून मादकपदार्थांच्या सेवनाला प्रोत्साहन दिले जात आहे. त्यामुळे आम्ही मुख्यमंत्री मान यांना अंडी, दारूच्या बाटल्या आणि टोमॅटो परत दिले आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

### बसच्या धडकेत तिघांचा मृत्यू

**सागर, १९ सप्टेंबर**

भरधाव बस आणि कार यांच्यात समोरासमोर धडक झाली. या अपघातात कारमधील तिघांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना शनिवारी दुपारी सागर जिल्ह्यातील बाहेरिया पोलिस ठाण्याच्या हद्दीत चनाटोरियाजवळ घडली. प्रत्यक्षदर्शींच्या मते, धडक इतकी जोरदार होती की, कारच्या पुढील आणि आतील भागाचे मोठे नुकसान झाले. अपघातानंतर, अनियंत्रित झालेली बस रस्त्यावरून घसरून जवळच्या खड्ड्यात पडली. बसचालक घटनास्थळावरून फरार झाला. अपघात घडताच वाटसरू आणि स्थानिकांनी बचावकार्य सुरू करत पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत स्थानिकांच्या मदतीने कारमध्ये अडकलेल्या लोकांना बाहेर काढून रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तिघांना मृत घोषित केले. ◂ (वृत्तसंस्था)

# बालकाने केले फुलपाखरांच्या स्मरणशक्तीवर संशोधन



**जपानमधील कोबे शहरातील प्रयोग**

**टोकियो, १९ सप्टेंबर**

जपानमधील कोबे येथे राहणाऱ्या १० वर्षांच्या जो नगाई या बालकाने आपला मोकळा वेळ 'स्वॅलोटेल' प्रजातीची फुलपाखरे पाळण्यात घालवला. पंखांच्या कडांवर चमकदार ठिपके असलेल्या 'एशियन स्वॅलोटेल' फुलपाखरांची काळजी घेताना त्याला त्यांचे एक रंजक वर्तन दिसून आले.

तो त्यांना मोकळ्या जागेत सोडायचा, तेव्हा ती काही वेळ हवेत घिरट्या घालून पुन्हा त्याच्याकडेच परत यायची. यावरून त्याच्या मनात शंका निर्माण झाली की फुलपाखरे त्याला ओळखतात का? याच प्रश्नाचे उत्तर शोधताना नगाईने जगभरातील तज्ज्ञांचे लक्ष वेधून घेणारे संशोधन केले आहे. जो नगाईने या विषयावर वैज्ञानिक अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्याला समजले की, जॉर्जटाउन युनिव्हर्सिटीच्या प्रसिद्ध कीटकशास्त्रज्ञ डॉ. मार्था व्हाइस यांनी सुरवंटाच्या काळातील आठवणी फुलपाखरू झाल्यावरही राहतात का?' यावर सर्वांत आधी अभ्यास केला होता. नगाईने आपल्या प्रश्नांसह डॉ. व्हाइस यांना एक ई-मेल पाठवला. कमी वयातही जो नगाईची ही उत्सुकता पाहून डॉ. व्हाइस प्रभावित झाल्या आणि त्यांनी ई-मेलला उत्तर दिले.

लवकरच त्यांच्यात खंडपरत्वे वैज्ञानिक मार्गदर्शन सुरू झाले. विद्यापीठाच्या प्राध्यापिका आणि प्राथमिक शाळेतील विद्यार्थी यांनी मिळून प्रयोगशाळेतील कठीण पद्धतींना मुलांसाठी सोप्या आणि रंजक प्रयोगात बदलले, जे प्रयोग नगाईने आपल्या घरीच केले. सुरवंटाचे फुलपाखरात रुपांतर होण्यासाठी त्याला कायापालट किंवा 'मेटामॉर्फोसिस' या प्रक्रियेतून जावे लागते. सुरवंट स्वतःला कोषात बंद करून घेतो, जिथे त्याचे शरीर पूर्णपणे विघटित होते आणि पुनर्रचना पावते. याला 'तरल अवस्था' देखील म्हणतात. आता नगाईसमोर प्रश्न होता की सुरवंटाला अशी कोणती आठवण द्यावी, जी फुलपाखरू झाल्यावरही त्याच्या लक्षात राहील? जोने घरातील सोप्या वस्तूंचा वापर करून प्रयोग तयार केला केला.

'मसल थेरपी डिव्हाइस'च्या सौम्य इलेक्ट्रॉनिक पल्सचा वापर करून जोने सुरवंटांच्या एका लहान गटाला लॅव्हेंडर तेलाच्या सुगंधाचा संबंध व्हायब्रेटिंग स्टिम्युलसशी जोडायला शिकवले. या सुरवंटांना तो सुगंध फारसा आवडत नव्हता, पण त्यामुळे त्यांना कोणतीही हानी पोहोचली नाही. त्याने दुसऱ्या नियंत्रित गटाला कोणतेही प्रशिक्षण दिले नाही. कायापालट प्रक्रियेदरम्यान शरीराच्या पूर्ण विघटनानंतरही लॅव्हेंडरपासून दूर राहण्याची ही आठवण टिकून राहील का? हा मुख्य प्रश्न होता. ◂ (वृत्तसंस्था)

### हा निघाला निष्कर्ष

कोषातून सुंदर फुलपाखरे बाहेर आली, तेव्हा नगाईने 'वाय' आकाराच्या नळीच्या चक्रव्यूहाचा वापर करून त्यांची चाचणी घेतली. नळीच्या एका बाजूला लॅव्हेंडरचा सुगंध होता तर दुसरी बाजू गंधहीन होती. अप्रशिक्षित गटातील फुलपाखरे दोन्ही बाजूंना समान प्रमाणात गेली. परंतु, प्रशिक्षित फुलपाखरांनी लॅव्हेंडरच्या सुगंधापासून दूर जाणे पसंत केले. यावरून जोने कायापालटादरम्यान शरीर आणि मेंदूची पूर्ण पुनर्रचना होऊनही आठवणी कायम राहू शकतात, हे सिद्ध केले. ■

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### दिल्ली विमानतळाचा तिसरा रनवे होणार सुरू

**नवी दिल्ली :** दिल्ली विमानतळाची तिसरी धावपट्टी ११आर/२९एल रविवारपासून कार्यान्वित होईल. धावपट्टी याच वर्षी फेब्रुवारीमध्ये पुनर्वसनासाठी बंद करण्यात आली होती. सुमारे सात महिन्यांनंतर ती पुन्हा सुरू केली जात आहे. धावपट्टी सुरू



करण्यापूर्वी सर्व आवश्यक तपासण्या, प्रमाणीकरण आणि नियामक मंजुरी घेण्यात आल्या, असे दिल्ली इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडने शनिवारी सांगितले. नवीन धावपट्टीवर रॅपिड एक्झिट टॅक्सी-वे तयार करण्यात आला आहे. त्यामुळे लँडिंगनंतर विमानाचा वेग कमी होताच ते मुख्य धावपट्टीवरून बाहेर पडू शकते. यामुळे विमान धावपट्टी लवकर रिकामी करेल. पुढील विमानाच्या लँडिंग किंवा टेकऑफसाठी धावपट्टी लवकर उपलब्ध होईल.

### तंबाखू उत्पादनांची २६,७५० पाकिटे जप्त

**कोची :** केरळ येथील पेरुंबावूरमधून सुमारे २७ लाख रुपये किमतीच्या प्रतिबंधित तंबाखू उत्पादनांची २६,७५० पाकिटे उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी जप्त केली आहेत, अशी माहिती शनिवारी देण्यात आली. शुक्रवारी पेरुंबावूरमधील लॉरी स्टँडजवळ असलेल्या दोन गोदामांमधून ही तंबाखू उत्पादने जप्त करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. कोट्टायममध्ये अलीकडेच मोठ्या प्रमाणात जप्त करण्यात आलेल्या बंदी असलेल्या तंबाखू उत्पादनांच्या प्रकरणातील पुढील तपासाचा एक भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. ही दोन्ही गोदामे कथितरीत्या जनावरांच्या खाद्याची साठवणूक करणारी ठिकाणे म्हणून चालवली जात होती. गुप्त माहितीच्या आधारे उत्पादन शुल्क विभागाचे अधिकाऱ्यांनी कुलूपे तोडून पाहणी केल्यानंतर,तेथे पान मसाल्यासह बंदी असलेल्या तंबाखू उत्पादनांचा मोठा साठा आढळला.

### वाहन उलटल्याने पाच जवान जखमी

**रामबन :** जम्मू-काश्मीरमधील रामबन जिल्ह्यात शनिवारी सीमा सुरक्षा दलाच्या जवानांना घेऊन जाणारे वाहन उलटल्याने पाच जवान जखमी झाले, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली. हे वाहन जम्मूच्या दिशेने जाणाऱ्या ताफ्याचा भाग होते आणि हा अपघात जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील चंबा-सेरी भागात झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अपघातानंतर त्वरित बचावकार्य सुरू करण्यात आले आणि उपनिरीक्षक घरसिंग, चालक शमीम अहमद तसेच कॉन्स्टेबल सुनील कुमार, परशुराम कुमार आणि चंदन यादव या जखमी जवानांना रुग्णालयात हलवण्यात आले. उत्तर काश्मीरमधील कुपवाडा जिल्ह्याचा रहिवासी असलेल्या चालकाची प्रकृती गंभीर असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### महाराष्ट्राची लेक नीला स्वीडिश संसदेत पोहोचली

**मुंबई :** महाराष्ट्राचे प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ अशोक विखे पाटील यांची कन्या नीला विखे पाटील स्वीडिश संसदेत पोहोचली आहे. शनिवारी त्यांच्या निवडीची घोषणा करण्यात आली. नीला यांनी स्टॉकहोम सिटी मतदारसंघातून निवडणूक जिंकली आहे. स्वीडनमध्ये १३ सप्टेंबरला मतदान झाले. विजयानंतर नीला म्हणाल्या, ३४९ सदस्यांच्या संसदेचा भाग झाल्याचा आनंद होत आहे. शहर आणि देशासाठी योगदान देण्यास मी उत्सुक आहे. जे मतदान करू शकत नाहीत, त्यांचा आवाज बनण्याची माझी इच्छा आहे. बाल कल्याण आणि पर्यावरण हे माझे आवडीचे विषय आहे. नीला पुढे म्हणाल्या, आज माझे आजोबा असते तर त्यांना माझा अभिमान वाटला असता. मी १५ वर्षांची असताना त्यांनी मला राज्याचा अर्थसंकल्प वाचायला सांगितला होता. मला भारतावर खूप प्रेम आहे. मी देशाशी खूप जोडलेली आहे. माझे अनेक जवळचे भारतीय मित्र आहेत.

# ‘अनुभवशाळा’ संघाची ओळख देणारी

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन


**इंदूर, १९ सप्टेंबर**

‘संघ अनुभवशाळा’ या नावाला अर्थ आहे. संघाला दिखावा करण्याची गरज नाही. संघ ही एक अद्वितीय संघटना आहे, तिच्यासारखी दुसरी कोणतीही संघटना नाही. त्यामुळे संघाला समजून घेण्यासाठी ‘अनुभवशाळा’ हा एक चांगला प्रयोग आहे. संपूर्ण जगात आणि अलिकडच्या इतिहासात संघासारखी कोणतीही संघटना किंवा कार्य झालेले नाही. लोक संघाला समजून घेण्यासाठी कार्यालयात येतात आणि तिथले कामाचे वातावरण प्रत्यक्ष जाणून घेतात. ही अनुभवशाळा म्हणजे लहान भांड्यात महासागर असल्यासारखे आहे. ही अनुभवशाळा संघाची प्रत्यक्ष ओळख करून देणारी आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या असंख्य कार्यक्रमांमधून आणि संवादांमधून, समाजातील एक मोठा वर्ग संघाच्या शंभर वर्षांच्या प्रवासाशी परिचित झाला आहे. याच भावनेने, डॉ. हेडगेवार स्मारक समितीच्या सुदर्शन भवनमध्ये संघ अनुभवशाळेची निर्मिती करण्यात आली आहे.

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी संघ अनुभवशाळेचे उद्घाटन केले. याप्रसंगी समाजातील सर्व स्तरांतील प्रबुद्ध नागरिक आणि स्वयंसेवक उपस्थित होते. प्रारंभी सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी दीपप्रज्वलन केल्यानंतर प्रदर्शनाला भेट दिली. यावेळी संघ अनुभवशाळा तयार करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

मोहित जैन म्हणाले की, ‘एक विचार, एक प्रवास -राष्ट्र प्रथम’ या भावनेवर आधारित ही अनुभवशाळा, संघाचा शंभर वर्षांचा प्रवास, त्याचे विचार, कार्यपद्धती आणि सामाजिक जीवनातील योगदान सोप्या आणि रोचक पद्धतीने सादर करते. अनुभवशाळेला भेट देणाऱ्यांना, विविध प्रदर्शनांमधून ‘संघ काय



आहे?’, ‘त्याची स्थापना का झाली?’ आणि ‘संघ कसे कार्य करतो?’ या तीन प्रश्नांची उत्तरे मिळतात.

संघ अनुभवशाळेचा उद्देश नवीन पिढीला भारतीय संस्कृतीची ओळख करून देणे, त्यांच्यात सेवा आणि सामाजिक जबाबदारीची भावना रुजवणे आणि त्यांना ‘राष्ट्र प्रथम’ ही संकल्पना स्वीकारण्यास प्रेरित करणे हा आहे.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. हेडगेवार स्मारक समितीचे उमेश वर्मा यांनी केले. समितीचे सचिव राकेश यादव यांनी आभारप्रदर्शन केले. कार्यक्रमानंतर, नागरिकांनी आणि स्वयंसेवकांनी प्रदर्शनाला भेट दिली. हे प्रदर्शन अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि उत्कृष्ट कलेचा वापर करून तयार करण्यात आले आहे. व्हिडीओ गॅलरी, छायाचित्रे आणि लेखांच्या माध्यमातून, हे प्रदर्शन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना, त्याचा टप्प्याटप्प्याने झालेला विस्तार आणि समाजकार्याचे बळकटीकरण यांचा प्रत्यक्ष अनुभव देते.

हे प्रदर्शन २७ सप्टेंबरपासून, दररोज सकाळी ९ ते रात्री ८ पर्यंत निःशुल्क पाहता येईल. प्रदर्शनाच्या ठिकाणी अभ्यागतांसाठी संघ साहित्य आणि भारतीय संस्कृतीशी संबंधित इतर साहित्य देखील उपलब्ध राहणार आहे.

**संघात काही गोष्टी अपरिवर्तनीय**

सरसंघचालक डॉ. भागवत म्हणाले, परिस्थितीनुसार बदलण्याची क्षमता असलेल्या संघात, काही गोष्टी अपरिवर्तनीय आहेत. हे समजून घेण्यासाठी अनुभवाचीही गरज असते. संघाच्या एखाद्या कार्यक्रमात तीन-चार दिवस घालवून संघाचा अनुभव मिळवता येतो. संघ जाणून घेण्याजोगा आणि समजून घेण्याजोगा आहे, ही गोष्ट या अनुभवशाळेतून स्पष्ट होते. (वृत्तसंस्था)

# विदर्भातील अष्टविनायक

## वेगळेपण जपणारा श्री भृशुंड गणेश

**भंडारा, १९ सप्टेंबर**

विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक अत्यंत महत्त्वाचे आणि जागृत देवस्थान म्हणजे भंडारा जिल्ह्यातील मेंढा येथील श्री भृशुंड गणेश. पश्चिम महाराष्ट्रातील अष्टविनायकांप्रमाणेच विदर्भातील आठ महत्त्वाच्या गणेश मंदिरांना विशेष आध्यात्मिक महत्त्व आहे. यामध्ये भंडारा शहराच्या वेशीवर वैनगंगा नदीच्या तीरावर वसलेले हे प्राचीन मंदिर भाविकांचे प्रमुख श्रद्धास्थान आहे.

हा परिसर प्राचीन काळी ‘शांडिल्यग्राम’ किंवा ‘स्थंडिलग्राम’ या नावाने ओळखला जात होता. सध्या हे ठिकाण भंडारा शहराच्या मेंढा या भागात येते. या मंदिराचा उल्लेख प्राचीन धार्मिक ग्रंथांमध्ये आढळतो. इ.स. ११४४ मध्ये महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी यांनी या स्थानाला भेट दिली होती. तेव्हापासून या मंदिराची ख्याती अधिक वाढली. येथील गणेशमूर्ती इतर सामान्य गणेशमूर्तींपेक्षा अत्यंत वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. अखंड रक्ताश्म शिळेवर (लाल रंगाच्या दगडावर) कोरलेली ही मूर्ती गाभाऱ्यात तळापासून सुमारे ८ फूट उंच आणि ४ फूट रुंद आहे. या गणपतीला लांब दाढी आणि मिश्या आहेत, ज्यामुळे या मूर्तीमध्ये जणू एखाद्या तपस्वी ऋषींचा भास होतो. मूर्ती चतुर्भुज असून ती उंदरावर वामललितासनात विराजमान आहे. मूर्तीच्या मस्तकावर पाच फण्यांचा



नाग आणि उजव्या बाजूला वळलेली वैशिष्ट्यपूर्ण सोंड आहे. मूर्तीवर शतकानुशतके शेंदुराचा जाड थर चढल्यामुळे तिची मूळ कलाकुसर पूर्णपणे स्पष्ट दिसत नसली, तरी तिचे भव्य रूप अत्यंत आकर्षक वाटते.

मंदिराच्या नावामागे गणेशपुराणात एक रंजक कथा आढळते. महर्षी भृशुंड ऋषींनी या परिसरात गणेशाची कठोर तपश्चर्या केली होती. त्यांच्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन गणेशाने त्यांना दर्शन दिले आणि ऋषी स्वतः गणेशरूप झाले, अशी भाविकांची श्रद्धा आहे. दुसऱ्या एका लोककथेनुसार, या परिसरात पूर्वी ‘नामा कोळी’ नावाचा एक वाटसरूंना लुटणारा व्यक्ती राहत होता. मुद्गल ऋषींच्या संपर्कात आल्यानंतर त्याने ‘गजास्य’ मंत्राचा जप करत कठोर तप केले, ज्यामुळे त्याच्या शरीरावर वारूळ तयार झाले आणि सोंडेसारखा भाग उगवला. म्हणूनच या गणपतीला ‘भृशुंड गणेश’ म्हटले जाते. स्थानिक लोक याला आदराने ‘मेंढ्याचा गणपती’ असेही म्हणतात.

हे मंदिर हेमाडपंती शैलीत बांधलेले आहे. मंदिराच्या डाव्या बाजूला एक प्राचीन शिवलिंग असून, बाहेर हनुमानजींचे मंदिर आहे. हा परिसर गोसावी समाजाच्या वस्तीने वेढलेला आहे. दरवर्षी माघ चतुर्दशी (माघी गणेशोत्सव) निमित्त येथे मोठी यात्रा भरते. विदर्भातील अष्टविनायकांपैकी एक असलेला भृशुंड गणेश असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान बनले आहे. (तभा वृत्तसेवा)

# अयोध्या राम मंदिरात पुजाऱ्यांसाठी नियमावली

## महंत राजकुमार दास यांची माहिती



**अयोध्या, १९ सप्टेंबर**

अयोध्येतील श्रीराम मंदिरात नवा ड्रेस कोड लागू करण्यात आला आहे. रामललाची पूजा करणाऱ्या गुरुजींसाठीही नवी नियमावली जारी करण्यात आली आहे. पूजा पद्धतीचे व्यवस्थापन करण्यासाठी स्थापन केलेल्या नवीन धार्मिक समितीने रामानंदी परंपरेनुसार काटेकोरपणे पूजा करण्याची व्यवस्था केली आहे. पुजाऱ्यांसाठी एक वेशभूषेची संहिता तयार करण्यात आली आहे. यानुसार पुजाऱ्यांना पिवळ्या रंगाचा पोशाख घालावा लागेल, जो दररोज धुतला जाईल आणि तो रेशमी किंवा सुती कापडाचा असेल. याशिवाय मंदिर परिसरात मोबाईलला बंदी घालण्यात आली आहे.

राम मंदिर ट्रस्टने जितेंद्र मिश्रा यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती केली. यानंतर झालेल्या बैठकांमध्ये घेतलेल्या निर्णयाची अंमलबजाणी करण्याचा निर्णय ट्रस्टने शनिवारी घेतला. धार्मिक समितीचे सदस्य महंत राजकुमार दास यांनी सांगितले की, पूजा करणाऱ्या गुरुजींच्या घरी एखाद्याचा जन्म झाला किंवा निधन झाले, तर शोकाच्या काळात त्यांना मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश मिळणार नाही. शुद्धीकरणानंतरच पूजन करण्याची परवानगी दिली जाईल. केवळ पुजाऱ्यांनाच गाभाऱ्यात प्रवेश करण्याची परवानगी असेल. त्यांना रामानंदी परंपरेत दीक्षा घेणे आणि तुळशीची माळ घालणे आवश्यक आहे. कर्तव्य बजावत असताना शौचालयात गेल्यास, स्वतःला शुद्ध करण्यासाठी त्यांना स्नान करून स्वच्छ धुतलेले कपडे घालावे लागतील.

**नैवेद्य व्यवस्थेतही बदल**

राम मंदिराच्या धार्मिक समितीच्या १२ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत सविस्तर आढावा घेतल्यानंतर पूजा पद्धतीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतल्याचे महंत राजकुमार दास यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. मंदिरातील पूजेदरम्यान होणाऱ्या नैवेद्य व्यवस्थेतही बदल करण्यात आला आहे. आता सकाळच्या मंगला आरतीपूर्वी प्रभू रामललाना जागृत करण्यासाठी बालरूपानुसार भजने गायली जातील. यासाठी अयोध्येतील मंदिरांमधून गायकांचा एक चमू तैनात केला जाईल. प्रत्येक वेळी नैवेद्याचा मेनू वेगळा असेल. यामध्ये डाळ-भात, भाजी-खीर, पुरी-कचोरी-हलवा आदींचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

### आदिलाबादला मिळणार विमानतळ : किशन रेड्डी

**हैदराबाद :** तेलंगणामधील आदिलाबाद येथे संरक्षण आणि नागरी अशा दोन्ही उद्देशांसाठी वापरले जाणारे विमानतळ उभारले जाईल, केंद्रीय मंत्री जी. किशन रेड्डी यांनी शनिवारी सांगितले. आदिलाबादमध्ये हवाई दलाचा तळ, प्रशिक्षण केंद्र, कार्यालये, टाऊनशिप आणि निवासी संकुले देखील उभारली जातील. हे केंद्र नागरी विमानतळ म्हणूनही काम करेल, असे केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री असलेल्या किशन रेड्डी यांनी सांगितले. त्यांनी, इतर केंद्रीय मंत्र्यांनी आणि मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी आदिलाबाद येथील विमानतळ उभारणीबाबत चर्चा केली आहे. विमानतळाची उभारणी जलद गतीने करण्यासाठी राज्य सरकार, नागरी उड्डाण मंत्रालयाकडून नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाईल, असे किशन रेड्डी म्हणाले.



उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथील इस्कॉन मंदिरात शनिवारी देवी राधा यांचा जन्मोत्सव असलेल्या ‘राधाष्टमी’निमित्त धार्मिक विधी करताना पुजारी

### सतीश सालियान यांचा आदित्य ठाकरेंवर अब्रुनुकसानीचा दावा

**मुंबई, १९ सप्टेंबर**

दिशा सालियानचे वडील सतीश सालियान यांनी आदित्य ठाकरे आणि अनिल देशमुख यांच्यावर अब्रुनुकसानीचा दावा ठोकला आहे. आदित्य ठाकरे यांनी या प्रकरणाबाबत केलेल्या समाज माध्यम पोस्टनंतर हे पाऊल उचलण्यात आले असून, याच दाव्याची नोटीस देण्यासाठी सतीश सालियान यांनी शनिवारी थेट ठाकरेंच्या निवासस्थानावर मोर्चा काढला.

सतीश सालियान हे वकिलांच्या टीमसोबत ठाकरेंच्या निवास स्थानाच्या मुख्य प्रवेशद्वारावर पोहोचल्यानंतर शिवसैनिकांनी त्यांना अडवले. यावेळी सालियान यांच्या वकिलांनी ५०० कोटींच्या अब्रूनुकसानीची नोटीस आदित्य ठाकरे यांच्या वकिलांना दिली. माध्यमांशी बोलताना दिशाच्या वडिलांनी उशीर का होईना सीबीआयने गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. मुंबई पोलिसांच्या चुकीच्या गोष्टीने सर्व बनाव रचून ही केस दाबण्याचा प्रयत्न केला, दावा केला आहे. ‘कॉमन मॅन’ची ताकद आम्ही दाखवू, असा इशारा सतीश सालियान यांनी दिला आहे. त्या सरकारमध्ये असलेल्या नेत्यांच्या सांगण्यावरून पोलिसांनी हे सर्व केले. (तभा वृत्तसेवा)

# काँग्रेस उमेदवाराला ३ ऑक्टोबरपर्यंत कोठडी

## नंदिग्राम पोटनिवडणूक, विरोधकांकडून कारवाईवर प्रश्नचिन्ह

**कोलकाता, १९ सप्टेंबर**

पश्चिम बंगालमधील नंदिग्राम विधानसभा जागेच्या पोटनिवडणुकीच्या पृष्ठभूमीवर एक मोठी राजकीय घडामोड समोर आली आहे. काँग्रेसचे उमेदवार मिलन प्रधान यांना २००७ मधील एका खून आणि दंगल प्रकरणी अटक करण्यात आली असून, त्यांना ३ ऑक्टोबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

तृणमूल काँग्रेसने (ममता गट) आपल्या उमेदवार संचिता प्रधान डे यांची उमेदवारी मागे घेऊन मिलन प्रधान यांना पाठिंबा जाहीर केल्यानंतर काही तासांतच ही अटक झाली. अटकेनंतर पोलिसांनी शनिवारी त्यांना हल्दिया उपविभागीय न्यायालयात हजर केले. या कारवाईवर विरोधकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.

**चार अजामीनपात्र वॉरंट प्रलंबित होते**

पोलिसांनुसार, मिलन प्रधान यांच्या विरोधात चार अजामीनपात्र वॉरंट प्रलंबित होते. हे सर्व गुन्हे २००७ मध्ये नंदिग्राममधील भूसंपादन विरोधी आंदोलनादरम्यान नोंदवण्यात आले होते.

ज्यात खून, खुनाचा प्रयत्न, दंगल, अपहरण, गुन्हेगारी धमकी आणि शस्त्र कायदा यांसारख्या गंभीर कलमांचा समावेश आहे. सरकारने न्यायालयात असा युक्तिवाद केला की, प्रधान गत १९ वर्षांपासून फरार होते. त्यांचा ठावठिकाणा कळल्यानंतरच कायदेशीर कारवाई करण्यात आली.

**विरोधकांचा हल्ला, भाजपाने आरोप फेटाळले**

माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सहा ऑक्टोबरच्या पोटनिवडणुकीला पाठिंबा जाहीर केल्यानंतर लगेचच झालेल्या या अटकेमुळे राजकीय वादळ निर्माण झाले आहे. काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसच्या गटांनी याला सुडाचे राजकारण संबोधत निवडणुकीच्या तोंडावर विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी जुन्या प्रकरणांचा वापर केला जात असल्याचा आरोप केला आहे. तथापि, भाजपाने हे आरोप फेटाळून लावत ही कारवाई एका जुन्या फौजदारी प्रकरणावर आधारित असल्याचे म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# युवा पिढी विकसित भारताची शिल्पकार

**नवी दिल्ली, १९ सप्टेंबर**

विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या अभियानाला सातत्याने बळकटी देईल, असा निर्णय शासकीय सेवेत काम करणाऱ्या प्रत्येकाने घ्यायला हवा. युवा पिढी हीच विकसित भारताची खरी शिल्पकार आहे. तुम्ही सर्वजण अशावेळी भारत सरकारशी जोडले गेले आहात, जेव्हा देश एका अत्यंत मोठ्या ध्येयाच्या दिशेने पुढे जात आहे. हे ध्येय म्हणजे २०४७ पर्यंत विकसित भारताची निर्मिती करणे होय. यामध्ये तुमच्यासारख्या तरुणांची अत्यंत महत्त्वाची भूमिका असल्याचे पंतप्रधान मोदी सरकारी सेवेत रुजू झालेल्या उमेदवारांना उद्देशून म्हणाले.

२० व्या रोजगार मेळाव्याचा भाग म्हणून शनिवारी ५१ हजार पेक्षा जास्त तरुणांना नियुक्तीपत्रे वितरित करण्यात आली. यासाठी देशभरात



देशातील ४५ ठिकाणी आयोजित रोजगार मेळाव्याला आभासी माध्यमाने संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

४५ रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले होते. पंतप्रधान मोदींनी नव्याने भरती झालेल्या तरुणांना आभासी माध्यमाने संबोधित केले. यावेळी ते म्हणाले, आज तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेचे महत्त्व वाढत असताना सरकारने कौशल्य आधारित शिक्षणावर भर दिला आहे आणि यातूनच शैक्षणिक क्षेत्रात बदल केले जात आहे. देशात सणांचा काळ सुरू झाला आहे. या आनंदाच्या वातावरणात आजचा दिवस हजारो कुटुंबांच्या जीवनात नवा आनंद घेऊन आला. तरुणांच्या सामर्थ्याचे आणखी एक चित्र आपल्या स्टार्टअप परिसंस्थेत दिसून येते, असे मोदी म्हणाले.

भारत आज जगातील तिसरी सर्वांत मोठी स्टार्टअप परिसंस्था आहे आणि भारताची स्टार्टअपची कहाणी आता केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित राहिलेली नाही. आज सुमारे निम्मे मान्यताप्राप्त स्टार्टअप्स टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये आहेत. (वृत्तसंस्था)

### तरुणांच्या प्रतिभेने जगाचा विश्वास जिंकला

२०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या भव्य ध्येयाकडे देश वाटचाल करत असताना, तरुण भारतीय सरकारचा एक भाग बनत आहेत. तरुणांच्या प्रतिभेने आणि कौशल्याने संपूर्ण जगाचा विश्वास जिंकला आहे. जगाला भारताचे नवोन्मेषक, उद्योजक आणि तरुणांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. भारत आज एक वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताचा विकास दर ७.८ टक्के होता आणि गुंतवणुकीत सुमारे १२ टक्क्यांनी वाढ झाली. जग अनेक अनिश्चिततेचा सामना करत असताना भारत विकासाच्या दिशेने वाटचाल करत आहे.

### सरकारी सेवेत तरुणाईची संख्या वाढली

रोजगार मेळाव्याचा एक भाग म्हणून, नवनियुक्त उमेदवारांनी केंद्र सरकारच्या विविध मंत्रालये आणि विभागांमध्ये पदभार स्वीकारला. यामध्ये महसूल विभाग, रेल्वे मंत्रालय, गृह मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग आणि संरक्षण मंत्रालय यांचा समावेश होता. २० व्या रोजगार मेळाव्यासह, विविध विभाग आणि सरकारी संस्थांमध्ये नियुक्तीपत्रे मिळवणाऱ्या तरुणांची संख्या १२.७५ लाखांवर पोहोचली आहे.

### ब्रिक्समध्ये सामान्यांचा सहभाग

ब्रिक्समधील सहकार्य केवळ सरकारांपुरते मर्यादित राहू नये, तर आपले उद्योजक, शेतकरी, महिला आणि तरुणही या भागीदारीत सक्रियपणे सहभागी व्हावेत, याची भारताने खात्री करण्याचा प्रयत्न केला आहे. याच विचारातून ‘ब्रिक्स कनेक्ट’ आणि ‘ब्रिक्स एमएसएमई को-ऑपरेशन पोर्टल’ यासारखे उपक्रम सुरू करण्यात आले. गेल्या काही वर्षांमध्ये सरकारचे सातत्याने लक्ष तरुणांना भविष्यासाठी तयार करण्यावर राहिले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, स्किल इंडिया मिशन, प्रधानमंत्री कौशल विकास योजना याचाच भाग आहे.

# भारताच्या सीमेवर शत्रूचा ड्रोन कारखाना

## भागीदारीतून बोगुरा येथे उभारणार प्रकल्प

### तुर्कीचा बांगलादेशसोबत करार

**ढाका, १९ सप्टेंबर**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा सूड म्हणून भारताने प्रत्युत्तर देत राबविलेल्या ‘ऑपरेशन सिंदूर’वेळी पाकिस्तानला शस्त्रांचा पुरवठा करणाऱ्या तुर्कीने बांगलादेशसोबत संरक्षण करार केला आहे. या अंतर्गत भारताच्या सीमेपासून ७५ किमी अंतरावर असलेल्या बोगुरा येथे दोन्ही देशांच्या भागीदारीतून ड्रोन कारखाना उभारला जाणार असल्याचे बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.

हा द्विपक्षीय करार भारतासाठी धोक्याची घंटा असून, तुर्की पाकिस्तानसाठी देशाच्या लष्करी हालचालीवर लक्ष ठेवण्याची दाट शक्यता आहे.बांगलादेश आणि तुर्कीने संयुक्तपणे ड्रोन तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही देशांच्या भागीदारीतून बोगुरा येथे उभारण्यात येणाऱ्या ड्रोन कारखान्याचा खर्च तब्बल २५ हजार कोटी रुपये आहे. तुर्की बांगलादेशला ड्रोन तयार करण्याचे तंत्रज्ञानही देणार आहे. बोगुरा हे भारताच्या सीमेपासून



अवघ्या ७५ किलोमीटर अंतरावर असल्याने भारताची चिंता वाढली आहे. बोगुरा बांगलादेशच्या उत्तरेकडील भागात आहे. येथे ज्या परिसरात कारखाना उभारण्याची योजना आहे, त्याच्या जवळच बांगलादेशच्या वायुदलाचा नवा तळ विकसित केला जात आहे. बोगुरा विमानतळालाही आंतरराष्ट्रीय मानकांनुसार अद्ययावत करण्याची योजना आहे. भारताची सर्वात लांब, जवळपास चार हजार किमी लांबीची सीमा बांगलादेशाला लागून आहे. जगातील कोणत्याही दोन देशांमधील ही पाचव्या क्रमांकाची सर्वांत लांब भूसीमा असून, भारताच्या दृष्टिकोनातून पाहिले तर बांगलादेशच्या तुर्कीसोबतच्या संरक्षण भागीदारीमुळे ईशान्येकडील राज्यांना धोका वाढण्याची शक्यता आहे.

**सीमेवर ड्रोन तैनात करण्याची तयारी**

भारताला लागून असलेल्या सीमेवर ड्रोन तैनात करण्याची तयारी बांगलादेशची आहे. बांगलादेशाला सौदी अरब, तुर्की आणि पाकिस्तान यांच्या मक्का संरक्षण करारातही प्रवेश हवा आहे. यात पाकिस्तान मध्यस्थाची भूमिका बजावत आहे. अशातच तुर्कीसोबतच्या संरक्षण भागीदारीने बांगलादेश पाकिस्तानच्या अधिक जवळ जाण्याची शक्यता आहे. दोन्ही देशांमधील सहकार्याचा केंद्रबिंदू ड्रोन आहेत आणि लष्करी उपकरणांच्या संयुक्त उत्पादनावरही चर्चा सुरू आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## विश्लेषण

# समान नागरी कायदा आणि अमित शाह

**श्यामकांत जहागीरदार**


२०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी देशातील रालोआशासित २१ राज्यांत समान नागरी कायदा लागू झालेला असेल, अशी घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नुकतीच मुंबईत केली आहे. विशेष म्हणजे समान नागरी कायद्याची सुरुवात सर्वप्रथम भाजपाशासित उत्तराखंडने केली आहे. भाजपाशासित महाराष्ट्रासह अन्य राज्यानींही या दिशेने पावले उचलली आहेत.

समान नागरी कायदा म्हणजे देशातील सर्व धर्माच्या नागरिकांसाठी एकच कायदा लागू असणे. अशी मागणी करण्याची वेळ आली, याचाच अर्थ देशात सध्या सर्व धर्मांना लागू होईल, असा एक कायदा नाही. समान नागरी कायदा देशात लागू झाल्यानंतर सर्व जाती-धर्माच्या लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची आणि भारतीयत्वाची भावना निर्माण होणार आहे.

देशात कायद्याचे सध्या दोन गटांत वर्गीकरण केले जाते, पहिला नागरी म्हणजे दिवाणी कायदे, यात लग्न, घटस्फोट, संपत्ती आणि वारसाहक्क यांचा समावेश होतो. फौजदारी कायदा मात्र देशातील सर्व जाती-धर्माच्या लोकांना सारखा लागू होतो. भारतात मुस्लिम, ख्रिश्चन आणि पारशी समुदायासाठी त्यांचे व्यक्तिगत कायदे (पर्सनल लॉ) आहेत. हिंदू सिव्हिल लॉ अंतर्गत हिंदू, शीख, जैन आणि बौद्ध हे समुदाय येतात. मुस्लिम पर्सनल लॉ शरियतचा कायदा म्हणून ओळखला जातो. मुस्लिम पर्सनल लॉमध्ये वडिलांच्या आणि पतीच्या संपत्तीत महिलांना अधिकार नाही, याउलट हिंदू सिव्हिल लॉमध्ये वडिलांच्या आणि पतीच्या संपत्तीत महिलांना समान अधिकार आहे. देशात समान नागरी कायदा लागू झाल्यावर विवाह, घटस्फोट, वारसाहक्क आणि संपत्तीचा अधिकार यात सर्व धर्माच्या महिलांना समान अधिकार मिळणार आहे. त्यामुळे देशात समान नागरी कायदा लागू होणे हा मुस्लिम महिलांच्या फायद्याच्या दृष्टीने अतिशय आवश्यक आहे. मात्र मुस्लिम महिलांना त्यांच्या घटनादत्त अधिकारापासून वंचित ठेवण्यासाठी सर्व मुस्लिम संघटनांनी आणि नेत्यांनी या कायद्याला विरोध करण्याची भूमिका घेतली आहे.

देशात समान नागरी कायदा लागू करण्याची जबाबदारी घटनेने राज्यांवर सोपवली आहे. त्यामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी रालोआशासित राज्यात हा कायदा लागू झालेला असेल, असे गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटले आहे. मुस्लिम आणि ख्रिश्चन समुदाय भारतात अल्पसंख्यक असले तरी आंतरराष्ट्रीय पातळीचा विचार केला तर हे समुदाय मोठ्या प्रमाणात आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या काही प्रथा आणि परंपरा आहेत. समान नागरी कायद्यामुळे त्याला छेद जाईल, अशी भीती या दोन्ही समुदायांना भेडसावते आहे. त्यामुळे या मुद्यावर हे समुदाय आक्रमक आहेत. मुस्लिम समाजाने तर रस्त्यावर उतरून समान नागरी कायद्याला विरोध करण्याची भूमिका घेतली आहे.

समान नागरी कायदा हा भाजपाच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याचा विषय आहे. भाजपाच्या स्थापनेपासून ज्या तीन मुद्यांसाठी भाजपाने सातत्याने संघर्ष केला, ते म्हणजे जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम रद्द करणे, अयोध्येतील रामजन्मभूमीवर राम मंदिराची उभारणी करणे तसेच देशात समान नागरी कायदा लागू करणे. यातील पहिल्या दोन मुद्यांसाठी भाजपाने दीर्घकाळ संघर्षही केला. २०१४ मध्ये केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर ३७० कलम रद्द झाले आणि अयोध्येत राममंदिराची उभारणीही झाली. भाजपाचे तीनपैकी दोन प्रमुख मुद्दे प्रत्यक्षात आले आहेत. भाजपाचा तिसरा म्हणजे समान नागरी कायद्याचा मुद्दा अद्याप प्रलंबित आहे.




२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या निवडणूक जाहीरनाम्यात समान नागरी कायदा हा मुद्दा होता. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ४४ मध्ये राज्याच्या धोरणाचे मार्गदर्शक तत्त्व म्हणून समान नागरी कायद्याचा समावेश करण्यात आला आहे. समान नागरी कायदा देशात लागू होणार नाही, तोपर्यंत देशातील महिलांना समान अधिकार मिळणार नाही, अशी भाजपाची भूमिका आहे.

समान नागरी कायदा देशात लागू व्हावा, ही सर्वसामान्य नागरिकाची भावना आहे. मात्र यात काही आव्हानेही आहेत. समान नागरी कायदा लागू व्हायला हिंदूंचा विरोध नाही, उलट असा कायदा लागू होणे ही काळाची गरज आहे. मात्र अल्पसंख्यक असलेल्या मुस्लिम आणि ख्रिश्चन समुदायाकडून याला विरोध होऊ शकतो. त्यामुळे समान नागरी कायद्याचा मुद्दा भाजपाला वाटतो तितका सोपा नाही.

विशेष म्हणजे या मुद्यावरून रालोआतही मतभेद असल्याचे दिसून येत आहे. तेलगू देसम हा रालोआतील सध्याचा सर्वांत मोठा पक्ष आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर तेलगू देसम रालोआत सहभागी झाला. पण रालोआत सहभागी होताना तेलगू देसमने समान नागरी कायद्याच्या मुद्यावर आपली भूमिका भाजपा नेतृत्वाकडे स्पष्ट केली होती. समान नागरी कायद्याचा मुद्दा उपस्थित झाला तर तेलगू देसम देशातील मुस्लिम समाजासोबत उभा राहील, असे तेलगू देसमचे सर्वेसर्वा आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी स्पष्ट केले होते.

समान नागरी कायद्याच्या मुद्यावर रालोआतील दुसरा मोठा पक्ष असलेल्या जदयुनेही वेगळी भूमिका घेतली आहे. या मुद्यावर आम्ही अमित शाह यांच्याशी चर्चा करू, असे जदयुचे कार्यकारी राष्ट्रीय अध्यक्ष संजय झा यांनी म्हटले आहे. केंद्रीय मंत्री असलेले लोजपाचे चिराग पासवान यांची भूमिकाही या मुद्यावर फारशी अनुकूल नाही. समान नागरी कायद्याचा मसुदा आधी सरकारने जाहीर करावा, त्यानंतर आम्ही आमची भूमिका ठरवू, असे चिराग पासवान यांनी म्हटले आहे.

समान नागरी कायदा लागू करण्याची मागणी भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी लोकसभेत केली होती. हा कायदा लागू झाला तर देशात कोणी हिंदू, मुस्लिम वा ख्रिश्चन असणार नाही तर सर्व भारतीय असतील, असे दुबे यांनी म्हटले होते.

देशाच्या वेगवेगळ्या भागात विवाह, घटस्फोट आणि वारसाहक्काबाबत वेगवेगळ्या प्रथा-परंपरा आहेत. मुस्लिम समाजात तीन तलाकसारखी अनिष्ट आणि महिलांवर अन्याय करणारी प्रथा आहे. तीन तलाकविरुद्धचा कायदा संसदेने पारित केला असला तरी मुस्लिम समाजातून तीन तलाकची प्रथा अद्याप संपली नाही. यासाठी देशात समान नागरी कायदा लागू होण्याची आवश्यकता आहे.

विशेष म्हणजे समान नागरी कायद्यामुळे आदिवासी समुदायावर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे आदिवासी समुदायातूनही या कायद्याला विरोध सुरू झाला. त्यामुळे आदिवासींना यातून वगळण्याचे आश्वासन गृहमंत्री अमित शाह यांना द्यावे लागले. शरियत कायदा ही अल्लाहची देणगी आहे. त्यामुळे आम्ही हा सोडून दुसरा कोणताच कायदा मानणार नाही, अशा इशारा मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड देत आहे. शरियत कायदा हा कुराण आणि हदीसवर आधारित आहे. त्यामुळे यात दुरुस्ती करण्याचा अधिकार जगातील कोणत्याच संसदेला नाही आणि एखाद्या संसदेने अशी दुरुस्ती केली तरी आम्ही ती मानणार नाही, असा इशारा मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड देत आहे. हा एकप्रकारे सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न आहे, असे म्हटले तर ते चूक ठरू नये.

गृहमंत्री अमित शाह यांची घोषणा हा दबाव झुगारून देण्याचा प्रयत्न आहे, यात शंका नाही. त्यामुळे सरकारने कोणत्याही जाती-धर्माच्या लोकांच्या दबावाला बळी न पडता समान नागरी कायदा देशात लागू केला पाहिजे, ती काळाची तर गरज आहेच, पण देशातील महिलांच्या दृष्टीने, मग त्या कोणत्याही धर्माच्या असो, अतिशय आवश्यक आहे. महिला आरक्षणानंतर देशातील महिलांसाठी ठरणारी ही दुसरी मोठी भेट म्हटली पाहिजे. ■

९८८१७१७८१७

## तंत्रवेध

# एआयचा फुगा की नव्या संधींचे दालन?

**डॉ. दीपक शिकारपूर**

काही वर्षांपूर्वी माहिती तंत्रज्ञान क्षेत्राकडे पाहताना 'कोडिंग शिका म्हणजे नोकरी पक्की' असा एक सोपा आणि एकसुरी मंत्र दिला जात होता. आज त्याची जागा एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) शिका म्हणजे भविष्य 'सुरक्षित' या नवीन घोषणेने घेतली आहे. अनेक विद्यार्थी, पालक, शिक्षणतज्ज्ञ आणि व्यावसायिक प्रशिक्षण संस्था कृत्रिम बुद्धिमत्तेलाच यशाची अंतिम आणि जादूची किल्ली समजू लागल्या आहेत. पण तंत्रज्ञानाचा आणि मानवी इतिहासाचा अभ्यास केला तर एक गोष्ट स्पष्ट दिसते. कोणत्याही नव्या आणि क्रांतिकारक तंत्रज्ञानाच्या सुरुवातीला अपेक्षांचा एक प्रचंड फुगा तयार होतो. काही काळानंतर तो फुटतो आणि वास्तवाची खरी परीक्षा सुरू होते. भूतकाळात इंटरनेटचे आगमन, डॉटकॉम क्रांती, ब्लॉकचेन आणि अलिकडील मेटाव्हर्सबाबत नेमकी हीच प्रक्रिया घडली होती. सुरुवातीला या तंत्रज्ञानाबद्दल अफाट उत्सुकता आणि अवास्तव दावे केले गेले, नंतर बाजारपेठ स्थिर झाली आणि केवळ खरी मूल्ये निर्माण करणारी तंत्रज्ञानेच टिकून राहिली. कृत्रिम बुद्धिमत्तेबाबतही आज नेमकी अशीच प्रक्रिया सुरू आहे. परंतु, याचा अर्थ असा मुळीच नाही की कृत्रिम बुद्धिमत्ता संपणार आहे किंवा तिचे अस्तित्व मिटणार आहे. उलट, एआय ही काळाची गरज बनून प्रत्येक उद्योगाचा, दैनंदिन कामकाजाचा आणि मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग होणार आहे. मात्र, बदलणार आहे ती नोकरी मिळवण्याची आणि टिकवण्याची धडपड. 'मला एआय वापरता येते' किंवा 'मी एआयचे टूल वापरू शकतो' एवढ्या प्राथमिक कौशल्यावर नोकरी मिळण्याचे दिवस लवकरच संपतील.

भविष्यकालीन उद्योगांना अशा व्यक्ती हव्या असतील ज्या क्लिष्ट समस्यांचे अचूक विश्लेषण करू शकतील, संकटसमयी योग्य आणि नैतिक निर्णय घेऊ शकतील, विविध क्षेत्रांमधील लोकांसोबत संघात काम करू शकतील आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ग्राहकांच्या व्यवसायाची खरी तांत्रिक आणि व्यावहारिक गरज समजू शकतील. एआय हा तंत्रज्ञानाच्या प्रवासात केवळ एक सक्षम सहायक असेल; पण माणूसच अंतिम निर्णय घेणारा, निकालांची जबाबदारी स्वीकारणारा आणि व्यवसायात प्रत्यक्ष मूल्य निर्माण करणारा अधिकारी असणार आहे. आज आयटी आणि इतर उद्योगांमधील अनेक आघाडीच्या कंपन्या स्पष्टपणे सांगत आहेत की, त्यांना केवळ कागदी पदव्या, उच्च गुण किंवा महागडी प्रमाणपत्रे नकोत तर कामाच्या ठिकाणी येणाऱ्या प्रत्यक्ष समस्या सोडवण्याची क्षमता हवी आहे. एखाद्या ग्राहकाच्या व्यवसायातील नेमकी अडचण काय आहे हे समजून घेणे, त्यावर व्यावहारिक आणि तांत्रिक उपाय शोधणे, उत्पादनाचा खर्च कमी करणे, कामाची उत्पादकता वाढवणे आणि ग्राहकाला पूर्ण समाधान देणे हीच खरी आणि शाश्वत कौशल्ये आहेत. उद्योगात दीर्घकालीन यश मिळवण्यासाठी केवळ तांत्रिक कौशल्ये पुरेशी नसतात, तर योग्य दृष्टिकोन, त्यागाची वृत्ती आणि मदतीची भावना हे गुण अत्यंत निर्णायक ठरतात. आज उद्योगांना 'मी सर्व जाणतो' या अहंकारी वृत्तीपेक्षा शिकण्याची तयारी असणारी, चुका मान्य करणारी आणि सकारात्मक विचार करणारी माणसे हवी आहेत. अडचणीच्या वेळी तक्रार करण्याऐवजी उपायांवर लक्ष केंद्रित करणारा दृष्टिकोनच कर्मचाऱ्याला उंचावर नेतो.

यशाचा कोणताही सोपा मार्ग नसतो. करीअरच्या सुरुवातीच्या काळात किंवा मोठ्या प्रकल्पांच्या वेळी आपल्या सोयीचा, वेळेचा आणि कम्फर्ट झोनचा त्याग करून जास्तीत जास्त काम शिकणे आणि जबाबदारी घेणे आवश्यक असते. कठोर परिश्रम आणि समर्पणाची तयारीच भविष्यातील मोठ्या संधींची पायाभरणी करते. आजचे मोठे प्रकल्प सांघिक प्रयत्नांवर चालतात. सहकाऱ्यांना मदत करणे, आपले ज्ञान इतरांशी वाटून घेणे आणि टीममधील प्रत्येकाला सोबत घेऊन पुढे जाण्याची वृत्ती व्यक्तीला खऱ्या अर्थाने नेतृत्वगुण मिळवून देते. संकटात सापडलेल्या सहकाऱ्याला किंवा ग्राहकाला पुढे होऊन मदत करणारा कर्मचारी किंवा अधिकारीच संस्थेसाठी खरे भांडवल ठरतो. कृत्रिम बुद्धिमत्ता काही सेकंदांमध्ये हजारो ओळींचे कोडिंग लिहू शकते किंवा माहितीचे विश्लेषण करू शकते, पण ग्राहकाची वास्तविक मानसिक आणि व्यावसायिक समस्या काय आहे, हे समजून घेण्यासाठी मानवी विचारशक्ती, सहानुभूती आणि प्रत्यक्ष अनुभवच आवश्यक असतो. हार्डवेअर आणि नेटवर्किंग तज्ज्ञांची गरज आज जगातील प्रत्येक क्षेत्रात आहे आणि ती कधीही संपणारी नाही. भारतात सध्या मोठ्या प्रमाणावर जागतिक क्षमता केंद्रे अर्थात ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स उभी राहत आहेत. बँकिंग, विमा, आरोग्यसेवा, वाहन उद्योग, औषधनिर्मिती, उत्पादन, किरकोळ व्यापार आणि ऊर्जा अशा विविध क्षेत्रांमधील जगभरातील अग्रगण्य कंपन्या भारतातून त्यांचे मुख्य संशोधन, अभियांत्रिकी, डेटा विश्लेषण, सायबर सुरक्षा आणि डिजिटल परिवर्तनाची कामे करत आहेत. याचाच अर्थ असा की, भविष्यात केवळ माहिती तंत्रज्ञानाचे ज्ञान पुरेसे राहणार नाही. ज्या तंत्रज्ञाला आयटीबरोबरच बँकिंग आणि वित्तीय सेवा, आरोग्यसेवा, उत्पादन अभियांत्रिकी, औषधनिर्मिती, पुरवठा साखळी यासारख्या प्रत्यक्ष उद्योगक्षेत्रांचे सखोल ज्ञान असेल, त्याला बाजारात प्रचंड मागणी असेल. आज भारतीय तंत्रज्ञांसाठी आणि विशेषतः माहिती तंत्रज्ञान व इंजिनीअरिंगच्या विद्यार्थ्यांसाठी जपान ही एक अभूतपूर्व सुवर्णसंधी ठरत आहे. जपानमध्ये वेगाने वृद्ध होत चाललेली लोकसंख्या, तिथल्या उद्योगांमधील डिजिटल परिवर्तनाची प्रचंड गरज आणि कुशल मनुष्यबळाची तीव्र कमतरता यामुळे भारतीय अभियंते, आयटी व्यावसायिक, नेटवर्किंग आणि हार्डवेअर तज्ज्ञ आणि सायबर सुरक्षा तज्ज्ञांसाठी दारे खुली झाली आहेत. मात्र, या संधीचा फायदा घेण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान असून चालणार नाही. विद्यार्थ्यांना जपानी भाषा आत्मसात करावी लागेल तसेच तिथली अत्यंत शिस्तबद्ध कार्यसंस्कृती, वेळेचे काटेकोर पालन आणि गुणवत्तेबाबत तडजोड न करण्याची मानसिकता अंगीकारावी लागेल. जपानप्रमाणेच जर्मनी, दक्षिण कोरिया आणि युरोपमधील इतर देशांमध्येही तंत्रज्ञानाबरोबरच स्थानिक भाषेचे ज्ञान असलेल्या कुशल व्यावसायिकांना मोठे प्राधान्य दिले जात आहे.

भविष्यात परकीय भाषा ही केवळ अतिरिक्त पात्रता राहणार नाही, तर उच्च वेतनाच्या जागतिक करीअरचे मुख्य प्रवेशद्वार ठरेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा फुगा फुटेल म्हणजे हे तंत्रज्ञान नष्ट होईल किंवा बंद पडेल असे मुळीच नाही. फुटेल तो केवळ अवास्तव अपेक्षांचा आणि चुकीच्या समजांचा फुगा. आपल्या क्षेत्राचे सखोल आणि पायाभूत ज्ञान असेल, सतत नवीन गोष्टी शिकण्याची आणि बदलण्याची वृत्ती असेल, योग्य आणि सकारात्मक दृष्टिकोन असेल, उद्योगांना प्रत्यक्ष उपयोगी पडणारी व्यावहारिक कौशल्ये असतील ते स्पर्धेत टिकतील. त्यामुळे हा इशारा किंवा वास्तव विद्यार्थ्यांना घाबरवण्यासाठी किंवा भीती निर्माण करण्यासाठी नाही, तर योग्य वेळी जागे करण्यासाठी आहे. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## रविवारची पत्रे

### तव्यावरची पोळी

'न गृहं गृहिमित्याहुगृहिणी गृहमुच्यते'

गृहिणीशिवाय घराला शोभा नाही. गृहिणी नसलेले घर अरण्यासारखे वाटते. गृहिणीमुळे घराला घरपण येते. गृहिणीला गृहलक्ष्मी म्हणून गौरवले तर जाते पण 'नाव सोनुबाई, हाती कथलाचा वाळा' अशी गृहलक्ष्मीची अवस्था असते. घरी असणाऱ्या गृहलक्ष्मीची म्हणजे फक्त गृहिणीच असणाऱ्या स्त्रियांच्या कामाची व्याप्ती 'रांधा, वाढा, उष्टी काढा' एवढ्या पुरतीच मर्यादित नसते. सकाळी उठल्यापासून रात्री सगळ्यांची निजानीज होईपर्यंत तिची कामे संपतच नाहीत. शिवाय वर 'तू तर घरीच असते' हे ऐकावे लागते.

शिक्षणाने स्त्रियांच्या मतीला गती मिळाली, कल्पनेला आकाश मिळाले आणि स्त्रिया स्वतंत्र झाल्या, सक्षम झाल्या, असे आपण म्हणतो, पण आपल्या आसपास अजूनही अनेक पुरुष असे आहेत की, जे 'रांधा, वाढा, उष्टी काढा' हे स्त्रियांचेच काम आहे असे मानतात. मग घरातील स्त्रीला बाहेर कितीही मानाचे स्थान असो! सावित्रीबाईंनी स्त्रियांना शिक्षण देऊन चूल आणि मूल हेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र आहे, या परंपरेला पहिला जोरदार धक्का दिला. जोतिबाच्या सोबतीने स्वतःची चूल सांभाळून इतर स्त्रियांच्या विझू पाहणाऱ्या चुलीतली धग प्रज्वलित केली. त्यांच्या पंखात गगनात भरारी घेण्याचे बळ दिले. पुरुषी सत्तेच्या जोखडातून स्त्रियांची मुक्तता केली. स्त्रिया मोकळा श्वास घेऊ लागल्या. असे असले तरी आजही ताजी ताजी गरम भाजी आणि तव्यावरची पोळी भाजून झाल्यावर सरळ पानात आली पाहिजे म्हणजे नवरा झाल्याचे खरे समाधान आणि आनंद मानणारे महाभाग आपल्या आसपास आजही आहेत. तव्यावरची पोळी सरळ म्हणजे सरळ त्यांच्या पानातच आली पाहिजे. तव्यावरची काढून ताटलीत ठेवली आणि मग वाढली तर त्यांच्या बायकोची गय नसते. त्यांचा तो मोठा अपमान होतो.

मोठ्या कौतुकाने ते सगळ्यांना सांगत असतात, 'मला तव्यावरची म्हणजे तव्यावरचीच गरम गरम ताजी पोळी आणि कढईतली गरम गरम ताजी भाजी लागते. आता बोला...

**अरुंधती वैद्य**/९४२०३९७५५९

■■■

### शरद पवारांचा शहाजोग सल्ला

'हतबल नेत्याची राजकीय नौटंकी' हा नागेश दाचेवार यांचा शनिवार, १९ सप्टेंबरचा संपादकीय पानावरील लेख



वाचला. लेखकाने शरद पवारांच्या आजवरच्या राजकारणाचा मांडलेला सप्रमाण लेखाजोखा, खुद्द पवारांनी वाचला तर ते स्वतःही त्यातील सत्य नाकारू शकणार नाहीत. शरद पवारांची सत्तापिपासा जबरदस्त आहे आणि ते पद आणि सत्तेपासून दूर राहूच शकत नाहीत. सत्तेसाठी कोणाबरोबरही, कधीही, कशीही तडजोड करण्यात पवारांची सदैव तयारी असते. त्यासाठी आपल्या कोणत्याही तत्त्वांना तिलांजली देण्यात त्यांना कमीपणा वाटत नाही. किंबहुना सत्ताप्राप्ती हेच त्यांच्या राजकारणाचे एकमेव तत्त्व आहे. तरुणांना राजकारणात संधी मिळाली पाहिजे असे सांगणाऱ्या शरद पवारांनी राज्यसभा जागेसाठी तेच 'तरुण' असल्याचा निष्कर्ष काढला आणि ते स्वतःच राज्यसभा खासदार झाले.

सत्तेसाठी कोलांट्याउड्या मारण्यातही ते संकोच करत नाहीत. सोनिया गांधींच्या विदेशीपणाच्या मुद्यावर काँग्रेसमधून ते बाहेर पडले आणि त्यांनी स्वतःचा राजकीय पक्ष स्थापन केला. मात्र काही वर्षांतच, सोनिया गांधींचा विदेशी मुद्दा कालबाह्य झाला आहे असे म्हणून त्यांनी सोनियांच्या नेतृत्वाखाली असलेल्या काँग्रेसबरोबर पाट लावला. शरद पवार जे सांगतात त्याप्रमाणेच ते करतील याची खात्री ते स्वतः सुद्धा देऊ शकणार नाहीत. अशी अनेक उदाहरणे देता येतील. निवडणुका जिंकण्यासाठी आणि सत्ताप्राप्तीसाठी जातिपातींवर राजकारण करणे तर पवारांच्या डाव्या हाताचा मळ आहे. सत्तेत आल्यानंतर काय बोलायचे आणि सत्ताभ्रष्ट झाल्यावर काय बोलायचे याचे शरद पवारांचे आडाखे वेगवेगळे आहेत. लेखात म्हटल्याप्रमाणे सत्तेवर असताना शेतकऱ्यांसाठी कोणतीही कल्याणकारी कामे न करता सत्ताभ्रष्ट झाल्यावर नवीन सरकारला शेतकरी कल्याणासाठी शहाजोग सल्ले द्यायला ते विसरत नाहीत. हीच बाब मराठा आरक्षणाच्या मुद्यालाही लागू पडते. मराठा समाजाने आरक्षण मागू नये असे म्हणणारे शरद पवार सत्तेतून बाहेर गेल्यानंतर मराठा आरक्षणाचे समर्थन करू लागले आहेत. अशी परस्परविरोधी वक्तव्ये करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करणे आणि त्यातून स्वपक्षाचा फायदा करून घेण्याचा प्रयत्न करणे ही पवारांची मोडी ऑपरेंडी आहे. आताही महाराष्ट्रातील महायुती सरकारमध्ये घुसखोरी करण्याचा निकराचा प्रयत्न त्यांनी केला होता. पण त्यांची डाळ शिजली नाही. तरीही त्यांनी अजूनही हार मानलेली नाही. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राचे लोकप्रिय, यशस्वी मुख्यमंत्री म्हणून सुप्रसिद्ध व्हावेत, त्यांना सहकारी पक्षांनी एकमुखी पाठिंबा द्यावा आणि फडणवीसांनी आपला कार्यकाळ पूर्ण करावा, ही गोष्ट पवारांच्या पचनी पडणारी नाही आणि म्हणूनच मंत्रिमंडळात काही नवीन जातीयवादी प्रयोग करून सत्ता मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न सुरूच राहणार आहे.

**शिवराम वैद्य**/पुणे. ९८५०५१८०१८

■■■

### 'गोंधळ' चित्रपट : संस्कृतीचं लेणं आणि मराठी मातीचा सुगंध

'फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया'ने ९९व्या अकादमी पुरस्कारांसाठी अर्थात ऑस्कर २०२७ साठी 'गोंधळ' या मराठी चित्रपटाची भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून निवड केली आहे. सुमारे अकरा वर्षांपूर्वी 'कोर्ट' या मराठी चित्रपटाला हा मान मिळाला होता. संतोष डावखर दिग्दर्शित 'गोंधळ'ने विविध भारतीय भाषांतील अनेक चित्रपटांच्या स्पर्धेत बाजी मारली. मोठ्या बजेटच्या चित्रपटांमध्येही 'गोंधळ'ने आपल्या आशयघन कथानकामुळे, भारतीय सांस्कृतिक संदर्भांमुळे आणि वैशिष्ट्यपूर्ण चित्रभाषेमुळे वेगळे स्थान निर्माण केले. यंदाच्या निवड प्रक्रियेत विविध भारतीय भाषांतील एकूण ३३ चित्रपटांचा समावेश होता. त्यात हिंदी, मराठी, तमिळ, मल्याळम, तेलुगू, गुजराती आदी भाषांतील चित्रपटांचा समावेश होता. अंतिम निवडीच्या प्रक्रियेत 'अंग', 'इक्कीस' आणि 'गोंधळ' हे चित्रपट चर्चेत होते. मात्र 'गोंधळ'मधील भारतीय गाभा, आंतरराष्ट्रीय दर्जाची सिनेमॅटिक भाषा आणि तांत्रिक गुणवत्ता यांचा विचार करून ज्युरीने या चित्रपटाची भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून निवड केली.

'गोंधळ'च्या बाबतीत सांगायचे झाल्यास, मराठी लोकसंस्कृती आणि मराठी मातीचा जिवंत आविष्कार या चित्रपटातून जाणवतो. चित्रपटाची कथा सुमन नावाच्या एका तरुणीभोवती फिरते. तिचा विवाह एका श्रीमंत कुटुंबातील तरुणाशी होतो; मात्र वैवाहिक आयुष्यात तिला समाधान मिळत नाही. तिच्या भूतकाळातील प्रेमसंबंध पुन्हा तिच्या आयुष्यात येतात आणि तिच्या भावविश्वात अनेक प्रश्न निर्माण होतात. कथानकाच्या प्रवासात सुमनची भेट 'साहेबा' नामक गोंधळी कलाकाराशी होते. वैवाहिक परिस्थितीतून बाहेर पडण्याची तिची इच्छा, प्रेम, अनामिक आकर्षण, सत्तासंबंध आणि त्यातून निर्माण होणारी फसवणूक यामुळे भावनिक गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण होते. पुढे खुनाच्या कटासह रहस्य आणि थराराची गुंफण होते. रात्रभर चालणाऱ्या गोंधळाच्या विधीच्या पृष्ठभूमीवर श्रद्धा, कपट, इच्छा आणि नातेसंबंधांतील धोका एकमेकांत गुंतत जातात.

इच्छा, संघर्ष आणि रहस्य यांची प्रभावी मांडणी दिग्दर्शकाने केली आहे. 'गोंधळ' हे शीर्षक असले तरी महाराष्ट्रातील धार्मिक विधी किंवा लोककला म्हणून परिचित असलेल्या 'गोंधळ' या परंपरेशी चित्रपटाचा थेट संबंध नाही. मात्र लोकपरंपरा आणि मानवी मनातील संघर्ष यांची सांगड घालत चित्रपट श्रद्धा, इच्छा, अपराध, मुक्ती आणि नियती यांसारख्या मानवी भावविश्वातील पैलूंना प्रतीकात्मक स्वरूप देतो. मराठी चित्रपटसृष्टीने आशयघन आणि वास्तववादी चित्रपटांच्या माध्यमातून भारतीय सिनेविश्वात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. 'श्वास', 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' आणि 'कोर्ट' यांसारख्या चित्रपटांनी मराठी सिनेमाची वेगळी ओळख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवली. आता 'गोंधळ'च्या ऑस्कर प्रवेशिकेमुळे मराठी चित्रपटसृष्टीच्या अपेक्षा आणखी उंचावल्या आहेत.

यापुढील काळात मराठी चित्रपटांना जागतिक दर्जाची चित्रभाषा, उत्तम कथा, प्रभावी छायांकन, संगीत, अभिनय आणि दिग्दर्शन यांचा समन्वय साधण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे. विज्ञान-तंत्रज्ञान, इतिहास, पर्यावरण, बदलते नातेसंबंध, शेतकरी, विद्यार्थी, स्त्री व बालहक्क, बेरोजगारी, आरोग्य, शिक्षण तसेच इतिहासातील दुर्लक्षित व्यक्तिमत्त्वे अशा विविध विषयांवर जागतिक दर्जाचे चित्रपट निर्माण होणे गरजेचे आहे. 'गोंधळ'चा ऑस्करच्या अंतिम नामांकनाच्या शर्यतीतील प्रवास अद्याप पूर्ण झालेला नसला, तरी भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून झालेली निवड ही मराठी चित्रपटासाठी निश्चितच महत्त्वाची पायरी आहे. हा प्रवास केवळ एका चित्रपटाचा नसून, मराठी मातीतील कथा, संस्कृती आणि संवेदना जागतिक पडद्यावर नेण्याच्या नव्या शक्यतांचा प्रारंभ आहे.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

■■■

### नीती आणि नियती यातील फरक

नीती म्हणे धोरण. नीतीचे सरकारी आणि खाजगी नीती असे दोन भाग पडतात. नीती किंवा नियोजन आयोग आपल्या परिचयाचा आहे. नीती म्हटले की सोबत नियम आलेच. नियमांचे काटेकोर पालन केले गेले तरच आखल्या गेलेल्या नीतीची चांगली फळे चाखायला मिळतात. नीतीला भक्कम आर्थिक पाठबळची गरज असते. कुठलेही धोरण राबविण्यासाठी टीम वर्कची गरज असते. समविचारी लोकांनी एकत्र येऊन धोरणं राबविल्यास त्याचे चांगले परिणाम बघायला मिळतात. जे जनतेसाठी लाभकारी ठरतात.

नियतीचा संबंध हा आपल्या भावभावनांशी जुळलेला असतो. आपणं चांगले काम केले. तर त्याची चांगली फळे मिळतात. वाईट काम केले तर वाईट फळे उशिराने का होईना मिळतात. नियतीपुढे कुणाचेही चालत नाही. आपण आपल्या मनातील आज्ञेनुसार चालत असतो. मन सांगेल तसे वागत असतो. हे मन अति चंचल आहे. क्षणार्धात ते संपूर्ण जग फिरून येत असते. नियती कुणाचीही पर्वा करीत नसते. नियतीच्या मनात काय आहे हे कुणीही सांगू शकत नाहीत. म्हणून माणसाने आपले जीवन आनंदाने व्यतीत करावे. सध्या गणपतीचा उत्सव सगळीकडे उत्साहात आणि धूमधडाक्यात सुरू झालेला आहे. सार्वजनिक गणपती मांडण्याच्या प्रयोजनाला हरताळ फासला गेला आहे. यात कुठलेही नियोजन नसते. प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जात नाही. निव्वळ जमा केलेला पैसा आयोजकांवर, डेकोरेशनवर आणि सांस्कृतिक कार्यक्रमाच्या नावाने डीजेवर खर्च केला जातो आहे. डीजेच्या कर्णकर्कश आवाजाचा त्रास जनतेला सहन करावा लागतो आहे. कितीही कायदे केले गेले तरीही आमच्या वर्तणुकीत काडीचाही फरक पडणार नाही. नाच, गाण्याची ऊर्जा यातून मिळत असते. डीजेच्या गाण्याच्या तालावर तरुणाई मनसोक्तपणे नाचत असते.

नीती म्हणजे धोरण आखणारेसुद्धा आपणच असतो. आणि त्याचे पालन न करणारेही आपणच असतो. नीतीचे पालन योग्य पद्धतीने न झाल्यास नियती आपले काम करीत असते. डीजेच्या आवाजाने कुणाला बहिरेपणा येऊ शकतो. तर लेझर किरणांचा वापराने कुणाला आपली दृष्टी गमवावी लागू शकते. याचा परिणाम कुणावर होईल हे सांगणे कठीण काम असते. एवढे सर्व माहीत असूनही आपण यापासून परावृत्त होत नसू तर आपण एक नागरिक म्हणून अपयशी ठरतो आहोत. तेव्हा शिक्षणातून आपल्या बालमनावर हे संस्कार करावे लागणार आहेत. ती शिक्षकांची आणि पालकांची नैतिक जबाबदारी ठरते आहे.

सण हे आनंदाने साजरे करण्यासाठी असतात. सणांमुळे कुणाला दुखापत होत असेल तर हे मान्य करता कामा नये. यासाठी कडक शिक्षेची तरतूद असली पाहिजे. यासाठी समाज प्रबोधनाचा आणि शिक्षणाचा आधार घ्यावा लागेल. दुसरा मार्ग म्हणजे कायद्याची भाषा आहे. याशिवाय दुसरा मार्ग नाही.

**मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

■■■

### 'न धरी शस्त्र, न करी मी युद्ध...'

महाभारताच्या रणसंग्रामात जेव्हा धर्म आणि अधर्माची लढाई निश्चित झाली तेव्हा भगवान श्रीकृष्णाने सांगितले की, मी हातात शस्त्र धरणार नाही फक्त सारथी होऊन मार्ग दाखवेन. यात दुर्योधनाने अफाट सेना मागून घेतली तर अर्जुनाने केवळ निःशस्त्र श्रीकृष्णाला मागून घेतले. इतिहास साक्षी आहे की शेवटी श्रीकृष्णाची रणनीती आणि बुद्धिचतुर्याने नारायणी सेनेचा पराभव झाला.

''न धरी शस्त्र करी मी गोष्टी सांगेन युक्तीच्या चार'' ही ओळ भगवान श्रीकृष्णाच्या विलक्षण प्रतिभेची आठवण करून देते. श्रीकृष्णाने स्वतः शस्त्र न उचलता धर्माच्या बाजूने उभे राहून योग्य मार्गदर्शन करून प्रेरणेची वाट दाखवली. यावरून हे निश्चित होते की जीवनाची प्रत्येक समस्या सोडवायला शस्त्राची गरज नसते. संयम, मौन आणि योग्य वेळेची प्रतीक्षा हाच विजयाचा मार्ग असतो. हजारो वर्षांपूर्वी घडलेला इतिहास आजच्या व्यावहारिक युगात प्रासंगिक वाटू लागला आहे. आजची युद्ध ही शस्त्रावर नाही तर मेंदूमध्ये आणि डिजिटल स्क्रीनवर लढली जात आहेत. आजचा विजेता तोच आहे जो कोणतीही शस्त्रे न घेता स्मार्ट वर्क करतो. आज ज्याच्याकडे अचूक माहिती आहे, डेटा आहे तोच जगावर राज्य करतो आहे, हेच आजच्या काळातील मोठे निःशस्त्र शस्त्र आहे, तंत्रज्ञानाची युक्ती श्रेष्ठ ठरते आहे.

यशाचे शिखर गाठायचे असेल तर शांत बुद्धीच्या श्रीकृष्णाची जास्त गरज आहे. आज आपल्याला शस्त्राने नाही तर डिजिटल गुन्हेगारी, मानसिक तणाव, सामाजिक असुरक्षितता या सर्वांशी लढायचे आहे. आजचा अर्जुन तोच आहे जो तंत्रज्ञान आणि ज्ञानाचा योग्य वापर करतो आणि कृष्णनीती ही आहे की जो संकटाच्या वेळी शांत राहून मार्ग काढतो आणि व्यावहारिक जगात खरा विजेता ठरतो.

**न धरी शस्त्र, न करी मी युद्ध**
**धर्माय दद्यां मम सर्व शक्तिम**
**सारथ्य रुपेण पथि प्रदर्श्य**
**पारथस्य हस्ते विजयं ददामि !!**

मी हातात शस्त्र धरणार नाही पण धर्माच्या रक्षणासाठी शक्ती अर्पण करीन आणि अर्जुनाचा सारथी होऊन त्याला योग्य मार्ग दाखवून धर्माचा विजय घडवून आणीन. असे म्हणत भगवान श्रीकृष्णांनी ते प्रत्ययास आणले. आणि म्हणूनच न धरी शस्त्र करी ही ओळ केवळ श्रीकृष्णाच्या भूमिकेची नाही तर शांतपणे, बुद्धीने, नीतीने, परिस्थिती हाताळणाऱ्या शक्तीचे प्रतीक आहे.

आज माणसाकडे साधने वाढली, संपर्क वाढला पण मनातील अंतर मात्र कमी झालेले नाही. त्यामुळे नात्यांमध्ये आणि समाजात कुठे संघर्ष करायचा, कुठे थांबायचे याचे भान महत्त्वाचे आहे. कदाचित हाच या विचाराचा आजच्या काळातील खरा अर्थ आहे. शस्त्र उचलणे ही हतबलता नाही तर रणनीती आहे हेच भगवंताला सुचवायचे असेल..

**सरिता पुराडभट**/नागपूर

■■■

### समाजजागृतीचा उत्सव

पहाटेच्या शांत वेळी घरातील देवघरात लावलेला दिवा, त्याच्या मंद प्रकाशात दिसणारी गणरायाची प्रसन्न मूर्ती आणि हात जोडून त्याच्यासमोर उभे राहिलेले कुटुंब... हा देखावा केवळ श्रद्धेचा नसतो; तो आपल्या संस्कृतीतील ज्ञान, कला, बुद्धी आणि कर्तव्य यांचा सुंदर संदेश असतो. कोणतेही शुभ कार्य सुरू करण्यापूर्वी सर्वप्रथम गणरायाचे स्मरण करण्याची परंपरा आपल्या समाजात आहे. गणरायाला विद्येची देवता मानले जात असले, तरी केवळ विद्या मिळवून उपयोग नाही; त्या विद्येचा उपयोग समाजाच्या आणि मानवतेच्या कल्याणासाठी झाला पाहिजे, असे गणराय आपल्याला शिकवतो. गणरायाचे रूपही अनेक अर्थांनी आपल्याला जीवनाचा संदेश देते. मोठे मस्तक म्हणजे व्यापक विचार करण्याची क्षमता. मोठे कान म्हणजे सर्वांचे ऐकून घेण्याची वृत्ती. लहान डोळे म्हणजे एकाग्रता. मोठे पोट म्हणजे जीवनातील चांगले-वाईट अनुभव पचविण्याची शक्ती. छोट्या उंदरावर आरूढ असलेला गणराय आपल्याला सांगतो की, शरीराने किंवा साधनांनी मोठे असणे महत्त्वाचे नाही; विचार मोठा असला की लहान वाटणारी शक्तीही मोठे कार्य करू शकते. गणरायाशी संबंधित एक कथा प्रचलित आहे. माता पार्वतीने स्नानासाठी जाताना आपल्या पुत्राला दारावर पहारा देण्याची आज्ञा दिली. गणरायाने आईची आज्ञा मनापासून स्वीकारली. काही वेळाने भगवान महादेव तेथे आले. मात्र गणरायाने त्यांनाही आत जाण्यापासून रोखले. कारण त्याच्यासाठी त्या क्षणी सर्वांत महत्त्वाची गोष्ट होती ती म्हणजे आईची आज्ञा. महादेव आणि गणराय यांच्यात युद्ध झाले. संतापाच्या भरात महादेवांनी गणरायाचा शिरच्छेद केला. हे पाहून माता पार्वती अत्यंत दुःखी आणि संतप्त झाली. आपल्या पुत्राला पुन्हा जीवनदान मिळावे, असा तिचा आग्रह होता. त्यानंतर गणरायाला हत्तीचे मस्तक लावून पुन्हा जीवनदान देण्यात आले आणि त्याला सर्व देवतांमध्ये अग्रपूजेचा मान मिळाला. या कथेकडे गणरायाने आपल्याला कर्तव्यनिष्ठेचा संदेश दिला. समोर कोण आहे, किती मोठी व्यक्ती आहे, याचा विचार न करता आपण स्वीकारलेल्या जबाबदारीशी प्रामाणिक राहणे, हा त्याच्या जीवनाचा संदेश आहे. माता पार्वतीची आज्ञा पाळताना गणरायाने स्वतःचा विचार केला नाही. म्हणूनच गणरायाच्या कथेत श्रद्धेबरोबरच कर्तव्य, निष्ठा आणि जबाबदारीचे महत्त्व दडलेले आहे.

गणेशोत्सव हा केवळ घरातील किंवा मंदिरातील धार्मिक उत्सव राहिलेला नाही. या उत्सवाला समाजजीवनाशी जोडण्याचे मोठे कार्य लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी केले. परकीय सत्तेच्या काळात भारतीय समाज अनेक जाती, भाषा आणि सामाजिक भेदांमध्ये विभागला गेला होता. लोक एकत्र आले तरी त्याकडे संशयाने पाहिले जात होते. अशा काळात सार्वजनिक गणेशोत्सव हा समाजाला एकत्र आणण्याचे प्रभावी माध्यम ठरू शकतो, हे टिळकांनी ओळखले. गणेशोत्सव साजरा करताना या इतिहासाची आठवण ठेवण्याची गरज आहे. गणपतीची मूर्ती बसविणे, आरती करणे आणि प्रसाद वाटणे ही श्रद्धेची सुंदर रूपे आहेतच; त्याबरोबरच समाजासाठी काही चांगले करणे, गरजूंना मदत करणे, पर्यावरणाची काळजी घेणे आणि नव्या पिढीला संस्कार देणे, हाही गणेशोत्सवाचा खरा अर्थ असू शकतो. ■

**वीरेंद्र सोनवणे**/पुणे. ८८८८२४४८८३

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मुळेगाव गोळीबार प्रकरणी मुख्य म्होरक्याला अटक

## पोलिस कोठडीत रवानगी; सोलापूर तालुका पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**

मुळेगाव हद्दीत व्यापाऱ्याच्या चालकावर गोळीबार करून लाखो रुपयांची रोख रक्कम लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या सराईत टोळीला पिस्टल पुरवणारा मुख्य आरोपी संदेश खंडू कांबळे (वय २६, रा. बामणी ता.जिल्हा धाराशिव ) यास सोलापूर तालुका पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून आणखी एक पिस्टल जप्त केले असून न्यायालयाने आरोपीला २१ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.




१५ जुलै रोजी रात्री ९:३० वाजेच्या सुमारास सोलापूर-हैदराबाद महामार्गावर ही थरारक घटना घडली होती. 'अॅपेक्स स्टील अॅण्ड हार्डवेअर' या कंपनीची दिवसभराची जमा झालेली कॅश घेऊन चालक एजाज तांबोळी (वय ३७, रा. कर्णिक नगर, सोलापूर) हे मालकांच्या घराकडे जात होते. त्यावेळी पांढऱ्या कारमधून आलेल्या दरोडेखोरांनी त्यांना अडवले. रिव्हॉल्व्हरमधून दोन राऊंड फायर केले. या गोळीबारातील ते गंभीर जखमी झाले होते. याप्रकरणी एजाज तांबोळी यांच्या फिर्यादीवरून सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

या गुन्ह्यात समाविष्ट असलेल्या ८ आरोपींना यापूर्वीच अटक केली आहे. त्यांच्याकडून १ पिस्टल, १ सत्तूर, गुन्ह्यात वापरलेली कार आणि २ मोटारसायकल असा मुद्देमाल जप्त केला होता. मात्र दरोडेखोरांना पिस्टल पुरवणारा मुख्य आरोपी फरार होता.

सोलापूर तालुका पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शोध घेऊन १६ सप्टेंबर रोजी त्याला जेरबंद केले. आरोपीला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला २१ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली.

पोलिसांनी त्याच्याकडून आणखी एक पिस्टल हस्तगत केले आहे. अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सोम नाथ कदम करत आहेत. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुरज जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम, पी.एस. आय. महेश घोडके, ए.एस.आय. विवेक सांजेकर तसेच पोलीस अंमलदार राहुल महिंद्रकर, शशी कोळेकर, अनंत चमके, महेश कटकदौंड, फिरोज मियावाले, पैगंबर नदाफ आणि फिरोज बारगीर यांच्या पथकाने केली आहे.



अकलूज :अकलूजमधील शेटे परिवाराने समाजप्रबोधनाचा देखावा सादर केला आहे. याकामी विशेष परिश्रम दिग्विजय शेटे, ऋषिकेश शेटे, आदित्य शेटे, पुष्कर शेटे यांनी घेतले.



अकलूज : अकलूज वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष गोपाळ गुळवे यांच्याकडे परंपरेने चालत आलेले १२५ वर्षापुर्वीचे महालक्ष्मीचे मुखवटे.




## राष्ट्रीय पोषण माह अंतर्गत कुरणवाडी-आष्टी येथे स्वागत मेळावा

**मोडनिंब, दि. १९ सप्टेंबर -**

राष्ट्रीय पोषण माह, नवचेतना आणि आधारशिला कार्यक्रमांतर्गत कुरणवाडी-आष्टी येथे स्वागत मेळावा पंचायत समितीचे अस्लम चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाला. कार्यक्रमास माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. निशिगंधा कोल्हे, माजी महिला व बालकल्याण सभापती नंदा सुर्वे, गिड्डेवाडीच्या सरपंच सुनीता गिड्डे, शेटफळच्या सरपंच लक्ष्मीबाई झुंबर-वागज, गिड्डेवाडीचे उपसरपंच विष्णू गिड्डे, माजी उपसभापती तथा मार्केट कमिटी मोहोळचे दत्तात्रय पवार आदींसह संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पुराण कथेतून संस्कृतीचे दर्शन

## प्रथमेश इंगळे; श्रीशांत लिंगेश्वर हिरेमठ येथे पुराण समाप्ती व महाप्रसाद

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ सप्टेंबर -**

पुराण कथेतून आपल्याला आपल्या संस्कृतीचे, संस्काराचे दर्शन घडते असे मनोगत श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांचे सुपुत्र प्रथमेश इंगळे यांनी व्यक्त केले.



नुकतेच कुंभार गल्लीतील श्रीशांत लिंगेश्वर हिरेमठ येथे पुराण समाप्ती सोहळा मोठ्या भक्ती भावात झाला. यावेळी प्रथमेश इंगळे यांनी शांतगुरु लिंगाराध्य शिवाचार्य महास्वामी यांचा श्री स्वामी समर्थ महाराजांचे कृपावस्त्र, प्रसाद देवून व हार घालून सत्कार केला. यावेळी प्रथमेश इंगळे बोलत होते.

आजच्या धावपळीच्या युगात तरुणांनी अशा धार्मिक कार्यक्रम ात सहभागी होणे गरजेचे आहे. शांत गुरु लिंगाराध्य शिवाचार्य महास्वामीजींना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो, असेही प्रथमेश इंगळे म्हणाले. याप्रसंगी मल्लिकार्जुन मंदिर समितीचे अध्यक्ष शिवकुमार स्वामी, महेश हिंडोळे, वीरपाक्ष कुंभार, गंगाधर कुंभार, धोंडप्पा कुंभार, शरणू कुंभार यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जलसंपदा मंत्र्यांच्या आश्वासनानंतर तुळशी ग्रामस्थांचे आंदोलन स्थगित

## सीना-माढा उपसा सिंचन योजनेत समावेशाबाबत मंगळवारी मंत्रालयात बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १९ सप्टेंबर -**

माढा तालुक्यातील तुळशी (ता. माढा) गावाचा सीना-माढा उपसा सिंचन योजनेत समावेश करावा, या मागणीसाठी सुरू असलेले उपोषण शुक्रवारी पाचव्या दिवशी तात्पुरते स्थगित करण्यात आले. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी याबाबत आश्वासन दिले आहे.



आश्वासनानंतर तुळशीतील पाणी टाकीवर चढून युवकांनी सुरु केलेले आंदोलन, शेतकऱ्यांनी सुरु केलेले उपोषण मागे घेण्यात आले. माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी उपोषणकर्ते मनोज शहा व सरपंच डॉ. शरद मोरे यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. आमदार अभिजित पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी चर्चा केली. त्यांनी मंगळवारी मंत्रालयात ग्राम स्थांसोबत बैठक घेण्याचे मान्य केले. यानंतर ग्रामस्थांनी लढा पुढे सुरूच ठेवणार असल्याचे सांगून उपोषण तात्पुरते स्थगित केले.




# आई' पर्यटन कर्ज योजनेचा महिलांनी लाभ घ्यावा

## आमदार सुभाष देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १९ सप्टेंबर -**

'आई' पर्यटन कर्ज योजनेचा लाभ घेऊन महिलांनी स्वतःचा व्यवसाय उभा करावा, कुटुंबाची आर्थिक क्षमता वाढवावी आणि बार्शी परिसरातील पर्यटन क्षेत्राच्या विकासाला हातभार लावावा, असे आवाहन आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

पर्यटन संचालनालय, प्रादेशिक पर्यटन कार्यालय, पुणे आणि लोकमंगल परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने 'आई' पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजिकांच्या सक्षम ीकरणासाठी महिला उद्योजिका कर्ज मार्गदर्शन शिबिराचे आयोजन बार्शी येथील लिंगायत बोर्डिंग सभागृहात करण्यात आले. यावेळी आमदार सुभाष देशमुख बोलत होते. मेळाव्यास महिलांचा व उद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रारंभी श्री भगवंताच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रम ाचे उद्घाटन झाले. यावेळी पर्यटन संचालनालय, पुणेचे उपसंचालक भरत लांघी, प्रकल्पाधिकारी मयूर नांद्रे, बार्शी तालुका कृषी सहाय्यक शरद पाटील, कौटुंबिक समुपदेशक सुजाता अंधारे, प्रा. वंदना यादव, लोकमंगल बँकेचे शाखेचे पालक संचालक जॉन चोप्रा, लोकमंगल पतसंस्थेचे संचालक समाधान पाटील आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात लोकमंगल बँकेचे अधिकारी सुदन सुरवसे यांनी बँकेच्या विविध शासकीय कर्ज योजना, लोकमंगल परिवाराची कार्यपद्धती आदींची माहिती दिली.

बार्शी तालुका कृषी सहाय्यक शरद पाटील यांनी प्रधानमंत्री फूड प्रोसेसिंग योजनेची सविस्तर माहिती दिली. प्रा. वंदना यादव यांनी शासकीय योजनांची माहिती अधिकाधिक नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करण्याची गरज व्यक्त केली. उपसंचालक भरत लांघी यांनी 'आई' पर्यटन कर्ज योजनेची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. पर्यटन क्षेत्रामध्ये मोठ्या प्रम ाणावर रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध असून महिलांनी या संधींचा लाभ घेऊन स्वतःची मालकीची व्यवसायिक ओळख निर्माण करावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नीता देव यांनी, तर आभार लोकमंगल बँकेचे बार्शी शाखेचे पालक संचालक जॉन चोप्रा यांनी मानले. बँकेचे शाखाधिकारी प्रविण भोसले, लोकमंगल पतसंस्थेचे विभागीय अधिकारी नितीन म्हेत्रे यांच्यासह बार्शी विभागातील लोकमंगल परिवाराच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### रामदास वडनाल



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर -**

अशोक चौक येथील रहिवासी रामदास वडनाल (वय ८४) यांचे शुक्रवारी १८ सप्टेंबर रोजी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.




# लायन्स क्लब ऑफ अक्कलकोटकडून १७ आदर्श शिक्षकांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ सप्टेंबर -**

लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट यांच्या वतीने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १७ आदर्श शिक्षकांना पुरस्कार देण्यात आला.

लायन्स क्लब ऑफ अक्कलकोटचे अध्यक्ष अभय खोबरे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले. प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतपाल राजेंद्र शहा कासवा, झोन चेअरमन स्वाम ीनाथ कलशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, अक्कलकोट उपनगराध्यक्ष बंटी राठोड, रवी पाटील, दर्गो पाटील, लायन्स क्लब ऑफ अक्कलकोटचे चेअरमन राजेंद्र हत्ते, राजशेखर कापसे, प्रभाकर मजगे, म ल्लिनाथ साखरे, सचिव शिरीष पंडीत आदी उपस्थित होते. विकास राऊत, प्रतिभा शटगार, रुद्राक्ष वैरागकर, सागर मतदेवरु, डॉ. ललिता हिंडोळे, शिवाजी साठे, रेखा पाटील, प्रशांत शिंपी, सुषमा हंचाटे, अर्चना जाधव, शहनाज कुमठे, सोनल आळंद, नवनाथ गिरी, नीलकंठेश्वर पाटील, आनंद सुतके, विलास तदैवाडी, सोनाली तोळणुरे या आदर्श शिक्षकांचा सन्मान केला.

**शिक्षक हे समाज घडवणारे शिल्पकार**

शिक्षक हे समाजाच्या जडणघडणीतील महत्त्वाचे शिल्पकार असतात. कर्तृत्ववान शिक्षकांचा सन्म ान करणे म्हणजे त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासारखे आहे.

**- अभय खोबरे, अध्यक्ष, लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट.**

# बार्शीतील दोघांवर 'एमपीडीए' अंतर्गत स्थानबध्दतेची कारवाई

**बार्शी, दि. १९ सप्टेंबर -**

बार्शी शहर पोलीस ठाणे हद्दीत गंभीर स्वरुपाचे गुन्हे केल्याचा ठपका असलेल्या दोघांविरुद्ध एमपीडीए कायद्यान्वये एक वर्षासाठी स्थानबद्धतेची कारवाई केली आहे. जिल्हा दंडाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी याबाबतचा आदेश काढला आहे. संजय विलास आरगडे, सतीश श्रीमंत आरगडे (दोघे रा. तावडी, ता. बार्शी) यांनी आपल्या साथीदारांसह बार्शी शहर पोलीस ठाणे हद्दीत खुनाचा प्रयत्न, मालमत्ता जबरदस्तीने हिसकावून घेण्याच्या उद्देशाने दुखापत आदी स्वरुपाचे गुन्हे केल्याचे नमूद केले आहे.दोघांची रवानगी पुणे येथील येरवडा कारागृहात केली आहे.

**जाहीर प्रसिद्धीकरण**

दि. कि. अर्ज नं. ५६/२०२६

**बार्शी येथील मे.सि.ज. ज्यु. डि.साहेब यांचे कोर्टात**

१) श्रीमती. श्रद्धा अक्षय गुळवे
वय- २८ वर्षे धंदा- घरकाम,
रा. येडाई विहीर, परदेशी प्लॉट, बार्शी
ता. बार्शी जि. सोलापूर
(अ.पा.क आई म्हणून अर्जदार नं. २ व ३ साठी)
२) श्रेया अक्षय गुळवे,
वय- १० वर्षे धंदा- शिक्षण, रा. सदर
३) स्वरा अक्षय गुळवे, -- **अर्जदार**
वय- ०८ वर्षे धंदा- शिक्षण, रा. सदर
४) हनुमान त्रिंबक गुळवे,
वय- ६१ वर्षे धंदा- शेती, रा. सदर
५) कल्पना हनुमंत उर्फ हनुमान गुळवे,
वय- ५७ वर्षे धंदा- घरकाम, रा. सदर

**विरुद्ध**

कोणी नाही -- **सामनेवाला**

ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ व ३ चे वडील तसेच अर्जदार नं. ४ व ५ चा मुलगा अक्षय हनुमंत गुळवे हे ता. १८/०६/२०२६ रोजी येडाई विहीर प्लॉट बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर येथे मयत झालेले आहेत. मयत अक्षय हनुमंत गुळवे यांचे पश्चात त्यांचे वारस प्रमाणपत्र अर्जदारांकडे असावे तसेच त्यांना त्यांच्या मृत्यु नंतर शासकीय कामासाठी सोयीचे व्हावे याकरीता अर्जदार यांना मयत अक्षय हनुमंत गुळवे यांच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तसेच अर्जदारांशिवाय मयतास अन्य कोणीही वारस नसल्याने त्यांना त्याबाबतचा वारस दाखला मिळणे साठी यातील अर्जदार यांनी या मे.कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अर्जदार यांचे शिवाय मयत अक्षय हनुमंत गुळवे यांचेबाबत इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि.२३/१०/२०२६ रोजी या कामी मे.कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचीही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदार यांना मयत उध्देश्वर सदाशिव चिपडे यांचे वारस असलेबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले ता. १९/९/२०२६

**सही/-**
**क. लिपिक**

(शिक्का)

**सही/-**
**सहा. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क.स्तर बार्शी**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर मंडळ**
**सिग्नलिंग काम**

निविदा सूचना क्र.: SUR-N-T-२०२६-२७-२८ दिनांक: १८.०९.२०२६ भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (सिग्नल आणि दूरसंचार), मध्य रेल्वे, सोलापूर कार्यालय हे रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट संकेतस्थळावर www.ireps.gov.in खालील कामासाठी सक्षम आणि नामांकित संस्था/कंत्राटदारांकडून ऑनलाईन ई-निविदा मागवत आहे: कामाचे नाव आणि ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर मंडळातील दौंड-वाडी विभागातील विविध स्थानकांवर ''पाथवे (रस्ता/मार्ग) पुरवणे'' संदर्भातील सिग्नलिंगचे काम. निविदा क्रमांक: SUR-N-T-२०२६-२७-२८ कामाची अंदाजित किंमत: १,००,८५,६७६.३० निविदा फॉर्मची किंमत: शून्य, बयाणा रक्कम : २,०१,७०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने निविदा बंद होण्याची तारीख व वेळ: १३/१०/२०२६ रोजी दुपारी १५:३० वाजेनंतर महत्त्वाच्या सूचना:तपशील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. काही दुरुस्ती/सुधारणा असल्यास ती फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट संकेतस्थळावरच अपलोड केली जाईल. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/टपाल/ ई-मेल/फॅक्स किंवा प्रत्यक्ष हाताने दिलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदात्यांनी कंपनीच्या नावासह वर्ग-३ डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट प्राप्त करून www.ireps.gov.in वर नोंदणी करणे आवश्यक आहे. बयाणा रक्कमेचा () भरणा नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे अथवा बँक गॅरंटीच्या ( ) स्वरूपात स्वीकारला जाईल. मूळ बँक गॅरंटी बोली सादर करण्याच्या अंतिम तारखेच्या आधी (म्हणजे बोली सादर करण्याच्या अंतिम दिवसाव्यतिरिक्त) निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या अधिकृत अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष जमा करावी. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

ANJ-33

**सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा.**

**IDFC FIRST Bank Limited**

IDFC FIRST Bank

(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**वित्तीय मालमत्तेचे सुरक्षा आणि पुनर्बांधणी आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 87083748 | मालमत्तेवर कर्ज | १. गणेश पोपट केंगार<br>२. रुपाली गणेश केंगार | 05 Aug 2026 | INR 3,69,869.05/- |

**मालमत्तेचा पत्ता:** गावठाण रहिवाशी मालमत्तेचा संपूर्ण भाग, ग्रामपंचायत मिळकत क्र. ४१२, क्षेत्रफळ १५०० चौ. फूट, मौजे: बनगार्डे, ग्रामपंचायत बनगार्डे यांच्या स्थानिक हद्दीत, तालुका: माळशिरस, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र राज्य-४१३१०९. आणि चतुः सीमा: पूर्व: रस्ता (लोंढे वस्ती), पश्चिम: श्री. नाना मारुती केंगार यांची मालमत्ता, उत्तर: श्री. तात्या मारुती केंगार यांची मालमत्ता, दक्षिण: मोकळी जागा.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 94074794 | मालमत्तेवर कर्ज | १. बालू हरी लेंगरे<br>२. हरी जगन्नाथ लेंगरे | 25 July 2026 | INR 2,46,549.53/- |

**मालमत्तेचा पत्ता ::** दगड, वीट आणि कॉंक्रीटने बांधलेल्या निवासी घराचा संपूर्ण भाग, तळमजला क्षेत्रफळ = ६२५.०० चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्रफळ = ६२५.०० चौ. फूट, एकूण जमीन क्षेत्रफळ ७५० चौ. फूट. मालमत्ता क्र. २२ सह नोंदणीकृत, मौजे: संगवी, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०२. आणि चतुःसीमा: पूर्व: गट क्र. २४ श्रीमती जिजाबाई तुकाराम शिंदे, पश्चिम: गट क्र. २५ श्री. संजय कृष्णा भोसले, उत्तर: गट क्र. ३३ श्री. रामचंद्र डांके, दक्षिण: मुख्य डब्ल्यूबीएम रस्ता.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 117348076 | मालमत्तेवर कर्ज | १. संतोष सुखदेव हिलाल<br>२. अर्चना संतोष हिलाल | 05 Aug 2026 | INR 6,68,100.37/- |

**मालमत्तेचा पत्ता :** दगड, वीट आणि कॉंक्रीटने बांधलेल्या निवासी घराचा संपूर्ण भाग, तळमजला क्षेत्रफळ = ६२५.०० चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्रफळ ( ) = ७५०.०० चौ. फूट, एकूण जमीन क्षेत्रफळ ७५० चौ. फूट. मालमत्ता क्र. ४५२ सह नोंदणीकृत, मौजे: कोर्टी, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४. आणि चतुःसीमा: पूर्व: रस्ता, पश्चिम: अण्णा लवाटे, उत्तर: आप्पा टिंगरे, दक्षिण: विठ्ठल ढोणे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 120045182 | मालमत्तेवर कर्ज | १. गणेश महादेव पवार<br>२. दिपाली गणेश पवार | 08 Aug 2026 | INR 7,28,084.42/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्र. १६८ असणाऱ्या निवासी घराचा संपूर्ण भाग, दगड, वीट आणि कॉंक्रीटने बांधलेल्या निवासी घराचे तळमजला क्षेत्रफळ = १६८५.०० चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्रफळ = १६८५.०० चौ. फूट आणि एकूण जमीन क्षेत्रफळ ४२०० चौ. फूट. मौजे: बाळे/चाळे, ग्रामपंचायत: चाळे, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४. आणि चतुःसीमा: पूर्व: ग्रामपंचायत नाला, पश्चिम: गणेश मोरे, उत्तर: ग्रामपंचायत रस्ता, दक्षिण: ग्रामपंचायत रस्ता.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | 122652974<br>&<br>164322477 | मालमत्तेवर कर्ज | १. अजीज बशीर शेख<br>२. यास्मिन अजीज शेख<br>३. बशीर दस्तगीर शेख | 29 Aug 2026 | INR 28,00,170.17/- |

**मालमत्तेचा पत्ता :** पिलिव बिनशेती () गट क्र. ७५७/२/प/८/ब मधील १७९.९४ चौ. मीटर (१९३६.८५ चौ. फूट) क्षेत्रफळ असलेल्या मालमत्तेचा संपूर्ण भाग, ज्यामध्ये पिलिव ग्रामपंचायत मिळकत क्र. १५३३ समाविष्ट आहे, मौजे-पिलिव, तालुका: माळशिरस, सातारा-पंढरपूर रस्त्याजवळ, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३१०. आणि चतुःसीमा: पूर्व: प्लॉट क्र. ८ पैकी गट क्र. १४६८/२, पश्चिम: प्लॉट क्र. ९, उत्तर: पंढरपूर-सातारा रस्ता, दक्षिण: रस्ता.

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, खाली स्वाक्षरी करणाऱ्या व्यक्तीला आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे देय रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 20/09/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### पंतप्रधान मोदींकडून खेळाडूंना शुभेच्छा



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी आयची-नागोया येथे २० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय पथकाला शुभेच्छा दिल्या. खेळाडूंच्या कठोर परिश्रमाने आणि समर्पणाने देशाला अभिमान वाटला आहे, असे ते म्हणाले. आयची-नागोया येथे आशियाड क्रीडा स्पर्धा सुरू होत असताना, माझ्या भारतीय पथकाला शुभेच्छा. प्रत्येक खेळाडूने अविश्वसनीय मेहनत घेतली आहे आणि उल्लेखनीय समर्पण व दृढनिश्चय दाखवला आहे. भारताला त्यांचा अभिमान आहे, असे पंतप्रधान मोदी यांनी 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे. त्यांनी सर्वोत्तम कामगिरी करावी, चांगला खेळ करावा आणि चमकून दिसावे! असेही ते म्हणाले. २० व्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताने विविध क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडू उतरवले आहेत. ही स्पर्धा ४ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. पुढील १५ दिवसांत ४५ देशांतील सुमारे ११,००० खेळाडू ४३ खेळ, ७१ उप-स्पर्धा आणि एकूण ४६९ सुवर्ण पदकांसाठी स्पर्धा करतील. बास्केटबॉल, फुटबॉल, क्रिकेट आणि इतर काही स्पर्धा आधीच सुरू झाल्या आहेत.

### मांडविया यांची ओसीएच्या महासंचालकांशी भेट

**नागोया :** केंद्रीय युवा व्यवहार व क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी २० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने नागोया येथे ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशियाचे (ओसीए) महासंचालक आणि वर्ल्ड ॲक्वाटिक्सचे अध्यक्ष कॅप्टन हुसेन अल-मुसल्लम यांची भेट घेतली. भारत आणि व्यापक आशियाई क्रीडा समुदाय यांच्यातील क्रीडा सहकार्य अधिक दृढ करण्याच्या मार्गांवर दोन्ही बाजूंनी चर्चा केली. भारताच्या राष्ट्रीय क्रीडा महासंघ आणि त्यांच्या संबंधित आशियाई महासंघांमधील सहकार्य वाढवणे आणि देशात जलक्रीडा अधिक विकसित करण्याचे मार्ग शोधण्यावर चर्चेत भर देण्यात आला, असे मांडविया म्हणाले. त्याचप्रमाणे तळागाळातील सहभाग वाढवणे आणि जलक्रीडा प्रकारांमधील तरुण प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी मार्ग तयार करण्यावरही चर्चेत भर देण्यात आला. विविध आशियाई-स्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्याच्या भारताच्या तयारीचे ओसीएने स्वागत केले आहे, जे संपूर्ण खंडात क्रीडा सहकार्य आणि विकास अधिक दृढ करण्याच्या सामायिक वचनबद्धतेचे प्रतीक आहे, असे त्यांनी सांगितले. मांडविया यांनी भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा यांच्यासोबत आशियाड क्रीडा स्पर्धेच्या अधिकृत स्वागत समारंभालाही हजेरी लावली. ओसीएचे अध्यक्ष शेख जोआन बिन हमद अल थानी यांनी नागोया येथे ११० व्या ओसीए कार्यकारी मंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषविले.

### मानव-मनुषचे किमान एक पदक जिंकण्याचे लक्ष्य

**नागोया :** जागतिक क्रमवारीत तिसऱ्या क्रमांकावर असलेल्या मनुष शाह व मानव ठक्कर या पुरुष दुहेरी जोडीच्या नेतृत्वाखाली, आत्मविश्वासपूर्ण भारतीय टेबल टेनिस संघाने रविवारी येथे किमान एक पदक जिंकण्याच्या लक्ष्यासह आपल्या आशियाड क्रीडा स्पर्धेला सुरुवात करणार आहे. भारतीय पुरुष संघ गट 'एफ' मधील आपला पहिला सामना इंडोनेशियाविरुद्ध खेळणार आहे आणि दुसरा सामना इराणविरुद्ध खेळेल. महिला संघ देखील गट 'एफ' मध्येच आहे सिंगापूरशी सामना करण्यापूर्वी इंडोनेशियाविरुद्ध खेळेल.

# जपानने साधला संस्कृती, नवनिर्मितीचा संगम

### रंगबिरंगी उद्घाटन सोहळ्याने प्रेक्षक मंत्रमुग्ध

### जपानचे सम्राट नारुहितो यांच्या हस्ते उद्घाटन

### 'ॲक्सेसिबल पीपल मूव्हर' मुख्य आकर्षण



आशियाड क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यात पंथसंचलनात ध्वजवाहक मनू भाकर, पवन सेहरावत व भारतीय खेळाडू

**नागोया, १९ सप्टेंबर**

येथे झालेल्या जपानच्या आयची-नागोया आशियाड क्रीडा स्पर्धेच्या रंगबेरंगी उद्घाटन सोहळ्याने अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सखोल सांस्कृतिक परंपरा यांचा सुरेख संगम साधून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. संपूर्ण आशियातील ११,००० खेळाडूंसाठी एक चैतन्यमय मंच तयार केला. 'हार्मोनिक हार्ट बीट' या संकल्पनेअंतर्गत जपानने नागोया येथे या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन केले.

जपानचे सम्राट नारुहितो यांच्या हस्ते २० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेचे अधिकृतपणे उद्घाटन करण्यात आले. दोन तास चाललेल्या उद्घाटन सोहळ्यात महाराणी मासाको, ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ आशियाचे अध्यक्ष शेख जोआन बिन हमद अल थानी व आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या प्रमुख कर्स्टी कॉव्हेंट्री प्रामुख्याने उपस्थित होते.

या सोहळ्यात हृदयाच्या आकाराचा व्यासपीठ, औद्योगिक रोबोट्स, काबुकीचे घटक आणि टोयोटाची 'ॲक्सेसिबल पीपल मूव्हर' या जपानच्या नवनिर्मितीने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

पुढील १५ दिवसांत ४५ देशांतील सुमारे ११,००० खेळाडू ४३ खेळांमधील ७१ उप-स्पर्धांमध्ये भाग घेतील आणि ४ ऑक्टोबर रोजी समारोप होईपर्यंत एकूण ४६९ सुवर्ण पदके पाहायला मिळतील. बास्केटबॉल, फुटबॉल, क्रिकेट आणि इतर काही स्पर्धा आधीच सुरू झाल्या आहेत.

**मनू-पवनच्या नेतृत्वात भारतीय खेळाडूंचे संचलन**

अव्वल नेमबाज मनू भाकर आणि कबड्डीपटू पवन सेहरावत यांच्या नेतृत्वाखाली, टाळ्यांच्या कडकडाटात भारताने खेळाडूंच्या संचलनात प्रवेश केला.

गडद निळ्या रंगाची साडी आणि बंदगला पद्धतीचे समारंभीय जॅकेट परिधान केलेल्या भाकर, सेहरावतसोबत १५० जणांच्या भारतीय तुकडीचे नेतृत्व करीत मैदानात प्रवेश करताना प्रेक्षकांना अभिवादन करताना दिसल्या.

भारतीय पुरुष खेळाडूंनीही गडद निळ्या रंगाचे बंदगला पद्धतीचे समारंभीय जॅकेट आणि त्याला जुळणारी पॅन्ट परिधान केली होती.

४६ संघांच्या संचलनात परंपरेनुसार सर्वात शेवटी आलेल्या यजमान जपानच्या अगदी आधी, ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ एशियाचा दोन निर्वासित खेळाडूंचा संघ आला. अपेक्षेनुसार, सर्वात मोठा जल्लोष जपानसाठी राखीव होता, या स्पर्धेत जपान ९०० हून अधिक खेळाडूंसह सर्वात मोठी तुकडी उतरवत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# भारताचा उपांत्य सामना बांगलादेशशी आज

**निशिन, १९ सप्टेंबर**

गतविजेता भारतीय महिला संघ रविवारी येथे आशियाड क्रीडा स्पर्धेत होणाऱ्या महिलांच्या उपांत्य सामन्यात बांगलादेशविरुद्ध आपली वर्चस्वपूर्ण कामगिरी कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल. भारताने यजमान जपानवर आठ गडी राखून सहज विजय मिळवित आपल्या विजेतेपदाच्या बचावाची सुरुवात केली. शुक्रवारी १५ षटके शिल्लक असतानाच त्यांनी लक्ष्याचा पाठलाग केला.

दुसरीकडे, ओल्या मैदानामुळे चीनविरुद्धचा उपांत्यपूर्व सामना रद्द झाल्यानंतर, बांगलादेश संघ आपल्या उच्च आयसीसी मानांकनाच्या आधारावर उपांत्य फेरीत पोहोचला आहे.

या स्पर्धेत भारताने वर्चस्व गाजवले असून, गत आठवड्यात आशिया चषकामध्ये बांगलादेशवर मिळवलेल्या ४० धावांच्या विजयासह मागील नऊ सामन्यांमध्ये विजय मिळविला आहे. बांगलादेशकडून त्यांना शेवटचा टी-२० आंतरराष्ट्रीय पराभव तीन वर्षांपूर्वी झाला होता.

जपानविरुद्ध भारताने फिरकी आणि उसळी देणाऱ्या खेळपट्टीचा पुरेपूर फायदा घेतला, ज्यात डावखुरी फिरकी गोलंदाज श्री चरणीने आशिया चषकातील आपली प्रभावी कामगिरी कायम ठेवली. तिला अर्धवेळ खेळाडू शेफाली वर्मा, अनुभवी अष्टपैलू खेळाडू दीप्ती शर्मा आणि तीन महिन्यांच्या दुखापतीनंतर पुनरागमन करणारी श्रेयंका पाटील यांनी समर्थपणे साथ दिली.

जपानविरुद्ध सलामीवीर स्मृती मंधाना व कर्णधार हरमनप्रीत कौर फलंदाजीला आल्या नाहीत, आणि शेफालीने एकहाती ५८ धावांचे लक्ष्य पार केले. या दोन वरिष्ठ फलंदाज बांगलादेशविरुद्ध मैदानात परतण्याची शक्यता आहे.

भारतीय फलंदाजीविरुद्ध बांगलादेशच्या योजनांमध्ये नाहिदा अख्तर आणि रबिया खान महत्त्वाच्या ठरतील. त्या खेळपट्टीकडून मिळणाऱ्या कोणत्याही मदतीचा फायदा घेण्याचा आणि भारताच्या आक्रमक आघाडीच्या फळीला रोखून धरण्याचा प्रयत्न करतील. अंतिम सामन्यातील स्थान पणाला लागल्याने, बांगलादेशवर नुकतेच वर्चस्व गाजवले असले तरी, भारत आत्मसंतुष्टतेपासून सावध राहील. ◂ (वृत्तसंस्था)

# भारतासमोर जपानचे आव्हान

### बॅडमिंटन स्पर्धा



**नागोया, १९ सप्टेंबर**

गत आशियाड स्पर्धेतील पुरुष सांघिक स्पर्धेत मिळविलेल्या रौप्य पदकापेक्षा एक पाऊल पुढे टाकण्याच्या उद्देशाने भारत आपल्या बॅडमिंटन मोहिमेला सुरुवात करीत आहे. रविवारी येथे आशियाड क्रीडा स्पर्धेच्या पहिल्या फेरीत पुरुषांचा सामना बांगलादेशशी, तर महिलांचा सामना कझाकस्तानशी होणार आहे. सांघिक स्पर्धेनंतर २५ सप्टेंबरपासून वैयक्तिक स्पर्धा सुरू होतील.

२०२३ मध्ये हॅण्गझोऊ येथे सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टीने पुरुष दुहेरीमध्ये ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकले होते, तसेच पुरुष सांघिक स्पर्धेत रौप्य आणि एच. एस. प्रणॉयने पुरुष एकेरीत कांस्यपदक पटकावले होते.

भारतीय पुरुष संघ आपल्या रौप्यपदकाचे सुवर्णपदकात रूपांतर करण्याचे ध्येय ठेवेल, तर महिला संघ २०१४ मध्ये इंचिओन येथे कांस्यपदक जिंकल्यानंतर दुसऱ्या सांघिक पदकाच्या शोधात असेल.

बांग्लादेशविरुद्ध भारताची पुढील फेरीत जाण्याची शक्यता आहे, परंतु उपांत्यपूर्व फेरीत त्यांचा सामना जपानशी होऊ शकतो. संभाव्य सामन्यात जागतिक क्रमवारीत १४ व्या क्रमांकावर असलेला लक्ष्य सेन, जागतिक क्रमवारीत ७ व्या क्रमांकावर असलेल्या कोडाई नाराओकाशी भिडू शकतो.

जागतिक क्रमवारीत २० व्या क्रमांकावर असलेल्या आयुष शेट्टीचा सामना स्विस ओपन विजेता व जागतिक क्रमवारीत १८ व्या क्रमांकावर असलेल्या युशी तनाकाशी होऊ शकतो, तर या हंगामात सिंगापूर व चीनमध्ये दोन विजेतेपदे जिंकलेल्या जागतिक क्रमवारीत ५ व्या क्रमांकावर असलेल्या सात्त्विक-चिरागचा सामना जागतिक क्रमवारीत ९ व्या क्रमांकावर असलेल्या ताकुरो होकी व युगो कोबाया या जोडीशी होऊ शकतो.

लक्ष्य हा भारताचा सर्वोच्च मानांकित पुरुष एकेरी खेळाडू आहे. तिसऱ्या एकेरीची जबाबदारी किदाम्बी श्रीकांतवर येऊ शकते. भारताच्या ड्रॉमध्ये चीन आणि कोरिया यांचाही समावेश आहे, याचा अर्थ उपांत्य फेरीत यापैकी कोणताही संघ असू शकतो. दुसऱ्या भागात मलेशिया, इंडोनेशिया, थायलंड आणि चीन तैपेई आहेत.

महिलांच्या बाबतीत, भारताची सुरुवात कझाकस्तानविरुद्ध होईल आणि उपांत्यपूर्व फेरीत त्यांचा सामना दुसऱ्या मानांकित जपानशी होऊ शकतो. त्या सामन्यात पीव्ही सिंधूचा सामना तीन वेळच्या विश्वविजेत्या अकाने यामागुचीशी होऊ शकतो, तर उन्नती हुडाचा सामना २०२२ ची विश्व ज्युनियर चॅम्पियन आणि सध्याची जागतिक क्रमवारीत ७ व्या क्रमांकावर असलेल्या २० वर्षीय तोमोका मियाझाकीशी होऊ शकतो.

विश्व चॅम्पियनशिप कांस्यपदक जिंकणाऱ्या त्रिशा जॉली व गायत्री गोपीचंद या महिला जोडीचा सामना जपानच्या युकी फुकुशिमा आणि मायु मात्सुमोतो या बलाढ्य दुहेरी जोडीशी होऊ शकतो.

दरम्यान, सिंधू भारताच्या प्रमुख खेळाडूंपैकी एक राहील. जुलैमध्ये जिंकलेल्या जपान ओपन सुपर ७५० विजेतेपदाच्या यशावर ती आपली कामगिरी पुढे नेण्याचा प्रयत्न करेल. ◂ (वृत्तसंस्था)

### टेकबॉलमध्ये क्विम्सीला कांस्यपदकाची आशा

**नागोया, १९ सप्टेंबर**

भारताची क्विम्सी डिसोझा टेकबॉल महिला एकेरीच्या तीन गेमच्या चुरशीच्या उपांत्य फेरीत इंडोनेशियाच्या सुमायाविरुद्ध सर्वस्व पणाला लावूनही विजय मिळवू शकली नाही, तरीही आशियाड क्रीडा स्पर्धेत कांस्यपदकाच्या शर्यतीत ती कायम आहे.

या सामन्यात सुरुवातीला मिळालेली आघाडी गमावून डिसोझा १२-७, ९-१२, ७-१२ अशी पराभूत झाली. यापूर्वी राज्यस्तरीय फुटबॉल आणि १५०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत भाग घेतलेल्या या मुंबईकर खेळाडूची ओळख ब्राझीलचा महान फुटबॉलपटू रोनाल्डिन्हो याला इंस्टाग्रामवर त्याचे कौशल्य दाखवताना पाहून टेकबॉलशी झाली. तिने हा खेळ मनापासून स्वीकारला आणि तेव्हापासून आशियाई स्तरावर स्वतःचे स्थान निर्माण केले आहे.

बंगळूरस्थित या तंत्रज्ञ खेळाडूने पहिला गेम १२-७ ने जिंकल्यानंतर सामन्यावर पूर्ण नियंत्रण मिळवले होते. तिने वक्र टेबलचा प्रभावीपणे वापर केला आणि पायांनी एकापाठोपाठ एक जोरदार तिरकस फटके मारले. मात्र, डिसोझासाठी पदकाचे स्वप्न अजूनही जिवंत आहे. ◂ (वृत्तसंस्था)

# नेमबाज लक्ष्यभेद करण्यास सज्ज



सुरुची इंदर सिंग



रुद्रनक्ष पाटील



नीरू धांडा

**नागोया, १९ सप्टेंबर**

भारत रविवारी आशियाड क्रीडा स्पर्धेतील नेमबाजी स्पर्धेत उतरणार असून, दोन वेळच्या ऑलिम्पिक पदक विजेत्या मनू भाकरच्या नेतृत्वाखालील बलाढ्य ३० सदस्यीय संघासमोर चीनकडून सर्वात मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे.

भारतीय नेमबाजांनी हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत विक्रमी २२ पदके - सात सुवर्ण, नऊ रौप्य आणि सहा कांस्य - पटकावली. या हंगामातील त्यांचे सातत्यपूर्ण प्रदर्शन, विशेषतः रायफल आणि पिस्तूल प्रकारात, यामुळे हा संघ नागोयामधील भारताच्या मोहिमेत आणखी एक महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतो, हा विश्वास दृढ झाला आहे.

सर्वांचे लक्ष साहजिकच मनूवर असेल. मनू पॅरिस ऑलिम्पिकमधील ऐतिहासिक दुहेरी कांस्यपदकाच्या कामगिरीनंतर आपल्या पहिल्या वैयक्तिक आशियाड क्रीडा सुवर्णपदकाच्या शोधात आहे. मनूची ही तिसरी आशियाड क्रीडा स्पर्धा असेल. मनू व ईशा सिंग १० मीटर एअर पिस्तूल व २५ मीटर पिस्तूल या प्रकारांमध्ये स्पर्धा करतील.

१० मीटर एअर पिस्तूल प्रकारातील मनू, ईशा आणि सुरुची इंदर सिंग या त्रिकूटामध्ये अनेक विश्वचषक सुवर्णपदके जिंकणारी सुरुची आणि भारताच्या दोन अत्यंत यशस्वी युवा खेळाडूंचा समावेश आहे. २५ मीटर पिस्तूल प्रकारात, मनू आणि ईशा यांच्यासोबत प्रचंड अनुभवी राही सरनोबत असेल, जिने २०१८ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत या प्रकारात सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला होता.

महिलांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात एलावेनिल वलारिवन, सोनम उत्तम मस्कर आणि विदर्शा के विनोद भारताचे आव्हान पुढे नेतील. २७ वर्षीय एलावेनिल या त्रिकुटामध्ये सर्वात अनुभवी असून ती उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे. ऑलिम्पियन ऐश्वर्या प्रताप सिंग तोमर व माजी विश्वविजेता रुद्रनक्ष पाटील हे पुरुषांच्या ५० मीटर रायफल ३-पोझिशन्स प्रकारात नीरज कुमारसोबत सहभागी होतील. दरम्यान, अनिश भानवाला जबरदस्त फॉर्ममध्ये दाखल झाला असून, त्याने गेल्या वर्षी कैरो येथील विश्वचॅम्पियनशिप आणि विश्वचषक अंतिम फेरीत सलग रौप्यपदके पटकावली आहेत.

पुरुषांच्या १० मीटर एअर पिस्तूल प्रकारातील संघ कमी अनुभवी आहे. एका नेमबाजाची डोपिंग चाचणी अयशस्वी ठरल्याने त्याच्या जागी संघात स्थान मिळालेले केदारलिंग उचगनवे, कमलजीत आणि आकाश भारद्वाज हे भारताचे आव्हान पेलतील.

**नीरू धांडाकडून अपेक्षा**

शॉटगन प्रकारात, नीरू धांडा हे लक्ष ठेवण्याजोग्या नावांपैकी एक असेल. इटलीतील लोनाटो येथे नुकताच मिळालेला तिचा विश्वचषक विजय - जिथे ती ट्रॅप प्रकारात वैयक्तिक विश्वचषक सुवर्णपदक जिंकणारी पहिली भारतीय महिला ठरली. ◂ (वृत्तसंस्था)

# भारतीय पुरुष हॉकी संघ नव्या दमाने सुरुवात करण्यास उत्सुक

**महिला संघ विजयी लय कायम ठेवण्यास सज्ज**







**काकामिगहारा, १९ सप्टेंबर**

आशियाड क्रीडा स्पर्धेतील हॉकी स्पर्धा रविवारी येथे सुरू होत असताना, भारतीय पुरुष हॉकी संघ अलीकडील वाईट कामगिरीतून सावरण्याचा प्रयत्न करेल, तर महिला संघ नुकत्याच झालेल्या विश्वचषकात मिळवलेल्या महत्त्वपूर्ण यशाच्या जोरावर आपली कामगिरी उंचावण्याचा प्रयत्न करेल.

दोन्ही भारतीय संघांसाठी ही स्पर्धा खूप महत्त्वाची आहे, कारण आशियाड क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकल्यास त्यांना लॉस एंजेलिस २०२८ ऑलिम्पिकसाठी थेट प्रवेश मिळेल. चार वेळा विजेता असलेल्या भारतीय पुरुष संघाला नेदरलँड्स व बेल्जियममध्ये नुकत्याच झालेल्या एफआयएच विश्वचषकात आठव्या क्रमांकावर राहिल्यानंतर आपले मनोधैर्य वाढवावे लागेल.

दोन वेळचे ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता भारत संघ 'अ' गटात यजमान जपान, कोरिया, बांगलादेश, श्रीलंका आणि इंडोनेशियासोबत आहे, तर 'ब' गटात पाकिस्तान, मलेशिया, चीन, ओमान, उझबेकिस्तान आणि थायलंड यांचा समावेश आहे.

भारत आपल्या मोहिमेची सुरुवात इंडोनेशियाविरुद्ध करेल, हा सामना ते मोठ्या फरकाने जिंकतील अशी अपेक्षा आहे.

स्पर्धेत आठव्या क्रमांकावर असलेला सर्वोच्च संघ असल्याने, भारतीय पुरुष संघ सुवर्णपदकासाठी प्रबळ दावेदार आहे, परंतु ते साध्य करण्यासाठी त्यांना त्या त्रुटी दूर कराव्या लागतील, ज्यामुळे त्यांच्या विश्वचषक आशा संपुष्टात आल्या होत्या.

मुख्य प्रशिक्षक क्रेग फुल्टन यांच्या मार्गदर्शनाखालील भारतीय संघाची खरी कसोटी साखळी सामन्यांमध्ये जपान आणि कोरियाविरुद्ध असेल. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील संघ जपानमध्ये नव्या सुरुवातीच्या दृष्टीने आपल्या अलीकडील आंतरराष्ट्रीय अनुभवांचा उपयोग करण्याचा प्रयत्न करेल. अनुभवी मनप्रीत सिंग, कर्णधार हरमनप्रीत, बचावपटू अमित रोहिदास आणि स्ट्रायकर मनदीप सिंग यांसारख्या काही भारतीय खेळाडूंसाठी ही त्यांची शेवटची आशियाई क्रीडा स्पर्धा असण्याची शक्यता आहे. इंडोनेशियानंतर, भारतीय पुरुष संघ २२ सप्टेंबरला श्रीलंका, २४ सप्टेंबरला दक्षिण कोरिया, २६ सप्टेंबरला जपान आणि २८ सप्टेंबरला बांगलादेश यांच्याशी सामना करेल.

**महिलांसाठी चीन हा सर्वात मोठा धोका**

दुसरीकडे, ५२ वर्षांतील सर्वोत्तम विश्वचषक कामगिरी करत पाचवे स्थान पटकावल्यामुळे भारतीय महिलांचा संघ आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेला असेल. या वर्षाच्या सुरुवातीला मुख्य प्रशिक्षकपदी परतलेल्या स्योर्ड मारिन यांच्या मार्गदर्शनाखाली महिला संघानेही नव्याने विकासाचा टप्पा गाठला आहे.

भारतीय महिलांचा संघ उझबेकिस्तान, इंडोनेशिया, थायलंड, जपान आणि सिंगापूर यांच्यासोबत 'ब' गटात आहे आणि ते आपल्या मोहिमेची सुरुवात उझबेकांविरुद्ध करतील, जो सामना त्यांनी सहज जिंकायला हवा. परंतु या स्पर्धेत चीन हा भारतासाठी सर्वात मोठा धोका आहे. पॅरिस ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता आणि जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेला चीन या स्पर्धेत विजयाचा स्पष्ट दावेदार आहे आणि जागतिक क्रमवारीत आठव्या क्रमांकावर असलेल्या भारतापेक्षा तो सर्वोच्च मानांकित संघ आहे. उझबेकिस्ताननंतर, भारतीय महिला संघ २१ सप्टेंबरला इंडोनेशिया, २३ सप्टेंबरला थायलंड, २५ सप्टेंबरला जपान आणि २७ सप्टेंबरला सिंगापूरविरुद्ध खेळेल.

कर्णधार सलीमा टेटेच्या नेतृत्वाखाली भारतीय महिलांचा संघ २०२२ च्या हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदकाच्या कामगिरीत सुधारणा करून आपल्या दुसऱ्या आशियाड क्रीडा सुवर्णपदकासाठी आव्हान देण्याचे ध्येय ठेवेल. ◂ (वृत्तसंस्था)

### बुलढाण्याच्या मिहीरचा 'सुवर्णभेद'

**बुलढाणा, १९ सप्टेंबर**

येथील मिहीर नितीन अपार याने राष्ट्रीय तिरंदाजीच्या मैदानावर पुन्हा एकदा अचूक लक्ष्यवेध साधला आहे. जम्मू-काश्मीरमधील कटरा येथे सुरू असलेल्या तिसऱ्या एनटीपीसी राष्ट्रीय तिरंदाजी स्पर्धेत त्याने वरिष्ठ पुरुष कम्पाऊंड गटात त्याने सुवर्णपदक पटकावले. देशभरातील अव्वल तिरंदाजांच्या उपस्थितीत मिळविलेल्या या यशामुळे मिहीरने वरिष्ठ गटातील राष्ट्रीय विजेतेपदावर आपले नाव कोरले.

ही स्पर्धा १२ ते २१ सप्टेंबर दरम्यान आयोजित करण्यात आली आहे. मिहीरने या गटात आधुनिक कम्पाऊंड धनुष्याचा वापर केला जातो. लक्ष्यापासून निर्धारित अंतरावरून अत्यंत कमी फरकाने गुण ठरत असल्याने प्रत्येक बाणातील अचूकता, मानसिक एकाग्रता आणि दबावाखाली कामगिरी करण्याची क्षमता निर्णायक ठरते.

मिहीर हा बुलढाण्यातील शिवबा आर्चरी अकादमीचा खेळाडू असून, प्रशिक्षक चंद्रकांत इलक यांच्या मार्गदर्शनाखाली तो दीर्घकाळापासून सराव करीत आहे. राष्ट्रीय क्रमवारी स्पर्धेतील सुवर्णपदकामुळे वरिष्ठ गटातील त्याची दावेदारी अधिक भक्कम झाली आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

# दक्षिण कोरिया डेव्हिस चषकाच्या अंतिम फेरीत

### भारतावर ३-१ ने विजय

**सेऊल, १९ सप्टेंबर**

शनिवारी भारताविरुद्धचा सामना ३-१ ने जिंकून दक्षिण कोरिया डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेच्या अंतिम ८ मध्ये पोहोचणारा पहिला आशियाई देश ठरला आहे.

शुक्रवारी झालेल्या दोन्ही एकेरी सामन्यांमध्ये एक सेट गमावल्यानंतर दक्षिण कोरियाने पुनरागमन करीत २-० अशी आघाडी घेतली होती.

शनिवारी झालेल्या पहिल्या दुहेरी सामन्यात पराभव पत्करल्यानंतर, सूनवू क्वानने पहिल्या परतीच्या एकेरीच्या सामन्यात सुमित नागलला ६-१, ६-२ असे हरवून दक्षिण कोरियाला नोव्हेंबरमध्ये इटलीतील बोलोग्ना येथे होणाऱ्या डेव्हिस चषकाच्या अंतिम फेरीत पोहोचविले. ◂ (वृत्तसंस्था)



## महत्वाचे...



## एस.पी.स्कूलच्या वेदांत वलगेची इस्त्रो अभ्यास दौऱ्यासाठी निवड

**करकंब, दि.१९ सप्टेंबर-**

उत्तुंगतेज फाउंडेशनच्या उत्तुंग तेज बालवैज्ञानिक परीक्षेमधून पायल फाउंडेशन संचलित एस.पी.स्कूल व वेदांता अकॅडमी नांदोरे ता.पंढरपूर येथील इ.९वीचा विद्यार्थी वेदांत वलगे याची इस्त्रो अहमदाबाद व आयआयटी गांधीनगर येथील अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून ८० विद्यार्थ्यांची निवड या अभ्यास दौऱ्यासाठी केली जाते. नांदोरेसारख्या ग्रामीण भागातून निवड झालेला वेदांत हा पहिला विद्यार्थी ठरला आहे. या उल्लेखनीय निवडीमुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा पुन्हा एकदा प्रत्यय आला. यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष डॉ.संतोष वलगे, सचिव अश्वराज वाघ, सहसचिव बाळासाहेब चव्हाण, खजिनदार विक्रम भिंगारे, प्रकल्प संचालिका वासंती वलगे, मुख्याध्यापिका स्वाती चव्हाण, उपमुख्याध्यापक कुणाल निंबाळकर, स्टेट विभागप्रमुख साईनाथ कुंभार, फाउंडेशन विभागप्रमुख विकास तिवारी, सीबीएसई कॅम्पस प्रमुख सचिन डोके तसेच शिक्षकवृंदांनी वेदांतचे अभिनंदन केले आहे.



## महापौर कोंड्याल यांच्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ नागरिकांसाठी अन्नदान

**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत जुनी मिल चाळ गणेशोत्सव मंडळ (जीएमसी तरुण मंडळ) यांच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी राबविण्यात येणाऱ्या अन्न तृप्ती योजनेसाठी अन्नधान्याचे अन्नदान करण्यात आले. मंडळाच्या वतीने २५ पोते गहू, ५ पोते तांदूळ आणि २ तेलाचे डबे आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. कार्यक्रमास मंडळाचे आधारस्तंभ डॉ. सूर्यप्रकाश कोठे तसेच नगरसेवक प्रथमेश कोठे यांची प्रमुख उपस्थिती होती. जुनी मिल चाळ गणेश उत्सव तरुण मंडळ, मुरार गणपती प्रतिष्ठान अध्यक्ष किशोर ढेकळे, उपाध्यक्ष राहुल ठावरे, दीपक मेंबर राजगे, बाळासाहेब ढेकळे,भोजराज माने,मल्लू सकट, सुरेंद्र शिंदे, अक्षय कोथिंबीरे, महेश चोरमुले ,विशाल गायकवाड, राहुल पवार,सौरभ वाघमारे, अमोल शिंदे, दीपक ढेकळे, गोपाल झिंगड़े, अमित लामकाने शंकर माढेकर, गजेंद्र बांदेवाडेकर, बसु कोळी, सतीश गुंड, ओम चोरमुले, साई राऊत, जय चोरमुले, राजेंद्र शिंदे, विकी बाबा सूर्यवंशी, अमर वाघमोडे, बाळासाहेब ढेकळे, रुपेश अंधारे उपस्थित होते.




## श्री विठ्ठल-रुक्मिणी, महालक्ष्मी व राधिका मातेस पारंपरिक सुवर्ण अलंकार

**पंढरपूर, दि.१९ सप्टेंबर -**

श्री गौरी विसर्जन निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात श्री विठ्ठल, रुक्मिणी माता व महालक्ष्मी मातेस तसेच राधाष्टमीनिमित्त राधिका मातेस आकर्षक व पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान करण्यात आले.

श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, दंडपेट्या, हिऱ्याचे कंगन, बालाजी नाम शिरपेच, मोत्याचा तुरा, मोत्याच्या कंठ्या, मोहनमाळ, तुळशीची माळ, नवरत्नांचा हार आदी पारंपरिक सुवर्ण अलंकार परिधान केले आहेत. रुक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, वाक्या-तोडे, ताणवड, चिंचपेटी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार आदी अलंकारांनी सजवले आहे. महालक्ष्मी मातेस सोन्याचे गंठण, एकपदरी मोत्याची कंठी, नेकलेस, शिरपेच, अष्टपैलू मण्यांची कंठी व लक्ष्मी लॉकेट आदी अलंकार परिधान केले आहेत. राधिका मातेस नक्षी टोप, मोत्याचा कंठा, मोत्याचे मंगळसूत्र, हिरवी चिंचपेटी, ठुशी व पुतळ्यांची माळ आदी अलंकार परिधान केल्याचे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी सांगितले.




**टेंभुर्णी : सानिका भोसले हिने गौराईसमोर साकारलेली आकर्षक व कलात्मक रांगोळी.**

# पांडुरंग ऊसभूषण पुरस्काराचे विलास कांबळे मानकरी

## १७ शेतकऱ्यांना कर्मयोगी आदर्श पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १९ सप्टेंबर -**



श्रीपूर येथील कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यामार्फत दिले जाणारे ऊस पुरस्कार जाहीर झाले आहेत. विलास कांबळे वाखरी (देगांव गट) यांना जमिनीची सुपीकता टिकवून अधिक ऊस उत्पादन घेतल्याबद्दल 'पांडुरंग ऊस भूषण' पुरस्कार जाहीर झाला आहे.

कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक यांनी ही माहिती दिली. 'पांडुरंग ऊस भूषण' पुरस्काराचे स्वरुप १ लाख हजार १११ रुपये, स्मृतीचिन्ह असे आहे. तसेच कारखान्याच्या ७ गटातून १७ ऊस उत्पादक सभासदांना २५ हजार १११ रुपये व स्मृती चिन्ह देवून कर्मयोगी आदर्श शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. दि. २१ सप्टेंबर रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेत पुरस्कारांचे वितरित करण्यात येणार आहे

कारखान्याचे संस्थापक सुधाकरपंत परिचारक यांनी शेतकरी हित ज्या प्रकारे जोपासले तो आदर्श घेत आम्ही ऊस उत्पादक सभासदांसाठी कमी क्षेत्रात, कमी पाण्यात, कमी खर्चात, सेंद्रीय खतांचा जास्त वापर, उत्तम गुणवत्ता असणारा, जादा साखर उताऱ्याचा ऊस निर्माण व्हावा यासाठी स्पर्धा चालू केली आहे. सभासदांचा यास चांगला प्रतिसाद मिळत असल्याचेही परिचारक यांनी सांगितले. कारखान्याच्या ७ गटांमधून प्रत्येक हंगामासाठी आडसाली, सुरू, पूर्वहंगामी ऊसास प्रत्येक गटामध्ये एकूण चार पुरस्कार देण्यात येणार आहेत.

यावेळी कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी ही स्पर्धा गेली आठ वर्षांपासून मा. आ. सुधाकरपंत परिचारक यांच्या संकल्पनेतून व कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. स्पर्धेतील शेतकऱ्यांना कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, केन मॅनेजर संतोष कुमठेकर व शेती अधिकारी सोमनाथ भालेकर यांनी विविध स्तरावर मार्गदर्शन केले.

### कर्मयोगी आदर्श शेतकरी पुरस्काराचे मानकरी

नागन्नाथ पवार- उंबरगांव, राजनाबाई कांबळे - खर्डी, शिवाजी रोंगे - खर्डी, माधव जाधव- रोपळे, श्रीकांत घाडगे- अजनसोंड, सरोजनी भुसनर - शिरढोण, उत्तम घाडगे - अजनसोंड, लिंगेश्वर पिसे - सरकोली, कृष्णा नागणे - कोंढारकी, संजय देठे - धोंडेवाडी , दिपक यलमर-सुपली, सुवर्णा तळेकर - भोसे, नानासो नाईकनवरे-पट.कुरोली, मुरलीधर बंडगर - करोळे, राजेंद्र शिंदे-कान्हापुरी, तानाजी मुळे - उंबरे पा., जयसिंह पाटील - बोरगांव

## पिलीव परिसरात ऐन सणासुदीत विजेचा लपंडाव

### सणांच्या आनंदावर विरजण; विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि. १९ सप्टेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव परिसरात गौरी-गणपतीच्या सणाचा उस्ताह सुरु असतानाच वारंवार वीजपुरवठा खंडीत होत आहे. एरवी शेती, उद्योगांना वीजेअभावी होणारा त्रास आता सण साजरे करण्याबाबतही होतज असल्याने नागरिकांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

यंदा भीषण दुष्काळी परिस्थिती आहे. पिण्याच्याा तसेच शेतीच्या पाण्याची अवस्था अतिशय बिकट आहे. पाणी काढण्यासाठी विजेची गरज आहे. मात्र सकाळी पाच ते दहा वाजेपर्यंत लोडशेडिंग चालू आहे. शेती पंपासाठी रात्री वीजपुरवठा केला जात असल्याने शेतकऱ्यांना रात्रभर वारंवार वीज खंडित होत सिंचनासाठी जागावे लागत आहे. विशेष म्हणजे कोणतीही पुर्वसूचना न देता अचानकच वीजपुरवठा खंडीत केला जातो.

हिंदु संस्कृतीमधील गौरी-गणपतीसारख्या सणाला तरी नियमीत विजपुरवठा होणे आवश्यक असताना महावितरणचे कसलेच नियोजन नाही. विज बिल वेळेवर घेतले जाते मग विजपुरवठा वेळेवर करणे कोणाचे काम आहे असा प्रश्न नागरिकांमधून विचारला जात आहे. मुलांना अभ्यासाला बसायचे म्हटल्यास सकाळी व रात्रीही वीजच नसते. परिणामी मुलांच्या अभ्यासाचाही खेळखंडोबा झाला आहे. वयोवृद्ध, आजारी व्यक्ती यांनाही वीजेअभावी उकाडा, डास याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी भारनियमाबाबत महावितरणच्या अधिकाऱ्यांना सक्त ताकीद दिली होती. मात्र तरीही महावितरणच्या कारभारात सुधारणा व्हायच्या ऐवजी भारनियमन वाढलेच आहे.

## 'फॅबटेक' मध्ये अॅडव्हान्स्ड डेटाबेस कॉन्सेप्टवर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१९ सप्टेंबर-**

फॅबटेक कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक, सांगोला येथे कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी अॅडव्हान्स्ड डेटाबेस कॉन्सेप्ट या विषयावर प्रा.मोहसीन शेख यांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आधुनिक डेटाबेस तंत्रज्ञानातील डेटा वेअरहाऊस, डेटा लेक, डेटा मायनिंग, बिग डेटा, मोंगोडीबी आणि डायनॅमोडीबी या विविध संकल्पनांची माहिती दिली. हे व्याख्यान मोठ्या उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा.दिपाली मोरे, सूत्रसंचालन प्रा.चैताली जाधव व यशस्वी करण्यासाठी कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

## रॅगिंगमुक्त आणि सुसंस्कृत कॅम्पससाठी विद्यार्थ्यांनी सज्ज राहावे : डॉ. महाजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**



महाविद्यालयीन जीवन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच करिअर घडविण्याचा महत्त्वाचा टप्पा आहे. या काळात रॅगिंगसारख्या चुकीच्या प्रवृत्तींपासून दूर राहून महाविद्यालयाचा परिसर सुरक्षित, सुसंस्कृत आणि रॅगिंगमुक्त ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांनी सजग राहावे, असे आवाहन प्रा. डॉ. विजया महाजन यांनी केले.

वसुंधराकलामहाविद्यालयातील अँटी रॅगिंग समितीच्या वतीने 'अँटी रॅगिंग : कायदा आणि सुशासन' विषयावर आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. रॅगिंग ही केवळ शिस्तभंगाची बाब नसून विद्यार्थ्यांच्या मानवी प्रतिष्ठेशी संबंधित गंभीर बाब आहे. गंमत म्हणून केलेल्या कृतीचाही समोरच्या विद्यार्थ्याच्या मानसिकतेवर, शैक्षणिक प्रगतीवर आणि भवितव्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येकाने कायद्याचे पालन करून दुसऱ्याच्या स्वातंत्र्य, सन्मान आणि सुरक्षिततेचा आदर करावा, असे त्यांनी सांगितले. डॉ. संगीता भोसले यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. सुहास उघडे, तर आभार डॉ. मारोती घंटेवाड यांनी मानले.



## सहस्रार्जुन प्रशालेच्या मुलींना विजेतेपद

### नेहरू हॉकी स्पर्धेत आय.एम.एस. इंटरनॅशनल स्कूलचा पराभव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य अंतर्गत सोलापूर महानगरपालिका क्रीडा अधिकारी यांच्यामार्फत आयोजित केलेल्या नेहरू हॉकी स्पर्धेत सहस्रार्जुन प्रशालेच्या मुलींच्या संघाने यंदाच्या वर्षीही आपले वर्चस्व कायम राखत दिमाखदार विजय मिळवला आहे.

नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर झालेल्या अत्यंत चुरशीच्या झालेल्या अंतिम सामन्यात सहस्रार्जुन प्रशालेने आय.एम.एस. इंटरनॅशनल स्कूलचा २-० अशा एकतर्फी गोलफरकाने पराभव केला. प्रशालेच्या शेषाद्री मोघे हिने १ गोल तर तपस्या झिपरे हिने १ गोल करत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. संपूर्ण सामन्यात सहस्रार्जुनच्या खेळाडूंनी आक्रमक आणि उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन घडवत उपविजेत्या संघाला कोणतीही संधी दिली नाही. संघास क्रीडा शिक्षक डॉ. उज्ज्वल मलजी, राघवेंद्र बळेभावी आणि राहुल पवार यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजूसा भुमकर, सचिव गजाननसा गोयल, सदस्य अनिल रंगरेज, रामूसा पवार, मुख्याध्यापक मोरेश्वर काटवे, मुख्याध्यापिका मंजुषा काशीद यांनी सर्व यशस्वी खेळाडूंचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून पुणे विभागीय स्पर्धेस सदिच्छा दिल्या.

### विजयी संघातील खेळाडू

संघनायक कल्याणी नागणसूरे, गोलकीपर श्रेया हाऊजी, पूर्वा हक्के, रूपा सुतार, तपस्या झिपरे, शेषाद्री मोघे, वर्षाराणी गोरकल, श्रावणी गंदुरे, श्रुती मिश्रा, संस्कृती माखणे, दृष्टी बसले, अंकिता पारवे, अक्षता बुद्याळ, संस्कृती वायकर, शुभांगी पुपल आणि कार्तिकी शिंदे.




## शिंदे साहेब विद्यालयाचा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सांगोला, दि. १९ सप्टेंबर-**

सांगोल्यातील वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालयाचा ४० वा वर्धापन दिन साजरा झाला. यावेळी उद्धव पाटील यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस संस्थापक वामन शिंदे व माता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन पंचायत समिती सदस्या राणी पाटील, गिरीश नष्टे, संस्थाध्यक्षा कौशल्यादेवी शिंदे, किशोर बनसोडे, मुख्याध्यापक विठ्ठलपंत शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे सचिव नीलकंठ शिंदे यांनी संस्थेची उद्दिष्टे, शैक्षणिक, सामाजिक कार्याचा आढावा घेतला. याप्रसंगी किशोर बनसोडे, गिरीश नष्टे, भालके व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी वर्धापन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक संतोष कुंभार यांनी केले.




## राष्ट्रउभारणीत अभियंत्यांचे योगदान मोलाचे

### राजशेखर शिवदारे; लायन्स अभियंता गौरव पुरस्कार सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

अभियंता दिनाच्या निमित्ताने अभियंत्यांचा गौरव करण्याची परंपरा जपत लायन्स क्लब ऑफ सोलापूर सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून दिलेले लायन्स अभियंता गौरव पुरस्कार मोलाचे आहेत कारण देशाच्या विकासात आणि राष्ट्रउभारणीत देशातील अभियंत्यांनी उल्लेखनीय योगदान दिलेले आहे, असे प्रतिपादन स्वामी समर्थ सूत मिलचे चेअरमन राजशेखर शिवदारे यांनी केले.

लायन्स क्लब ऑफ सोलापूर व लिओ क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने अभियंता दिनाचे औचित्य साधून 'लायन्स अभियंता गौरव पुरस्कार' सोहळ्याच्या प्रसंगी ते बोलत होते. आपल्या मनोगतात भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या अतुलनीय कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. प्रारंभी लायन्स क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष मंजुनाथ दर्गोपाटील यांनी प्रास्ताविक केले.

अकबर मुल्ला यांनी अतिथीचा परिचय करून दिला. हॅच फ्री मेसोनिक हॉल येथे उत्साहात संपन्न झालेल्या या सोहळ्यात राजशेखर शिवदारे यांच्या हस्ते इंजि. सुमित कांकरीया, इंजि. परिमल शहा, आर्कि. उमेश हेडगीरे, इंजि. अविनाश बिडवे आणि इंजि. सुशांत माशाळकर यांना अभियंता क्षेत्रातील कार्याबद्दल शाल, श्रीफळ , हार व सन्मानपत्र देऊन लायन्स अभियंता गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अण्णासाहेब कोतली, संतोष काबरा, सुनील पाचकवडे, श्रीकांत सोनी व महेश कारंडे यांनी पुरस्कार प्राप्त अभियंत्याचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन सेवाकार्य प्रमुख इंजी. भगवान जाधव यांनी केले तर सचिव विकास पाटील यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी क्लब मधील अभियंत्यांचाही सन्मान करण्यात आला. प्रांतपाल राजेंद्र शहा कासवा यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. यावेळी कोषाध्यक्ष धनराज कोरे-पाटील, लिओ क्लबचे अध्यक्ष लिओ उज्वल सावळगी, झोन चेअरमन अमिता कारंडे, रंजना शहा, अभय सुराणा, रमेश जैन, कल्पेश मालू , सुरेश जाजू नरेंद्र गंभिरे, बसवराज कुलकर्णी, संतोष चव्हाण उपस्थित होते.

## आजची शेती उद्याच्या पर्यावरणाचे संरक्षण करणारी असावी



**कृषी विशेष-भाग ४**

पर्यावरणपूरक शेतीचा स्वीकार करताना अंधानुकरण न करता स्थानिक परिस्थिती + आधुनिक विज्ञान + शेतकरी अनुभव + डिजिटल तंत्रज्ञान + बाजारपेठ यांचा समन्वय आवश्यक आहे. शेवटी असे म्हणता येईल की, आजची शेती ही उद्याच्या पर्यावरणाची किंमत मोजून केली जाऊ नये; उलट आजची शेतीच उद्याच्या पर्यावरणाचे संरक्षण करणारी असली पाहिजे. पर्यावरणपूरक शेती ही शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची, नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनाची आणि भावी पिढ्यांच्या अन्नसुरक्षेची एकत्रित दिशा आहे. म्हणूनच ती पर्याय नसून शाश्वत कृषी विकासाची अपरिहार्य गरज आहे.

### लहान व सीमांत शेतकरी

भारतातील अनेक शेतकरी लहान क्षेत्रावर शेती करतात. त्यामुळे महाग तंत्रज्ञान किंवा मोठी प्रारंभिक गुंतवणूक सर्व शेतकऱ्यांना शक्य असेलच असे नाही.

### संशोधनासाठी आवश्यक नवीन दिशा

भविष्यात पर्यावरणपूरक शेतीच्या संदर्भात पुढील विषयांवर अधिक संशोधनाची आवश्यकता आहे. वेगवेगळ्या शेती पद्धतींचा १०-२० वर्षांच्या कालावधीत मृदा सेंद्रिय कर्ब, सूक्ष्मजीव, उत्पादनक्षमता आणि आर्थिक परतावा यावर होणारा परिणाम अभ्यासणे आवश्यक आहे.

### हवामान बदल आणि पीक प्रणाली

वेगवेगळ्या हवामान परिस्थितींमध्ये कोणत्या पीक पद्धती अधिक लवचिक ठरतात याचे स्थानिक पातळीवर संशोधन आवश्यक आहे. जमिनीमध्ये कार्बन साठवणूक वाढवणाऱ्या पद्धतींचे वैज्ञानिक मापन, शेतकऱ्यांना मिळणारे संभाव्य आर्थिक लाभ आणि कार्बन बाजाराशी त्यांचा संबंध यावर संशोधन आवश्यक आहे.

### डिजिटल पर्यावरणपूरक शेती

I, remote sensing, sensors Am{U data analytics यांचा वापर करून पाणी, खत आणि कीडनियंत्रणातील अचूकता वाढविण्याची मोठी संधी आहे.

### शाश्वत शेतीसाठी एकात्मिक कृती आराखडा

पर्यावरणपूरक शेतीचा प्रभाव वाढवण्यासाठी शेत पातळीवर पुढील क्रमाने नियोजन करता येऊ शकते. पहिला टप्पा - संसाधनांचे मूल्यांकन, माती, पाणी, हवामान, पीक पद्धती आणि उपलब्ध मनुष्यबळ यांचे मूल्यांकन. दुसरा टप्पा - मृदा आरोग्य सुधारणा माती परीक्षण, सेंद्रिय पदार्थांचा वापर, पीक अवशेष व्यवस्थापन आणि संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन. तिसरा टप्पा - पाणी व्यवस्थापन जलसंधारण, ठिबक/तुषार सिंचन आणि पिकाच्या गरजेनुसार सिंचन. चौथा टप्पा - पीक विविधीकरण पीक फेरपालट, आंतरपीक आणि स्थानिक परिस्थितीला अनुरूप पीक निवड. पाचवा टप्पा - जैवविविधता कृषिवनीकरण, मित्रकीटकांचे संवर्धन, स्थानिक जैवसंसाधनांचे संरक्षण. सहावा टप्पा - अचूक कृषी सल्ला, हवामान माहिती, डिजिटल तंत्रज्ञान, सेन्सर्स आणि गरजेनुसार निविष्ठांचा वापर. सातवा टप्पा-आर्थिक मूल्यांकन प्रति हेक्टर उत्पादन, उत्पादन खर्च, निव्वळ उत्पन्न, संसाधन बचत आणि पर्यावरणीय लाभ यांचे संयुक्त मूल्यमापन.

**- डॉ. नितीनकुमार रणशूर**
सहयोगी संशोधन संचालक
विभागीय कृषी संशोधन केंद्र,सोलापूर
७८७५३१७६७३

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अमेरिकेने एकतर्फी लादलेला 'टेरिफ'चा निर्णय भारताला मान्य नाही : प्रा. अजित अभ्यंकर



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ सप्टेंबर-**

जागतिक व्यापारातील सुमारे २२ टक्के हिस्सा अमेरिकेचा आहे. परकीय चलनाच्या व्यवहारांपैकी सुमारे ८० टक्के व्यवहार डॉलरमध्ये होतात. मात्र तरीही अमेरिकेने एकतर्फी लादलेल्या टॅरिफचा निर्णय भारताला मान्य नाही, असे मत प्रा. अजित अभ्यंकर यांनी मांडले.

रोटरी क्लब ऑफ सोलापूर एमआयडीसी-सोलापूर, उद्योग बँक सेवक सांस्कृतिक मंडळाच्या वतीने आयोजित बौध्दिक व्याख्यानमालेत 'युध्द : जग आणि नवी समीकरणे' या विषयावर पाचवे पुष्प गुंफताना ते बोलत होते.

भारत आपल्या गरजेच्या सुमारे ८० टक्के तेलाची आयात करतो. त्यापैकी ४० ते ५१ टक्के तेल रशियाकडून खरेदी केले जाते. या व्यवहारात डॉलरऐवजी रुपया आणि रुबलचा वापर केला जात आहे. डॉलर हे अमेरिकेचे आर्थिक शस्त्र आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी यल्लादास लचमापुरे, गोवर्धन चव्हाण, श्रीनिवास बिंगी, श्रीनिवास नंदाल, श्रीनिवास साम लेटी, व्यंकटेश बिटला, अंबादास गड्डम आदी उपस्थित होते. व्यंकटेश मेरगू यांनी वक्त्यांचा परिचय करुन दिला. प्रा.विठ्ठल वंगा यांनी सूत्रसंचालन केले.

# 'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत शाळा, मंदिरांना नवी झळाळी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**

जिल्ह्यातील गावागावांतील अस्वच्छ ठिकाणे शोधून त्यांची स्वच्छता करण्याबरोबरच कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या 'स्वच्छता ही सेवा' या अभियानांतर्गत शाळा, मंदिरांना नवी झळाळी दिली जात आहे. विशेष म्हणजे, याकामी लोकसहभागावर भर दिला जात आहे.

स्वच्छतेसोबतच कचऱ्याचे वर्गीकरण, योग्य संकलन आणि त्यातून उपयुक्त संसाधननिर्मिती करण्यावर भर दिला जाणार आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कृती आराखड्यानुसार काम सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महिला बचत गट, युवक, ज्येष्ठ नागरिक आदींनी यात सहभागी व्हावेत, असे आवाहन करण्यात आले.

वदर्ळीची, अस्वच्छता आणि नागरिकांना अडचणीची ठरणारी सार्वजनिक ठिकाणे निश्चित करुन त्यांचे मॅपिंग करुन प्राधान्यक्रम ठरविण्यात येईल. संबंधित यंत्रणांच्या माध्यमातून निश्चित कालावधीत स्वच्छता पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय आणि पर्यावरणाबाबतची जाणीव निर्माण करण्यासाठी शाळांमध्ये विविध उपक्रम राबविले जाणार असल्याचे सांगण्यात आले.



सोलापूर : दैनिक तरुण भारत कार्यालयातील श्रींचे पूजन जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी मुख्य संपादक प्रशांत माने, व्यवस्थापक विनायक पुला, वरिष्ठ उपसंपादक श्रीनिवास गाजूल, उपसंपादक आरती कुसेकर, विकास चाटी, पुरोहित जगदीश माढेकर. (छायाचित्र : केवल तिवारी)

## छायाचित्रातून...



सोलापूर : शहरातील पूर्वविभागातील दाजी पेठ येथील ऐश्वर्य संपन्न आप्पा गणपती मंडळाच्या वतीने काशी विश्वनाथ मंदिराचा देखावा उभा करण्यात आला आहे



सोलापूर : मौलाली चौक परिसरातील गोकुळ प्रतिष्ठानच्या वतीने गोकुळ दरबार देखावा उभारण्यात आला आहे.




सोलापूर : जोडभावी पेठेतील सुर्योदय सांस्कृतिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने तिरुपती बालाजी मंदिर वैकुंठ दर्शनाचा देखावा उभा करण्यात आला.



सोलापूर : पूर्वभागातील तेलंगी पाच्छा पेठ येथील रहिवासी बालाजी नंदाल यांच्या निवासस्थानी गणरायापुढे श्रीबालाजीचा देखावा सादर करण्यात आला.



श्रीपूर : येथील रणजित माने व पत्नी पुजा माने यांनी गणपतीसमोर श्री खंडोबा मंदिर, पारंपारिक वेषभूषेतील खंडोबा, म्हाळसाई व बानूबाई यांचे मनमोहक दृश्य साकारले आहे.

# 'मुलींची शाळा' हा सामाजिक संदेश देणारा गौराई देखावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ सप्टेंबर-**

अभिनव सामाजिक महाराष्ट्र राज्याच्या अध्यक्षा मिनल दास यांनी सोलापूर येथे 'मुलींची शाळा' या सामाजिक संदेश देणाऱ्या थीमवर आकर्षक गौराई डेकोरेशन गणेशोत्सवापाठोपाठ येणाऱ्या गौरी-गणपती सणाच्या निमित्ताने सोलापूर येथील निवासस्थानी यावर्षी अत्यंत नाविन्यपूर्ण आणि प्रबोधनात्मक पद्धतीने महालक्ष्मीचे आवाहन व स्थापना करण्यात आली आहे.

यावर्षी 'मुलींची शाळा: शिक्षण, संस्कार, सशक्तीकरण' या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सामाजिक विषयावर आधारित आकर्षक देखावा साकारला आहे.या देखाव्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात विराजमान झालेल्या दोन्ही गौराईना अतिशय कल्पक आणि वैचारिक रूपात सादर केले आहे. यातील एका गौराईने स्त्री शिक्षणाच्या आद्यप्रवर्तक ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे रूप घेतले. त्या शिक्षिकेच्या भूमिकेत विद्यादानाचे कार्य करताना दिसत आहेत. तर दुसऱ्या बाजूला असलेली गौराई एका हुशार महिला विद्यार्थिनीच्या रूपात सजवण्यात आली आहे.




जी सावित्रीबाईच्या शाळेत शिक्षण घेत आहे. दोघींच्या मध्ये 'अ ब क ड' ची पाटी आणि अभ्यासाची पुस्तके मांडून जुन्या काळातील मुलींच्या शाळेचे हुबेहूब वातावरण निर्माण केले आहे. पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले यांचा फोटो आणि त्यांचे 'शिकून संघटित व्हा, संघर्ष करा...' हा प्रेरणादायी संदेश पाहायला मिळतो.

यासोबतच राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिराव फुले या थोर राष्ट्रपुरुषांच्या तसबीरी मांडून महाराष्ट्राच्या वैभवाचा आणि पुरोगामी विचारांचा वारसा येथे अधोरेखित करण्यात आला आहे.

पुढील पिढीला शिक्षणाचे महत्त्व कळावे आणि महिला सशक्तीकरणाचा संदेश घराघरात पोहोचावा तसेच रांगोळी मध्ये ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा रेखाटून शिक्षण संस्कार समानता स्वावलंबन स्वाभिमान या शब्दांचा वापर केला आहे.

# पिलीव परिसरात गौराईसमोर एकापेक्षा एक सरस अप्रतिम सजावटी

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि १९ सप्टेंबर -**


पिलीव परिसरातील महिलांमध्ये गौराईसमोर सजावट करण्याची लगबग सुरू आहे. अप्रतिम देखावे सजावट करण्यासाठी जणू अघोषित स्पर्धाच लागलेली आहे.



सजावटीच्या वस्तू, खाद्यपदार्थ, फळे देखाव्यासाठीच्या वस्तू खेळणी गोळा करण्यासाठी लगबग सुरू होती. स्टेशनरीचे दुकान, मेवा मिठाई व हॉटेलमध्ये ग्राहकांची गर्दी होती. ग्रामीण भागातील देखावे फळे,खेळणी चित्रातून मांडले जाणारे काल्पनिक देखावे असे अनेकविध विषयांवरील देखावे सादर केले आहेत. सादर केलेले देखावे सोशल मिडीयावर स्टेटस म्हणून टाकले जात आहेत. महिलांनी आपली कला, अनुभव व घरातील सुना, सासू, नणंद, जावा व शेजारच्या मैत्रिणीची मदत घेऊन अप्रतिम उत्कृष्ट मनमोहक देखावे तयार केले आहेत. पिलीव ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या अनिता जेऊरकर, वर्षा कोळी, विजयालक्ष्मी गोरे आदी महिलांनी आपली कल्पना व कला कौशल्य पणाला लावून अप्रतिम असे मनमोहक सजावटी केल्या आहेत.

पिलीव परिसरातील पिलीव, कुसमोड, झिंजेवस्ती भागातील महिलांनीही गौराई पुढे नेत्रदीपक देखावे तयार केले होते.

## छायाचित्रातून...



सोलापूर : वालचंद महाविद्यालय परिसरातील पंचमुखी हनुमान देवस्थान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने अक्कलकोट स्वामी समर्थ वटवृक्षाचा देखावा उभा केला आहे.



बार्शी : राजू अंबोरे यांच्या घरी गौराई समोर केदारनाथ येथील देखावा सादर करण्यात आला.





करकंब : विजयकुमार भागवत यांच्या घरातील छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवन प्रवासावरील देखावा. संध्या भागवत, श्रीनाथ भागवत, इंदुबाई भागवत आदींनी हा देखावा सादर केला आहे.



राहुल कोल्हटकर यांनी इको फ्रेंडली गणपतीचे घरच्या घरी विसर्जन केले.

# नवभारत साक्षरता या उपक्रमद्वारे श्रीगणेशाचे करण्यात आले स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ सप्टेंबर-**

उद्धव नगर परिसरातील जनार्दन प्रभाकर वाघमारे यांच्या घरात दरवर्षी सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक, पर्यावरणीय व वास्तव चित्रमय देखावा सादर करण्यात येते. तर यावर्षी नवभारत साक्षरता कार्यक्रमाचे देखावा सादर करण्यात आले. हर घर साक्षर या संकल्पनेप्रमाणे पंधरा वर्षे व त्यापुढील अधिक वय असणाऱ्या असाक्षराना साक्षर बनवणे हे उदिष्ट लक्षात घेऊन त्याचा देखावा सादर करण्यात आला. या उपक्रमाचे कौतुक सर्व स्तरावरून होत आहे.या चित्रमय देखावा निर्मिती सादरीकरणासाठी वैष्णवी वाघमारे,



अजिंक्य वाघमारे, अबोली कोरे, अनुष्का कोरे व ज्ञानेश्वरी कोरे यांचे सहकार्य लाभले.

# देखाव्यातून साकारली जि.प.मराठी शाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१९ सप्टेंबर-**

जि.प.मराठी शाळांची गोडी आणि त्यांचे भविष्यातील अस्तित्व या विषयावर सांगोल्यातील कुंभार गल्लीतील मेघा भागवत यांनी गौरी गणपतीसमोर लक्षवेधी सजीव हलता देखावा सादर केला आहे. मराठी शाळांचे महत्त्व पटवून देत उपस्थितांचे डोळे उघडण्याचा प्रयत्न केला आहे. या देखाव्यात शाळेची इमारत, वर्गखोल्या, विद्यार्थी, शिक्षक, शालेय परिसर तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांचे सुंदर चित्रण केले आहे. कल्पक व आकर्षक पद्धतीने केलेली मांडणी लक्ष वेधून घेत आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे वाढता ओढा, ओसाड पडत चाललेल्या मराठी मशाळा, अशी




सद्यस्थिती या देखाव्यातून अत्यंत जिवंतपणे मांडली आहे. विविध संदेश देणारे बोर्ड लावले आहेत. देखावा पाहणाऱ्या महिलांकडून याचे कौतुक होत आहे. देखावा तयार करण्यासाठी मेघा भागवत यांच्यासह तिचे वडील काकासाहेब भागवत, आई सुनिता भागवत, भाऊ निरंजन भागवत यांनी परिश्रम घेतले.

# गोकर्ण आत्मलिंगावर पडली सूर्यकिरणांची प्रभा; सोलापुरात अनोखा किरणोत्सव

## मानाच्या लड्डू गणपती मंडळाच्या देखाव्यात निसर्गाचा अद्भुत आविष्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ सप्टेंबर-**


गणेशोत्सवातील देखावे केवळ कलाकुसरीपुरते मर्यादित न राहता त्यातून धार्मिक आणि सांस्कृतिक अनुभूती देण्याचा प्रयत्न सोलापुरातील मंडळांकडून केला जात आहे. आंध्र दत्त चौक, कुचन नगर, दाजी पेठ येथील नूतन आंध्र दत्त सामाजिक संस्था मानाचा लड्डू गणपती मंडळाने यंदा साकारलेल्या गोकर्ण आत्मलिंगाच्या देखाव्यात निसर्गाचा अनोखा आविष्कार पाहायला मिळाला. सूर्याची किरणे थेट आत्मलिंगाच्या मूर्तीवर पडल्याने काही काळ गाभारा सूर्यप्रकाशाने उजळून निघाला. हे मनोहारी दृश्य पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली.

मंडळाने यंदा गोकर्ण येथील प्रसिद्ध आत्मलिंग मंदिराची प्रतिकृती देखाव्याच्या माध्यमातून साकारली आहे. मंदिराची उभारणी करताना वास्तुरचनेतील बारकावे जपण्यासोबतच मंदिरावरील कोरीव व रेखीव कामालाही विशेष महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष गोकर्ण मंदिराचा अनुभव देणारा हा देखावा भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.

दरम्यान, शनिवारी सूर्याची किरणे आत्मलिंगावर पडल्याने देखाव्याला एक वेगळेच आध्यात्मिक स्वरूप प्राप्त झाले. गाभाऱ्यात सूर्यकिरणांची प्रभा पडताच उपस्थित भाविकांनी हा क्षण मोबाईल कॅमेऱ्यात टिपला. निसर्ग आणि कलाकृती यांचा झालेला हा संगम पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली.

खा. ज्योती वाघमारे आणि आ.देवेंद्र कोठे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रभाग क्रमांक नऊतील सर्व नगरसेवक आणि मंडळाच्या विश्वस्तांच्या उपस्थितीत देखाव्याचे उद्घाटन करण्यात आले. मंडळाच्या वतीने दररोज रात्री साडेअकरा वाजता 'महानक्षत्रम आरती' आयोजित करण्यात येत आहे.

भाविकांनी गोकर्ण आत्मलिंगाचा देखावा तसेच रात्री होणाऱ्या आरतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.






**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## उमरग्यात 'विसर्जन आपल्या दारी'; पालिकेकडून विविध उपाययोजना

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१९ सप्टेंबर -**
दुष्काळजन्य परिस्थिती व पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर गणेश विसर्जनासाठी उमरगा नगरपालिकेने विविध उपाययोजना केल्या आहेत. यासंदर्भात नगर परिषदेत नगरसेवक व गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली.



घरगुती गणपती विसर्जनासाठी अंतुबले सभागृहाजवळील विहीर, पतंगे रोड, सिडफॅमजवळील विहीर व ओम् मल्टिस्टेट हॉस्पिटलजवळील पाण्याच्या स्रोतांवर व्यवस्था करण्यात येणार आहे.

हुतात्मा स्मारकाजवळ कृत्रिम तलाव उभारण्यात येणार आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी 'विसर्जन आपल्या दारी' उपक्रम राबविण्यात येणार असून, पालिका कर्मचारी घरापर्यंत येऊन विसर्जनासाठी सहकार्य करतील. तसेच विसर्जन न करणाऱ्या गणेश मंडळांसाठी मूर्ती सुरक्षित ठेवण्यासाठी गोडाऊनची व्यवस्था करण्यात येणार आहे.

दुष्काळी परिस्थितीत पाण्याची बचत करून गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्ष किरण गायकवाड यांनी केले.



## संक्षिप्त वृत्त...



### किंग कोब्रा गणेश मंडळातर्फे ८५ जणांचे रक्तदान

**लोहारा, दि.१९ सप्टेंबर -**
लोहारा शहरातील किंग कोब्रा गणेश मित्र मंडळाच्या वतीने १७ सप्टेंबर रोजी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरातील पत्रकार बांधवांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी आयोजित रक्तदान शिबिरात ८५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. दुष्काळी परिस्थितीचा विचार करून मंडळाने 'एक वही, एक पेन' हा उपक्रमही सुरू केला आहे. गणेश भक्तांनी दर्शनासाठी येताना हार, फुले व दुर्वांऐवजी वही व पेन आणावे, जेणेकरून त्याचा गरजू विद्यार्थ्यांना लाभ होईल, असे आवाहन मंडळाने केले आहे. यावेळी पत्रकारांसह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.



### जाधव यांच्याकडून गणेश मंडळांना भेटी

**नळदुर्ग, दि.१९ सप्टेंबर -**
भाजप ओबीसी सेलचे जिल्हा कार्यकारिणी सदस्य संजय विठ्ठल जाधव यांनी गणेशोत्सवानिमित्त नळदुर्ग शहरातील विविध गणेश मंडळांना भेटी देऊन श्री गणेशाची पूजा व आरती केली. त्यांनी व्यापारी गणेश मंडळ, नवचैतन्य तरुण गणेश मंडळ, जवाहर गणेश मंडळ, धर्मवीर संभाजी तरुण गणेश मंडळ तसेच शहर भाजप कार्यालयातील गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी दुष्काळी परिस्थिती दूर होऊन मुबलक पाऊस पडावा आणि शेतकऱ्यांच्या जीवनात पुन्हा आनंदाचे वातावरण निर्माण व्हावे, अशी प्रार्थना जाधव यांनी श्री गणेशाच्या चरणी केली.



### मुख्याध्यापक खडके यांचा सत्कार

**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**
महाराष्ट्र शासनाच्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी तसेच धाराशिव जिल्हा परिषदेच्या 'आयडॉल शिक्षक' पुरस्काराने सन्मानित मुख्याध्यापक अशोक खडके यांचा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा पाडोळी परिवारातर्फे सस्नेह सत्कार करण्यात आला. अशोक खडके हे याच शाळेचे माजी विद्यार्थी असल्याने ज्या शाळेत त्यांनी शिक्षणाची पहिली अक्षरे गिरवली, त्याच शाळेत कर्तृत्वाचा गौरव झाल्याने कार्यक्रमाला विशेष भावनिक महत्त्व प्राप्त झाले. शिक्षक व विद्यार्थ्यांनी पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला. मेनकुदळे सर यांनी खडके यांच्या शैक्षणिक कार्याचा परिचय करून दिला. यावेळी मुख्याध्यापक जाधवर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



### जि.प. मराठवाडा मुक्ती संग्राम दिन

**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**
जिल्हा परिषद धाराशिव येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी स्वातंत्र्यसैनिकांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. वंदे मातरम्, महाराष्ट्राचे राज्यगीत व राष्ट्रगीताचे सामूहिक गायन करण्यात आले. तसेच ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान करण्यात आला. ध्वजारोहणानंतर कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे पदाधिकारी, सदस्य, अधिकारी-कर्मचारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हा परिषद परिसरात अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिरही घेण्यात आले.

### शिराढोणमध्ये गोवंश कत्तलीचा प्रकार उघड

**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**
शिराढोण येथील शेत गट क्रमांक २४९ मध्ये गोवंशाची कत्तल सुरू असल्याचा प्रकार १८ सप्टेंबर रोजी पोलिसांनी उघडकीस आणला. पोलिसांनी घटनास्थळावरून कत्तलीसाठी वापरले जाणारे साहित्य तसेच गोवंशीय जनावरे, असा एकूण १ लाख ५ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. या प्रकरणी शिराढोण येथील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन संकरीत गायी कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याचेही पोलिसांच्या निदर्शनास आले. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# धाराशिवमध्ये कोरड्या दुष्काळासाठी तांत्रिक पाठपुरावा; मदतीसाठी शासनाकडे प्रयत्न

**पीक नुकसानीचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनाकडे; चारा डेपो, टँकर व रोजगार हमीला प्राधान्य : आ. राणाजगजितसिंह पाटील**

### धाराशिवमध्ये कोरड्या दुष्काळासाठी तांत्रिक पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**
जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये पावसाने प्रदीर्घ खंड दिल्याने खरीप पिकांची परिस्थिती गंभीर झाली आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक तांत्रिक बाबींचा पाठपुरावा सुरू आहे. त्याचबरोबर चारा डेपो, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि रोजगार हमीची कामे सुरू करण्याला प्राधान्य दिले जात असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना खरीप नुकसानीचे अनुदान व त्यानंतर पीकविमा मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

धाराशिव तालुक्यातील उपळा शिवारात ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या घोंगडी बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार पाटील यांनी प्रत्यक्ष शिवारात जाऊन पावसातील खंडामुळे नुकसान झालेल्या खरीप पिकांची पाहणी केली.



जिल्ह्यातील पिकांच्या परिस्थितीचा वस्तुनिष्ठ अहवाल शासनासमोर ठेवण्यासाठी विद्यापीठातील शास्त्रज्ञ, मुंबई आयआयटीतील वरिष्ठ तज्ज्ञ तसेच महसूल व कृषी विभागाच्या पथकाने प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे केले आहेत. या पाहणीचा सविस्तर अहवाल जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य शासनाला सादर करण्यात आला आहे. पिकांची सद्यस्थिती, पावसातील खंड आणि संभाव्य नुकसानीची मुद्देनिहाय माहिती अहवालात नमूद करण्यात आली आहे.

आगामी पंचनामे व नुकसानभरपाई निश्चित करताना या तांत्रिक अहवालाचा उपयोग होणार असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठीही तो महत्त्वाचा ठरणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. ज्या भागात पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, तेथे तातडीने टँकर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच पशुधनासाठी चारा उपलब्ध व्हावा यासाठी चारा डेपो सुरू करण्याची पूर्वतयारी पूर्ण करण्यात आली असून, आवश्यकतेनुसार तातडीने निर्णय घेतला जाणार आहे.



शेतीवरील उत्पन्नाचा स्रोत अडचणीत आलेल्या कुटुंबांना रोजगार मिळावा यासाठी प्रत्येक गावात मोठ्या प्रमाणावर रोजगार हमीची कामे हाती घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दुष्काळग्रस्त शेतकरी व ग्रामीण कुटुंबांना शक्य तितक्या लवकर मदतीचा आधार मिळावा, यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

## कळंबमध्ये गावठी पिस्तूलासह इसम ताब्यात

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**
कळंब तालुक्यातील भाटसांगवी पाटीजवळ गावठी पिस्तूल व जिवंत काडतुसासह एका इसमाला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले. नवनाथ उर्फ बालाजी बब्रुवान काळे (रा. भाटसांगवी, ता. कळंब) असे ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव आहे. त्याच्याकडून सुमारे २६ हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तूल व एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले.



दि.१९ सप्टेंबर रोजी मालमत्तेविषयक गुन्हे उघडकीस आणणे तसेच अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कळंब परिसरात गस्त घालत होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांच्या पथकाला भाटसांगवी पाटीजवळ एक इसम गावठी पिस्तूल घेऊन थांबला असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. दुपारी चारच्या सुमारास भाटसांगवी पाटीजवळ संबंधित इसम आढळून आल्यानंतर पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव नवनाथ उर्फ बालाजी बब्रुवान काळे असल्याचे सांगितले. अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला खोवलेले लोखंडी धातूचे गावठी पिस्तूल, लाकडी पिस्टल ग्रीप आणि एक जिवंत काडतूस मिळून आले.या प्रकरणी आरोपीची वैद्यकीय तपासणी करून त्याच्याविरुद्ध कळंब पोलीस ठाण्यात अवैधरित्या शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील कारवाईसाठी त्याला कळंब पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांच्या आदेशाने सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे यांच्या पथकाने केली. पथकात पोह. अमोल चव्हाण, राहुल नाईकवाडी, बळीराम शिंदे, चापोअं. दहीहांडे तसेच पोलीस अंमलदार सहभागी होते.

## गंधोरा शिवारातून तीन म्हशी चोरीला; १ लाख ६० हजार रुपयांचे पशुधन लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील गंधोरा शिवारातील शेतातून तीन म्हशी चोरीला गेल्याची घटना घडली. या म्हशींची अंदाजे किंमत १ लाख ६० हजार रुपये आहे. याप्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



गंधोरा येथील बिरु निलाप्पा सोनटक्के यांच्या गंधोरा शिवारातील गट क्रमांक २८६ मधील शेतात पत्र्याचे गोठे आहे. दि. १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री ८ वाजण्याच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने गोठ्यातील तीन म्हशी चोरून नेल्या.

घटनेनंतर सोनटक्के यांनी नळदुर्ग पोलीस ठाण्यात दि. १८ सप्टेंबर रोजी फिर्याद दिली.

त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविला असून, पुढील तपास सुरू आहे.

### नळदुर्गच्या मुक्तिसंग्रामाचा इतिहास गणेशोत्सवात साकारला

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ सप्टेंबर -**
माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी गणेशोत्सवानिमित्त आपल्या घरी मराठवाडा मुक्तिसंग्रामातील नळदुर्गच्या ऐतिहासिक लढाईचा देखावा साकारला आहे. १७ सप्टेंबर रोजी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी अहंकारी यांच्या निवासस्थानी भेट देऊन गणेशदर्शन घेतले व देखाव्याची पाहणी केली.

आलियाबाद पुलावर निजामाच्या रजाकार आणि भारतीय सैनिकांमध्ये झालेल्या लढाईचा प्रसंग देखाव्यात साकारण्यात आला आहे. यासोबतच पंढरीची वारी, सह्याद्री पर्वत व छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य तसेच ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणारा गावगाड्याचा देखावाही सादर करण्यात आला आहे.

यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे, उपनगराध्यक्ष नय्यर जागीरदार, नगरसेवक, नगरसेविका व नागरिक उपस्थित होते. देखावा साकारण्यासाठी श्रीनिवास अहंकारी, राजकुमार वैद्य, प्रदीप ग्रामोपाध्ये, सौरभ रामदासी व नंदू पोतदार यांनी सहकार्य केले.

## जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करा; शेतकऱ्यांसाठी भरीव मदतीचे पॅकेज द्या

**सुजितसिंह ठाकूर यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१९ सप्टेंबर -**
धाराशिव जिल्ह्यात यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा अत्यल्प पाऊस



तसेच पावसात मोठे खंड पडल्याने खरीप हंगामातील सोयाबीन, तूर, उडीद, मूग यांसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. निसर्गाचा लहरीपणा, बदलते हवामान आणि गतवर्षीची अतिवृष्टी व महापुराच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे संपूर्ण धाराशिव जिल्हा दुष्काळी जाहीर करून शेतकऱ्यांसाठी भरीव मदतीचे पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी भाजपा नेते माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनानुसार, जिल्ह्यातील आठही तालुक्यांत खरीप हंगाम २०२६ मध्ये एकूण ५ लाख ३९ हजार २७ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. यामध्ये सोयाबीनचे क्षेत्र ४ लाख ६७ हजार ३२२ हेक्टर, तुरीचे ३४ हजार ८३१ हेक्टर, उडदाचे २१ हजार ८८६ हेक्टर आणि मुगाचे ५ हजार ५४४ हेक्टर आहे. जून ते सप्टेंबरदरम्यान जिल्ह्यात विविध ठिकाणी तब्बल ९० दिवसांहून अधिक पर्जन्य खंड पडल्याने खरीप पिकांवर गंभीर परिणाम झाला आहे.

पावसातील मोठ्या खंडामुळे जवळपास सर्वच क्षेत्रातील खरीप पिके करपली आहेत. सोयाबीन, तूर, उडीद व मूग यांसारखी पिके उत्पादन देण्याच्या स्थितीत नसल्याने काही शेतकरी करपलेले पीक जनावरांसाठी चारा म्हणून वापरत आहेत.

आता पाऊस झाला तरी पिकांची जैविक वाढ आणि उत्पादनाची भरपाई होणे शक्य नसल्याचे ठाकूर यांनी निवेदनात म्हटले आहे.

संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत द्यावी. तसेच दुष्काळी उपाययोजनांची अंमलबजावणी, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर, जनावरांसाठी चारा छावण्या, रोजगार हमीची कामे, विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कमाफी तसेच विविध सवलती व योजनांची अंमलबजावणी तातडीने करावी, अशी मागणी सुजितसिंह ठाकूर यांनी केली आहे.

#### प्रकल्पांत केवळ ८ टक्के पाणीसाठा

जिल्ह्यात मोठे, मध्यम व लघु असे एकूण २२५ प्रकल्प असून त्यांची एकूण पाणी साठवण क्षमता ७२५.४० दशलक्ष घनमीटर आहे. मात्र, पावसाळा संपत आला असतानाही या प्रकल्पांमध्ये केवळ ८ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता असून ग्रामीण भागातील नागरिकांसह पशुधनासमोरही संकट निर्माण होणार आहे.

#### पाणीपातळीही खालावली

सप्टेंबर २०२६ मध्ये जिल्ह्यातील सरासरी पाणीपातळी ९.५३ मीटर असून, ती मागील पाच वर्षांच्या सरासरीच्या तुलनेत ७.०२ मीटरने खालावल्याचे निवेदनात नमूद आहे. पाणीपातळी घटल्यामुळे फळबागा व ऊस पिकांवरही परिणाम होत असून, पाण्याअभावी नुकसान झालेल्या फळबागा व ऊस पिकांचे पंचनामे करून संबंधित शेतकऱ्यांनाही मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे.

#### रोजगार हमीची कामे सुरू करा

जिल्ह्यातील अनेक गावांना सध्या पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असून आगामी काळात मोठ्या प्रमाणात टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागण्याची शक्यता आहे. पशुधन वाचविण्यासाठी चारा छावण्या सुरू कराव्यात तसेच रोजगारासाठी स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमीची कामे मोठ्या प्रमाणात सुरू करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

## 'पंचनामे नकोत, आता तातडीने मदत द्या'; डॉ. प्रतापसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**
जिल्ह्यात पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा फटका सोयाबीनसह विविध पिकांना आणि फळबागांना बसला आहे. आंबेजवळगा व कौडगाव शिवारात प्रत्यक्ष पाहणी केली असता पिकांच्या नुकसानीची गंभीर परिस्थिती निदर्शनास आली. त्यामुळे पंचनाम्यांच्या नावाखाली वेळकाढूपणा न करता धाराशिव जिल्ह्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी १ लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवारचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह वेदप्रकाश पाटील यांनी केली.

आंबेजवळगा व कौडगाव परिसरातील शेतांमध्ये पाहणी केली असता सोयाबीनसह अन्य पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे दिसून आले.

अनेक शेतकऱ्यांनी कष्टाने उभी केलेली पिके हातातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली असून फळबागांनाही मोठा फटका बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे. शासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने ठोस मदत करण्याची गरज असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले.

नुकसान स्पष्ट दिसत असताना सरकार पंचनाम्यांची वाट कशासाठी पाहत आहे? शेतकऱ्यांना हक्काची आणि तातडीची मदत हवी आहे. केवळ कागदी पंचनामे करून त्यांच्या अडचणी दूर होणार नाहीत, अशी भूमिका त्यांनी मांडली. धाराशिव जिल्ह्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून सरसकट हेक्टरी १ लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी तसेच शेतकऱ्यांना आवश्यक दुष्काळी सवलती लागू कराव्यात, अशी मागणी डॉ. पाटील यांनी केली. शेतकऱ्यांच्या संयमाची परीक्षा घेऊ नका. आता निर्णय हवा, घोषणा नाही; मदत हवी, केवळ पंचनामे नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले.



पाहणीवेळी रवी ठेंगल, ॲड. योगेश सोन्ने पाटील, ॲड. अविनाश जाधव, सुरज वडवले, राजू शिंदे, काका यादव, चंद्रकांत सुळ, काका शिंदे, अण्णा यादव, नेहाल पठाण, उमेश वायकुळे, अण्णा हाजगुडे, हनुमंत नाईकवाडी, विशाल थोरात, अक्षय नाईकवाडी, श्रीनिवास थोरात, माऊली नाईकवाडी यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## संक्षिप्त...

### भोगेश्वर विद्यालयातील कर्मचाऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १९ सप्टेंबर : तालुक्यातील दवणहिप्परगा येथील भोगेश्र्वर विद्यालयातील सेवकाचे थकीत वेतन काढण्यात येत नसल्याच्या कारणावरून सेवक मेघराज शेळके यांनी १७ सप्टेंबर रोजी आत्मदहनाचा प्रयत्न केला. मात्र, देवणी पोलिसांनी प्रसंगावधान राखत त्यांना रोखले. पोलिसांच्या मध्यस्थीने संस्थेच्या मुख्याध्यापक व सचिवांनी वेतन काढण्याचे आश्र्वासन दिल्यानंतर हा प्रकार थांबविण्यात आला.

मेघराज शेळके हे २०२२ पासून अनुकंपा तत्त्वावर भोगेश्र्वर विद्यालय, दवणहिप्परगा येथे सेवक पदावर कार्यरत आहेत. सन २०२२ ते २०२५ या कालावधीतील त्यांचे मानधन वेतन पथक, लातूर यांच्याकडून कायदेशीररीत्या काढण्यात आले. मात्र, नोव्हेंबर २०२५ पासून त्यांचे वेतन संस्था सचिव तथा मुख्याध्यापक सचिन चंद्रकांत संगमे यांच्याकडून काढण्यात आले नसल्याचा आरोप शेळके यांनी केला आहे.

वेतन मिळण्यासाठी अनेकदा अर्ज व विनंत्या करूनही प्रश्र्न सुटला नसल्याने शेलके यांच्यावर कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्र्न निर्माण झाला. याप्रकरणी त्यांनी शिक्षणाधिकारी, लातूर तसेच देवणी पोलिस ठाण्यात तक्रार अर्ज दिला होता. वेतन न मिळाल्यास १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी आत्मदहन करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता.

पोलिसांच्या मध्यस्थीने आत्मदहनाचा प्रयत्न रोखला दिलेल्या मुदतीत वेतन न मिळाल्याने शेळके यांनी १७ सप्टेंबर रोजी आत्मदहनाचा प्रयत्न केला. यावेळी देवणी पोलिस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक पाटील व बीट अंमलदार केंद्रे यांनी हस्तक्षेप करून त्यांना आत्मदहनापासून परावृत्त केले. तसेच संस्था मुख्याध्यापक तथा सचिव यांच्याशी मध्यस्थी करून वेतन काढण्याचे आश्र्वासन दिले.

दरम्यान, दिलेल्या कालावधीत वेतन न काढल्यास पुन्हा कुटुंबासह आत्मदहन करणार असल्याचे लेखी निवेदन मेघराज शेळके यांनी देवणी पोलिस ठाणे व शिक्षणाधिकारी, लातूर यांना दिले आहे. या प्रकरणामुळे विद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्र्न ऐरणीवर आला आहे.

# औसा तालुक्यातील पिकांची पालकमंत्र्यांनी केली पाहणी

तभा वृत्तसेवा

औसा दि.१९ सप्टेंबर : लातूर जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांना मोठा फटका बसला असून औसा तालुक्यातील बोरफळ व आशिव शिवारातील नुकसानग्रस्त पिकांची पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि पिकांच्या नुकसानीची माहिती जाणून घेतली.व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचा विश्र्वास उपस्थितांना दिला.



बोरफळ येथील शेतकरी व्यंकट यादव यांच्या शेतात तसेच आशिव येथील शेतकरी अजय जगताप यांच्या शेतात जाऊन पालकमंत्री भोसले यांनी सोयाबीनसह अन्य खरीप पिकांची पाहणी केली. गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्यामुळे पिकांना आवश्यक पाणी मिळाले नाही.यामुळे सोयाबीन व इतर पिके जाग्यावर वाळून गेली आहेत. हातातोंडाशी आलेला खरीप हंगाम वाया गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.निसर्गाच्या प्रतिकूल परिस्थितीमुळे शेतकरी अडचणीत आला असताना शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी यावेळी दिली.

शेतकऱ्यांच्या अडचणी प्रत्यक्ष शेतात जाऊन जाणून घेणे आणि नुकसानाची वस्तुस्थिति समजून घेणे आवश्यक असल्याचेही पालकमंत्र्यांनी सांगितले. यावेळी आमदार अभिमन्यू पवार, माजी आमदार दिनकरराव माने, जिल्हाधिकारी भारत बास्टेवाड, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनश्याम अडसूळ, भाजपाचे संतोष मुक्ता, जिल्हा परिषद सदस्य सई गोरे, संगायो समितीचे अध्यक्ष सुभाष जाधव, प्रवीण कोपरकर, गिरीराज सोमाणी यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेशोत्सवानिमित्त 'लोकसंवाद २०२६' कार्यक्रमात विविध योजनांविषयी मार्गदर्शन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १९ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत थेट पोहोचविण्यासाठी राज्य शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत 'लोकसंवाद २०२६' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत निलंगा तालुक्यातील मसलगा येथे विविध योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे यांनी युवक-युवतींना मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेची माहिती दिली, तसेच या योजनेतून स्वतःचा उद्योग, व्यवसाय सुरु करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले.

लातूर जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने मसलगा येथील नारीशक्ती गणेश मंडळ येथे गुरुवारी आयोजित या कार्यक्रमाला या उपक्रमात कृषि विभाग, जिल्हा खादी ग्रामोद्योग विभागाच्या योजनांची माहिती देण्यात आली. मसलगा गावातील सर्व गणेश मंडळांना एकत्रित करून लोकसंवाद कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच गणेश शेळके होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे, उपकृषी अधिकारी सुनील घारोळे, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी तानाजी घोलप, पोलीस पाटील संतोष नरहरे, तंटामुक्ती अध्यक्ष संतोष तोरखडे, हरिदास साळुंके, संभाजी पाटील, राजकुमार सोनी यांची उपस्थिती होती.

ग्रामीण भागातील युवक-युवतींना स्वतःचा उद्योग, व्यवसाय सुरू करण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत अर्थसहाय्य देत आहे. ५० लाख ते १ कोटी रुपयेपर्यंतच्या प्रकल्पासाठी १७ लाख ५० हजार पर्यंत अनुदान देण्यात येते. १ लाख ते १ कोटी पर्यंतच्या कोणत्याही प्रकल्पासाठी या योजनेचा लाभ घेता येतो, असे जिल्हा खादी ग्रामोद्योग अधिकारी चिंतामणी गुट्टे यांनी केले. यावेळी त्यांनी प्रधानमंत्री विश्र्वकर्मा योजना, मधाचे गाव या योजनांची माहिती दिली.

## उद्योजक धर्मराज चावरे यांचा सत्कार



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १९ सप्टेंबर : डिगोळ गावचे सुपुत्र तथा अहमदपूर शहरातील सुप्रसिद्ध नामवंत उद्योजक धर्मराज वैजनाथ चावरे यांना कृषी व्यावसायिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल १३ सप्टेंबर २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित शानदार सोहळ्यात 'मराठवाडा रत्न पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. सुप्रसिद्ध अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल डिगोळ येथे धर्मराज चावरे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना शाल, पुष्पगुच्छ, फेटा व हार देऊन अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी रयत क्रांती संघटनेचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष शिवाजी पेठे, बालाजी पाटील महाराज येरोळकर, पत्रकार शिवानंद भुसारे, गुंडेराव चौसष्टे, धनराज चावरे, अनंत पाटील, खंडेराव बोयणे, बसवराज चावरे, रामेश्र्वर चावरे यांच्यासह ग्रामस्थ व मान्यवर उपस्थित होते.

## पंडित सुंदरलाल समितीच्या शिफारशी लागू करा : एमआयएमची मागणी

तभा वृत्तसेवा

औसा दि.१९ सप्टेंबर : हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाल्यानंतर १९४८ मध्ये झालेल्या पोलीस कारवाईदरम्यान झालेल्या कथित जीवित व मालमत्तेच्या नुकसानीची दखल घेऊन पंडित सुंदरलाल समितीच्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करावी, अशी मागणी एमआयएम औसा प्रमुख सय्यद मुजफ्फर अली इनामदार यांनी औसा तहसिलदार यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.



१९४८ मधील पोलीस कारवाईच्या काळात मराठवाड्यासह हैदराबाद संस्थानातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर जीवित व मालमत्तेचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, महिलांवर अत्याचार झाले, दुकाने व मालमत्ता लुटण्यात आल्या. तसेच जमिनी आणि मौल्यवान वस्तू बळकावण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या घटनांमुळे बाधित झालेल्या कुटुंबांचा शोध घेऊन त्यांच्या वारसांना आर्थिक नुकसानभरपाई द्यावी, तसेच दोषींनी बळकावलेल्या मालमत्तेबाबत कायद्यानुसार चौकशी करून पीडितांना मदत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. पोलीस कारवाईदरम्यान मृत्यू झालेल्या व्यक्तींचे मृत्युप्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासाठी नगरपालिका व ग्रामपंचायतींना आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

पीडित कुटुंबांना न्याय मिळणार कधी? असा सवाल या निवेदनात उपस्थित करून गेल्या १६ ते १७ वर्षांपासून मागणी करण्यात येत असल्याचा दावा एमआयएम औसाच्या वतीने करण्यात आला आहे. पंडित सुंदरलाल समितीच्या शिफारशी अहवालाचा विचार करून केंद्र सरकारने संबंधित मागण्यांवर तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.

## ग्रामविकास अधिकारी किशोर सर्कलवाड यांना जिल्हास्तरीय आदर्श पुरस्कार



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १९ सप्टेंबर : ग्रामविकासासाठी कर्तव्यनिष्ठेने कार्य करणारे रुद्धा, तालुका अहमदपूर येथे ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत असलेले किशोर सर्कलवाड यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जिल्हास्तरीय आदर्श ग्रामविकास अधिकारी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा मानाचा पुरस्कार पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे रुद्धा गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, संपूर्ण रुद्धा ग्रामस्थांमध्ये आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत असताना किशोर सर्कलवाड यांनी ग्रामपंचायत प्रशासन, विकासकामे, शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि ग्रामस्थांशी समन्वय साधण्याच्या कार्यात दिलेले योगदान यामुळे त्यांना हा जिल्हास्तरीय सन्मान प्राप्त झाला आहे.

गावाचा विकास हा केवळ रस्ते, नाली, पाणी किंवा इमारतींपुरता मर्यादित नसून, शासनाच्या विविध योजना आणि सुविधा गावातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविणे, ग्रामपंचायत प्रशासन अधिक सक्षम करणे आणि ग्रामस्थांचा विकास प्रक्रियेत सहभाग वाढविणे हेही तितकेच महत्त्वाचे असते. या सर्व बाबींमध्ये ग्रामविकास अधिकाऱ्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. एका अधिकाऱ्याचा सन्मान, संपूर्ण गावाचा गौरव एखाद्या गावात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याला जिल्हास्तरीय पुरस्कार मिळणे ही त्या गावासाठी निश्र्चितच अभिमानाची गोष्ट असते. हा पुरस्कार केवळ किशोर सर्कलवाड यांच्या कार्याचा गौरव नसून रुद्धा गावातील ग्रामपंचायत प्रशासन, पदाधिकारी आणि ग्रामस्थ यांच्या सहकार्याचाही सन्मान असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

## बाकलीच्या उपसरपंच पदी उमाकांत रावसाहेब पाटील यांची बिनविरोध निवड

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १९ सप्टेंबर : शिरूर अनंतपाळ तालुक्यातील बाकली येथील उमाकांत रावसाहेब पाटील यांची बाकली येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी आज १६ सप्टेंबर रोजी सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

बाकली येथील ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी उमाकांत रावसाहेब पाटील यांची सर्व ग्रामपंचायत सदस्य सरपंच माजी उपसरपंच, निवडणूक निरीक्षक नवनाथ खंदाडे ग्रामपंचायत अधिकारी मलवाड यांच्यासह सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीमध्ये सर्वानुमते अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये ही निवड बिनविरोधपणे पार पडली.

ग्रामपंचायत मध्ये असणाऱ्या नऊ सदस्या पैकी उपसरपंच



पदासाठी उमाकांत रावसाहेब पाटील यांचा एकमेव अर्ज आल्याने या निवडीची प्रक्रिया वैद्य रीतीने अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये निवडणूक निरीक्षकांच्या समोर कायदेशीर रित्या गणपूर्ती पूर्ण करून पार पडली.

त्यांच्या या निवडीबद्दल आमदार संभाजी पाटील निलंगेकर अरविंद पाटील निलंगेकर यांच्यासह सरपंच वैष्णवी हणमंत बालुरे माजी उपसरपंच पंकज रक्षाळे सर्व ग्रामपंचायत सदस्य तंटामुक्ती अध्यक्ष सोमनाथ चित्ते उपाध्यक्ष पांडुरंग काकनळे नानासाहेब शिंदे राहुल पाटील बालाजी पाटील शरद पाटील बब्रुवान रक्षाळे दत्ता प्रकाश पाटील यांच्यासह विविध ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे .

उमाकांत रावसाहेब पाटील नूतन उपसरपंच ग्रामपंचायत बाकली गावकऱ्यांनी दाखवलेल्या या विश्र्वासास विकासाच्या माध्यमातून जनतेचे प्रश्र्न सोडून या पदाला न्याय देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करून सर्व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांसह बाकली गावाचा जास्तीत जास्त विकास करण्याचा आमचा प्रयत्न आहे अशी प्रतिक्रिया त्यांनी दैनिक सोलापूर तरुण भारत सोबत बोलताना दिली

## उदगीर -जळकोट मतदारसंघात दुष्काळ जाहीर करून एकरी ५० हाजार रुपीक विमा द्या : स्वप्निल जाधव

तभा वृत्तसेवा



जळकोट दि. १९ सप्टेंबर : गेल्या वर्षीपासून उदगीर - जळकोट विधानसभा मतदारसंघातील शेतकरी अडचणीत सापडला आहे. कधी आसमान इतर कधीच सुलतानी संकटांनी शेतकरी नागावला जात असताना सत्ताधारी सरकार मात्र केवळ घोषणाबाजी करत सुटले आहे. शेतकऱ्याच्या डोळ्यात पाणी असताना शेतकऱ्याच्या बांधावर जाऊन पिक पाहणी चे नाटक करणे चुकीचे आहे. हे सर्व थांबून शेतकऱ्यांना तात्काळ एकरी ५० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी. अशी आग्रही मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उदगीर -जळकोट विधानसभा प्रमुख स्वप्निल अण्णा जाधव यांनी केली आहे.

लातूर जिल्ह्यात पावसाने मोठी ओढ दिल्याने खरीप पिके पूर्णपणे हातची गेली आहेत. जून ते ऑगस्ट अखेरपर्यंत तालुक्यात सरासरी सुमारे ७०० मिलिमीटर पर्जन्यमान अपेक्षित असताना यंदा केवळ १८८ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. पावसाने तब्बल ४० दिवसांची उघडीप दिल्याने सोयाबीन, तूर, मूग, उडीद व खरीप ज्वारी ही पिके मुळापासून वाळून गेली आहेत. त्यामुळे आता पाऊस झाला तरी या पिकांना पुन्हा उभारी मिळण्याची शक्यता नसल्याने जिल्ह्या दुष्काळ जाहीरकरून १०० टक्के विमा देण्याची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उदगीर विधानसभा प्रमुख स्वप्नील अण्णा जाधव यांनी केली आहे.

पर्जन्यमानातील मोठी तूट आणि पिकांची झालेली अवस्था पाहता महसूल प्रशासनाने केवळ कार्यालयीन नोंदींवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सद्यस्थितीची वस्तुनिष्ठ नोंद करावी, पीक कापणी प्रयोगाच्या कालावधीपर्यंत बहुतांश पिके पूर्णपणे कोलमडून गेली आहेत. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने अंतिम आणेवारी काढल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी म्हटले आहे.नजरी आणेवारी अंतिम आणेवारी मानून त्याला पर्जन्य त्रुटीची जोड द्यावी, तसेच शेतकऱ्यांना १०० टक्के पीकविमा आणि एनडीआरएफच्या निकषानुसार शासकीय मदत व सवलती देण्यात याव्यात, अशीही मागणी स्वप्निल अण्णा जाधव यांनी केली.

दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करणे, पीक कर्जावरील व्याजमाफी देणे, पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, शेतकरी आणि शेतमजुरांच्या हाताला काम मिळावे यासाठी रोजगार हमी योजनेंतर्गत आवश्यक कामे तातडीने मंजूर करून सुरू करावीत, तसेच पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता करून देणे आवश्यक असल्याचे स्वप्निल अण्णा जाधव यांनी सांगितले. गरज भासल्यास चारा छावण्या सुरू कराव्यात, अशीही मागणी त्यांनी केली.

गेल्या वर्षी ओला दुष्काळ आणि यंदा कोरडा दुष्काळ अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कर्जाच्या जोखडातून दिलासा देण्यासाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या चालू कर्जाबाबत शासनाने तातडीने कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणीही स्वप्निल अण्णा जाधव यांनी केली आहे.

## गणेश मंडळाच्या वतीने सामाजिक उपक्रम

तभा वृत्तसेवा

वलांडी दि. १९ सप्टेंबर : देवणी तालुक्यातील बोंबळी खुर्द येथील गणेश मंडळांच्या वतीने शुक्रवारी (ता. १८) सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपण, रक्तदान शिबीर घेत रक्तदात्यांना हेल्मेट देण्यात आले.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने केवळ धार्मिक कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देत बोबळी खुर्द (ता. देवणी) येथील जय हनुमान सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये वृक्षारोपण तसेच रक्तदान शिबिर घेऊन युवकांना समाजोपयोगी कार्याची प्रेरणा देण्यात आली. भालचंद्र ब्लड बँक व जय हनुमान सार्वजनिक गणेश मंडळाच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात युवकांसह नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. विशेष म्हणजे रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास एक हेल्मेट भेट देण्यात आले. रक्तदानासोबतच रस्ते सुरक्षेचा संदेश देण्याचा मंडळाचा हा उपक्रम उपस्थितांकडून कौतुकास्पद ठरला.

## समाज माध्यमात आलेली दुष्काळग्रस्त गावांची बनावट यादी तात्काळ हटवा : बाबासाहेब पाटील

तभा वृत्तसेवा



चाकूर दि. १९ सप्टेंबर : सोशल मीडियावर सध्या दुष्काळग्रस्त गावांची बनावट यादी सध्या फिरत असून त्यामुळे लातूर जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील शेतकऱ्यांत संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे,त्यामुळे शेतकऱ्यांना संभ्रमात टाकणाऱ्या या बनावट यादीचा शोध घेऊन ही यादी तात्काळ समाज माध्यमातून हटवण्याचे निर्देश महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी राज्याची कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आयोजित केलेल्या बैठकीत ऑनलाइन सहभागी होत माहिती दिले.

छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील पीक परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीला राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील हे ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून उपस्थित होते . या बैठकीत बोलताना सहकार मंत्री नामदार पाटील म्हणाले की, लातूर जिल्ह्यात खरीप हंगाम २०२६ मध्ये जूनपासून पर्जन्यमानात मोठी अनियमितता असून जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात विविध कालावधीत दीर्घ पावसाने खंड पडलेला आहे. तालुकानिहाय अहवालानुसार लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, देवणी, शिरूर अनंतपाळ व जळकोट या सर्व तालुक्यांमध्ये पिकांवर पाण्याच्या अभावामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.पिके पुर्णतः वाळून गेली आहेत.पावसाच्या दीर्घ खंडामुळे खरीप पिके करपली आहेत यामुळे उत्पन्नात ७० ते ८० टक्के घट होणार आहे.

वस्तुस्थिती लक्षात घेता पीक विमा कंपन्यांना तातडीने सर्वेक्षण मोहीम राबवण्याचे निर्देश देण्यात आले असल्याचे सांगितले आहे. पीक नुकसानीचे पंचनामे व सर्वेक्षण जिल्ह्यातील एकाही महसूल मंडळाला वगळण्यात आले नाही, सर्व ६० महसूल मंडळांचा समावेश करून तातडीने पंचनामे करण्यात येणार आहेत. सोयाबीन तसेच इतर बाधित पिकांचे नुकसान वस्तुनिष्ठपणे नोंदवून, पात्र शेतकऱ्यांना योग्य व वेळेत नुकसानभरपाई मिळावी, यासाठी विमा कंपन्यांनी कोणतीही दिरंगाई करू नये. ज्या मंडळांमध्ये पर्जन्यमानातील खंड (वी िशिश्रश्र) निकषानुसार आधीच स्पष्ट झाला आहे, तेथे तातडीने आगाऊ नुकसानभरपाईची (मिड-सीझन डव्हर्सिटी) प्रक्रिया सुरू करावी. जिल्हाधिकारी व कृषी विभागाने या सर्वेक्षणावर बारकाईने देखरेख ठेवावी, आणि याबाबतचा प्रगती अहवाल शासनास नियमितपणे सादर करावा, असे निर्देश सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी दिले.

धाराशिव
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जय हनुमान मंडळाचा 'भूत बंगला' ठरतोय आकर्षण

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ सप्टेंबर -**

नळदुर्ग येथील शास्त्री चौक येथील जय हनुमान तरुण गणेश मंडळाच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त यावर्षी 'भुत बंगला' हा आकर्षक व थरारक हालता देखावा सादर करण्यात आला आहे. देखाव्यातील विविध हालचाली, प्रकाशयोजना आणि ध्वनीप्रभावांमुळे हा देखावा नागरीकांचे विशेष आकर्षण ठरत आहे.

दरवर्षी गणेशोत्सवानिमित्त जय हनुमान तरुण गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक, धार्मिक व मनोरंजनात्मक देखावे सादर केले जातात. ही परंपरा कायम ठेवत यावर्षी 'भुत बंगला' हा देखावा साकारण्यात आला आहे. देखावा पाहण्यासाठी शहरातील भाविक, गणेशभक्त तसेच नागरीकांनी मोठी गर्दी केली होती.



या देखाव्याच्या आयोजनासाठी मंडळाचे अध्यक्ष गजानन हळदे, उपाध्यक्ष राहुल ठाकुर, किरण दुस्सा, कोषाध्यक्ष अजय कांबळे व नीरज गहीरवार, सचिव लखन कोकणे आणि सहसचिव आकाश कोकणे यांनी नियोजन केले.

हा देखावा साकारण्यासाठी आरक्ष काळे, ओम ठाकुर, अमित ठाकुर, समर्थ ठाकुर, जगु ठाकुर, आकाश घोडके, अरविंद कांबळे, अनिल वाघमारे, दादा जाधव, महादेव फरताळे, संजय फरताळे, महेश वाघमारे आदींनी परीश्रम घेतले.



### संक्षिप्त वृत्त...



## राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारप्राप्त डॉ. किरण झरकर यांचा सत्कार

**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल डॉ. किरण झरकर यांचा रुपामाता परिवाराच्या प्रधान कार्यालयात सत्कार करण्यात आला. रुपामाता परिवाराचे संस्थापक तथा भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. व्यंकटराव गुंड पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. छत्रपती संभाजीनगर विभागातील आयटीआय क्षेत्राला मिळालेला हा पहिला राष्ट्रीय बहुमान असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. शैक्षणिक व कौशल्य विकास क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. झरकर यांचे कौतुक करण्यात आले. त्यांनी कौशल्य विकासासाठी 'स्किलबुक' प्रणाली विकसित केली असून 'वंदे मातृशक्ती' या पुस्तकाचे लेखन केले आहे. सत्काराला उत्तर देताना डॉ. झरकर यांनी पुरस्कारासाठी रुपामाता परिवाराकडून मिळालेल्या पाठबळाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली

## प्रा. श्रीधर भवर यांची मराठवाडा अर्बन बँक्स असोसिएशनवर बिनविरोध निवड

**येरमाळा, दि.१९ सप्टेंबर -**

मराठवाडा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन, औरंगाबादच्या २०२६ ते २०३१ या कालावधीसाठीच्या



समिती सदस्यपदी कळंब येथील प्रियदर्शनी अर्बन को-ऑप. बँकेचे चेअरमन प्रा. श्रीधर (बाबा) भवर यांची बिनविरोध निवड झाली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियमांनुसार राबविण्यात आलेल्या निवडणूक प्रक्रियेत अंतिम मुदतीपर्यंत आवश्यक संख्येपेक्षा अधिक उमेदवारी अर्ज प्राप्त न झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी भवर यांची बिनविरोध निवड जाहीर केली. प्रा. भवर हे प्रियदर्शनी अर्बन बँकेचे संस्थापकीय चेअरमन असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेला विविध पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या निवडीबद्दल कळंब परिसरातील सहकार क्षेत्रातील पदाधिकारी, संचालक, सभासद व हितचिंतकांनी अभिनंदन केले.



## 'क्लीन समता, ग्रीन समता'च्या रक्तदान शिबिरात ९८ जणांचे रक्तदान

**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आणि श्री गणेशोत्सवाचे औचित्य साधून 'क्लीन समता, ग्रीन समता'च्या वतीने नगरसेवक नाना घाटगे यांच्या संकल्पनेतून रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिराला नागरिक तसेच महाविद्यालयीन तरुण-तरुणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी ९८ जणांनी रक्तदान केले, तर ७४ जणांची बीपी व शुगर तपासणी करण्यात आली. रेणुका ब्लड सेंटरच्या वतीने रक्तसंकलन करण्यात आले. तसेच एमपीएससीसह विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तके वितरित करण्यात आली.

### धाराशिवच्या पाचवीला पूजलेला दुष्काळ...

# पाऊस पडला तर अतिवृष्टी, नाही पडला तर दुष्काळ; शेतकऱ्याच्या जगण्याचा प्रत्येक हंगाम निसर्गाच्या लहरीवर!

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

बालाघाटाच्या डोंगररांगांच्या कुशीत वसलेल्या धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्याचे आयुष्य आजही आभाळाकडे पाहत सुरू होते आणि आभाळाकडे पाहतच संपते. पाऊस पडला तर पीक वाचेल, पीक आले तर भाव मिळेल आणि भाव मिळाला तर कर्ज फेडता येईल, या आशेवर त्याची वर्षानुवर्षे शेती सुरू आहे. मात्र, या सगळ्या गणितात शेतकऱ्याच्या हातात उरतो तो केवळ खर्च, कर्ज आणि पुढच्या हंगामाची चिंता!

दुष्काळ हा धाराशिवच्या शेतकऱ्यासाठी आता केवळ एखाद्या वर्षातील नैसर्गिक आपत्ती राहिलेली नाही. तो त्याच्या शेतीच्या नियोजनाचा, आर्थिक गणिताचा आणि भवितव्याचा अविभाज्य भाग बनला आहे. कधी पाऊस कमी पडतो, कधी पेरणीनंतर पावसाचा खंड पडतो, तर कधी पीक काढणीला आलेले असताना अतिवृष्टी आणि अवकाळी पाऊस घात करतो. त्यामुळे शेतकऱ्याच्या हातात आलेला घास निसर्ग पुन्हा हिरावून घेतो.

धाराशिवचा शेतकरी दुष्काळापेक्षा खूपच मोठा असून येथील शेतकऱ्याने अनेक वर्षे दुष्काळ पाहिला आहे. पिके करपताना पाहिली आहेत. अतिवृष्टीने शेत वाहून जाताना पाहिले आहे. बाजारभाव पडताना पाहिला आहे. कर्जाचे ओझे वाढताना पाहिले आहे. तरीही तो पुढच्या हंगामाची तयारी करतो. कारण त्याच्याकडे माती आहे, श्रम आहे आणि पुन्हा उभे राहण्याची जिद्द आहे. धाराशिवच्या शेतकऱ्याला केवळ दुष्काळग्रस्त म्हणून पाहण्याची गरज नाही;



त्याला पाण्याची शाश्वत व्यवस्था, उत्पादनाला योग्य बाजारभाव, शेतीला तंत्रज्ञान आणि उत्पन्नाला स्थैर्य देण्याची गरज आहे. दुष्काळ धाराशिवच्या पाचवीला पूजलेला असला, तरी तो शेतकऱ्याच्या नशिबात कायमचा लिहिलेला नाही. पावसाचा प्रत्येक थेंब अडवला, जमिनीत मुरवला आणि शेतीच्या उपयोगात आणला; उत्पादनाला बाजारपेठ मिळवून दिली आणि शेतीची जोखीम कमी केली, तर या जिल्ह्याचा शेतकरी दुष्काळाशी लढत राहणारा नव्हे, तर दुष्काळावर मात करणारा शेतकरी ठरू शकतो.




शेतकऱ्याची अडचण केवळ पावसापुरती मर्यादित नाही. निसर्गाने साथ दिली आणि पीक चांगले आले, तरी त्याला योग्य बाजारभाव मिळेल याची शाश्वती नसते. उत्पादनाचा खर्च शेतकऱ्याने करायचा, निसर्गाची जोखीम त्याने घ्यायची आणि बाजारभावाचा धोका देखील त्यानेच सहन करायचा, अशी परिस्थिती अनेकदा निर्माण होते. पीक बाजारात आणल्यानंतर भाव घसरला, तर वर्षभर केलेल्या मेहनतीचे आर्थिक गणित बिघडते. उत्पादन चांगले आले तर भाव पडतो आणि उत्पादन कमी झाले तर खर्च भरून निघत नाही. त्यामुळे शेतकरी शेती करतो, उत्पादन घेतो; पण त्याच्या हातात स्थिर उत्पन्न राहत नाही.

धाराशिवच्या ग्रामीण भागातील शेतकरी शेती सोडत नाही. कारण शेती हीच त्याची उपजीविका आहे. वर्ष संपते, हंगाम संपतो, कर्जाचा हिशेब केला जातो आणि पुन्हा पुढच्या हंगामासाठी त्याच शेतकऱ्याला नव्याने पैसे उभे करावे लागतात. कधी कर्ज फेडण्यासाठी पीक विकावे लागते, तर कधी घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि इतर गरजांसाठी शेतीवरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे शेतकऱ्याचे आयुष्य एका हंगामातून दुसऱ्या हंगामात पुढे सरकत असले, तरी आर्थिक स्थैर्य मात्र दूरच राहते. शेतकरी जगतोय; पण सधन होत नाही, हे धाराशिवच्या शेतीसमोरील सर्वात मोठे वास्तव आहे.

पिकासोबत शेतकऱ्याच्या उत्पन्नालाही आधार हवा असतो. फक्त पाणी उपलब्ध करून दिल्याने प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन, आधुनिक शेती तंत्रज्ञान, पीक विविधीकरण, पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि शेतीपूरक व्यवसायांची जोड शेतकऱ्याला द्यावी लागेल. त्याचबरोबर शेतमालाला योग्य बाजारपेठ, साठवणूक सुविधा, प्रक्रिया उद्योग आणि थेट विक्रीची व्यवस्था उपलब्ध झाली, तर शेतकऱ्याला उत्पादनातून अधिक मूल्य मिळू शकते.

शेतकरी केवळ कच्चा माल उत्पादक राहू नये, तर आपल्या उत्पादनातून अधिक उत्पन्न निर्माण करणारा उद्योजक बनावा, यासाठी ग्रामीण भागात पूरक व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. प्रश्न केवळ पाऊस पडण्याचा नाही; प्रश्न पडलेल्या पावसाचा प्रत्येक थेंब शेतकऱ्याच्या उत्पन्नात कसा रूपांतरित होणार, याचा आहे. धाराशिवला दुष्काळाची सवय झाली आहे; आता मात्र शेतकऱ्याला दुष्काळमुक्त भविष्याची गरज आहे.

### पेरणीपासून काढणीपर्यंत प्रत्येक पावलावर संकट..

शेतकरी पेरणीपूर्वीच खर्चाला सुरुवात करतो. बियाणे, खते, कीटकनाशके, मशागत, मजुरी, डिझेल, वीज आणि वाहतूक यासाठी पैसे उभे करावे लागतात. अनेकदा कर्ज काढून किंवा घरातील बचत खर्च करून तो पिकाची उभारणी करतो. पेरणी झाली की पावसाची चिंता सुरू होते. सुरुवातीला पाऊस झाला नाही तर पेरणी अडकते. पेरणी झाल्यानंतर पावसाने दडी मारली तर उगवलेले पीक धोक्यात येते. पिकाला पाणी मिळाले आणि ते जोमाने वाढले, तर काढणीच्या काळात अवकाळी किंवा अतिवृष्टीचा धोका डोक्यावर असतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्याची शेती म्हणजे केवळ उत्पादन घेण्याचा व्यवसाय राहत नाही; ती दरवर्षी नव्याने जोखीम पत्करण्याची प्रक्रिया बनते.

### पाऊस पडला तर अतिवृष्टी, नाही पडला तर दुष्काळ..!

धाराशिवच्या शेतकऱ्याची हीच सर्वात मोठी शोकांतिका आहे. पावसाची प्रतीक्षा केली तर तो येत नाही आणि आला तर अनेकदा कमी कालावधीत मोठ्या प्रमाणावर बरसतो. त्यामुळे पिकाला आवश्यक असलेला संतुलित पाऊस मिळण्याऐवजी कधी पाण्याअभावी पीक करपते, तर कधी अतिवृष्टीमुळे शेतातील माती आणि उभे पीक वाहून जाते. पाऊस पडतो; मात्र तो शेतकऱ्याच्या उपयोगी किती पडतो, हा खरा प्रश्न आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे, ते साठवणे आणि गरजेच्या वेळी शेतीसाठी उपलब्ध करून देणे यावर पुरेसे नियोजन झाले नाही, तर दरवर्षी दुष्काळाच्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे. 'पाणी पडते, पण टिकत नाही; टिकले तर शेतीला पुरेसे मिळत नाही,' ही ग्रामीण भागातील वस्तुस्थिती बदलणे गरजेचे आहे.

### दुष्काळात मदत नव्हे, कायमस्वरूपी आधार हवा..!

दुष्काळ आला की टँकर, चारा, अनुदान, पंचनामे आणि मदतीच्या घोषणा सुरू होतात. ही मदत संकटाच्या काळात शेतकऱ्यासाठी आवश्यक आहे; मात्र ती कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही. धाराशिवच्या शेतकऱ्याला दर दोन-तीन वर्षांनी दुष्काळी मदतीची गरज पडू नये, यासाठी पाण्याचे नियोजन करावे लागेल. शेततळी, बंधारे, जलसंधारण, नदी-नाला खोलीकरण, जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन, सूक्ष्म सिंचन आणि उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर यावर सातत्याने काम करणे आवश्यक आहे. दुष्काळाच्या वेळी मदत देण्यापेक्षा दुष्काळाच्या काळात शेतकरी अडचणीत येऊ नये, अशी व्यवस्था निर्माण करणे अधिक महत्त्वाचे आहे.

## 'वाशी तालुका दुष्काळातून वगळला'चे मेसेज चुकीचे

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१९ सप्टेंबर -**

मागील दोन महिन्यांपासून पावसाचा खंड पडल्याने वाशी तालुक्यात खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसाअभावी पिके करपून गेल्याने आगामी काळात चारा व पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, 'संपूर्ण धाराशिव जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर झाला असून वाशी तालुका वगळण्यात आला आहे', अशा आशयाचे मेसेज सोशल मीडियावर प्रसारित होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. याबाबत तालुका कृषी अधिकारी गणेश सूर्यवंशी यांनी हे मेसेज चुकीचे असल्याचे स्पष्ट केले.

वाशी तालुक्यात पावसाअभावी झालेल्या पिकांच्या नुकसानीचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन सूर्यवंशी यांनी केले आहे.

## तुळजापुरात सोमवारी शेतकरी आक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ सप्टेंबर -**

पावसाने दीड ते दोन महिन्यांपासून दडी मारल्याने तुळजापूर तालुक्यासह धाराशिव जिल्ह्यात दुष्काळाचे गंभीर सावट निर्माण झाले आहे. पावसाअभावी सोयाबीन, तूर, उडीद, मका, मूग, भाजीपाला व फळबागांचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी सोमवारी (दि. २१) तुळजापूर येथे शेतकरी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

नुकसानग्रस्त पिकांचे पंचनामे तातडीने सुरू करावेत, कापणी प्रयोग न करता सरसकट हेक्टरी एक लाख रुपये मदत द्यावी, पीकविमा भरलेल्या तसेच न भरलेल्या शेतकऱ्यांना १०० टक्के पीकविमा संरक्षण द्यावे आणि जनावरांसाठी चारा व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, या प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत.

मोर्चाला सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरुवात होऊन तहसील कार्यालयावर मोर्चा नेण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन तुळजापूर तालुका काँग्रेस कमिटीने केले आहे.

## लोकमान्य विद्यालयात व्यसनमुक्तीचा जागर; विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ




**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून आंदोरा येथील लोकमान्य विद्यालयात इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी व्यसनमुक्ती जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना तंबाखू, गुटखा, दारू तसेच अमली पदार्थांपासून दूर राहण्याची आणि निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करण्याची शपथ देण्यात आली.

येडाई व्यसनमुक्ती केंद्राचे संचालक डॉ. संदीप तांबारे हे कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे दुष्परिणाम समजावून सांगत व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे शपथ घेत समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्याचा संकल्प केला.

**येडाई व्यसनमुक्ती केंद्राचा प्रेरणादायी उपक्रम..**

कार्यक्रमाचे आयोजन स्वाती भातलवंडे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनांचे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम समजावून सांगितले. आजचा विद्यार्थीच उद्याचा जबाबदार नागरिक आहे. त्यामुळे व्यसनांपासून दूर राहून आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रयत्न करा, असा संदेश त्यांनी दिला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी सहकार्य केले. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला. 'व्यसनमुक्त विद्यार्थी, निरोगी समाज आणि सक्षम राष्ट्र' हा संदेश या माध्यमातून देण्यात आला.



## आ. रोहित पवार यांचा आज वाशी तालुका दौरा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१९ सप्टेंबर -**

पावसाने दीर्घ खंड दिल्याने वाशी तालुक्यात सोयाबीनसह खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार आज वाशी तालुका दौऱ्यावर आहेत.

दौऱ्यात ते जिल्हा परिषद गटातील विविध गावांना भेट देऊन नुकसानग्रस्त सोयाबीन पिकांची पाहणी करणार आहेत. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व नुकसानीची माहिती जाणून घेणार आहेत.

## रूपामाता विद्यालयाच्या गुणवंत क्रीडापटू व बुद्धिबळपटूंचा गौरव

### तालुकास्तरीय स्पर्धांत चमकदार कामगिरी; पाच विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ सप्टेंबर -**

पाडोळी (आ.) येथील रूपामाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून धाराशिव तालुकास्तरीय शालेय क्रीडा व बुद्धिबळ स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा रूपामाता उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष तथा संस्थेचे अध्यक्ष ॲड. व्यंकटराव विश्वनाथ गुंड यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा प्रकारांत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये श्रावणी राहुल राऊत, चैताली नानासाहेब चव्हाण आणि पृथ्वीराज रणजीत गुंड यांचा समावेश आहे. किरण बळीराम सगर, सगुना अंकुश टिपे, चैताली नानासाहेब चव्हाण आणि ओमकार उत्तरेश्वर सोनटक्के यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तसेच संध्या राहुल राठोड, तनुजा युवराज गुंड, प्रथमेश शरद गुंड, सुजाता सुनील चव्हाण, पुनम धनराज गाते, सुप्रिया अनिल चव्हाण, विद्या राहुल राठोड, मनीषा युवराज गुंड, सायली गोविंद पवार आणि किरण बळीराम सगर यांनी विविध क्रीडा प्रकारांत तृतीय क्रमांक मिळवला.

तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेतही विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. सायली भागवत सूर्यवंशी हिने प्रथम, सृष्टी विजयकुमार ढोरमारे हिने तृतीय, सुजाता सतीश शिंदे हिने चौथा, तर पुष्कराज प्रदीप गुंड व स्नेहा दत्ता पवार यांनी पाचवा क्रमांक मिळवला. या पाचही विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

कार्यक्रमात सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना आगामी जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व संघर्षाचे स्मरण करण्यात आले. शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही विद्यालयाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या विद्यार्थ्यांचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

कार्यक्रमास हभप. बाबुराव पुजारी, सेवानिवृत्त शिक्षक पांडुरंग फावडे, ॲड. शरद गुंड पाटील, गजानन पाटील, नानासाहेब चव्हाण, बळीराम सगर, कालिदास बोचरे, मुख्याध्यापक सुरेश मनसुळे, राजेंद्र सूर्यवंशी यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन शेख बी.एम. यांनी केले.

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## खासदार डॉ. काळगे, यांच्याकडून दुष्काळी परिस्थितीची पाहणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : लातूर जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस अत्यंत गंभीर बनत चालली असून पावसाअभावी खरीप पिके करपून पूर्णपणे वाया गेली आहेत. या भीषण संकटाच्या पार्श्र्वभूमीवर, राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेनुसार लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे आणि लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके यांनी देवणी तालुक्यातील लासोना येथे थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वाळलेल्या सोयाबीन पिकांची पाहणी केली. यावेळी दोन्ही नेत्यांनी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि शेतकऱ्यांना धीर दिला.

पाहणीदरम्यान स्थानिक शेतकरी शिवाजी भोरे यांच्या शेतातील सोयाबीनच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. पेरणीनंतर तब्बल ५० ते ५५ दिवसांपेक्षा अधिक काळ पावसाचा खंड पडल्याने पिकांची वाढ खुंटली असून सोयाबीनच्या शेंगांमध्ये दाणे भरलेले नाहीत, झाडे पार करपून गेली आहेत. प्रति एकर सुमारे ३५ हजार रुपये खर्च करूनही हातात काहीच पडणार नाही अशी विदारक स्थिती निर्माण झाली असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. त्यातच मागील नुकसानीची मदत आणि विमा भरपाई अद्याप मिळाली नसताना आता नव्याने ओढवलेल्या दुष्काळामुळे शेतकरी आणि शेतमजूर आर्थिकदृष्ट्या पूर्णपणे उद्धवस्त झाला आहे, असा संतापही शेतकऱ्यांनी व्यक्त केला.



# विविध वृत्त.....

## कार्यभार घेतल्यापासून मुरूड ठाण्यांतर्गत अवैध दारूविक्रीचे ९५ गुन्हे दाखल : अंधारे

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : मुरुड येथे ४ जून २०२६ रोजी कार्यभार स्वीकारल्यानंतर ऑगस्ट २०२६ अखेरपर्यंत अवैध दारूविक्रीप्रकरणी ९५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तसेच अवैध मटका व जुगारप्रकरणी १८ कारवाया करण्यात आल्या आहेत. मुरुडमधील अंधारे आडनाव असलेल्यांच्या विरोधातही कारवाई केली असून माझ्यावर केलेले आरोप चुकीचे आहेत, असे सहायक पोलिस निरिक्षक सुनील अंधारे यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. मुरुड शहरात अंधारे आडनावाचे अनेक नागरिक वास्तव्यास आहेत. मात्र त्यापैकी एकही व्यक्ती माझी नातेवाईक नाही, असे अंधारे यांनी स्पष्ट केले. शिवसेनेच्या निवेदनाच्या माध्यमातून आपण मुरुड शहरात आल्यानंतर येथील अंधारे कुटुंबीय आपले पाहुणे असल्यामुळे त्यांच्या माध्यमातून अवैध धंदे सुरू असल्याचा आरोप चुकीचा आहे.

## लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये मुक्तिसंग्राम दिन साजरा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये ७८ वा मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

## तीनशे सायबर पुस्तकांचा विद्यार्थ्यांना वाटप; ऑर्चर्ड एज्युकेशनल अकॅडमीत सायबर सुरक्षा जनजागृती

तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १९ सप्टेंबर : विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षा, डिजिटल सुरक्षितता आणि ऑनलाइन फसवणुकीबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने जीलहरीव एर्वीलरींळेपरश्र -लरवशा, छळश्ररपसर येथे विशेष सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. अत्यंत सर्जनशील वातावरण असलेल्या या शाळेतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, बुद्धिमत्ता आणि संवादात्मक प्रतिसादामुळे हे सत्र विशेष प्रभावी ठरले.

QUICK HEAL FOUNDATION आणि RAJRISHI SHAHU MAHAVIDYALAYA यांच्या माध्यमातून जाधव साहिल आणि कृष्णा पांढरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेच्या विविध महत्त्वपूर्ण विषयांवर माहिती दिली. ऑनलाइन फसवणूक, जढझ, पासवर्ड सुरक्षा, बनावट लिंक, सोशल मीडिया सुरक्षितता, डिजिटल पेमेंट, वैयक्तिक माहितीचे संरक्षण आणि सायबर गुन्ह्यांपासून बचाव याबाबत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले.

संपूर्ण सत्रादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत प्रश्र्न विचारले तसेच सायबर सुरक्षेबाबत आपली मते मांडली. विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग आणि सत्रानंतर मिळालेला सकारात्मक अभिप्राय यामुळे आयोजकांनीही समाधान व्यक्त केले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सुमारे ३०० सायबर सुरक्षा पुस्तिकांचे वाटप करण्यात आले. या पुस्तिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेची माहिती भविष्यातही सहज उपलब्ध व्हावी आणि ती आपल्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचवता यावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

ऑर्चर्ड एज्युकेशनल अकॅडमीच्या शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, शाळेचे सकारात्मक वातावरण आणि मिळालेला प्रभावी अभिप्राय यामुळे सायबर सुरक्षिततेचा संदेश अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दिशेने हे सत्र एक यशस्वी पाऊल ठरले.

# सहकार मंत्र्यांसह लातूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेचे ८ संचालक अपात्र

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १९ सप्टेंबर : बँकिंग नियमन कायद्यानुसार, सहकारी बँकांच्या संचालक मंडळावर कोणताही सदस्य सलग १० वर्षांपेक्षा जास्त काळ राहू शकत नाही. या नव्या नियमानुसार दीर्घ काळापासून लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संचालक म्हणून कार्यरत असलेल्या आठ संचालकांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने अपात्र ठरवण्याचा निर्णय घेतला आहे. आरबीआयने अपात्र ठरवलेल्याया संचालकांमध्ये राज्याचे विद्यमान सहकारमंत्रीबाबासाहेब पाटील यांचाहीसमावेश आहे. लातूर जिल्हा मध्यवर्ती सह. बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम आता कोणत्याही क्षणी घोषित होण्याची शक्यता आहे. तत्पूर्वीच या कारवाईने सहकार क्षेत्रात खळबळ उडाली आहे.लातूर जिल्हा मध्य. सह. बँकेचे माजी कर्मचारी सतीश शेषेराव जाधव यांनी या संचालकांच्या दीर्घ कार्यकाळाविरोधातविभागीय सहनिबंधकांकडेतक्रार केली होती. सहनिबंधकांकडूनतक्रारीचे व्यवस्थित निवारण न झाल्यानेत्यांनी दि. २५ मे २०२६ रोजी थेट आरबीआयकडे तक्रार केली होती.याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) खंडपीठाने आरबीआयला या तक्रारीवर तातडीने कायद्यानुसार निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आरबीआयने ही धडक कारवाई केली आहे. अपात्र ठरविण्यात आलेल्या आठ संचालकांमध्ये सहकार मंत्री बाबासाहेब पाटील,

अशोकराव पाटील निलंगेकर,श्रीपतराव काकडे,स्वयंप्रभा पाटील,व्यंकटराव बिरादार,पृथ्वीराज शिरसाट,नागोराव आर. पाटील वप्रमोद जाधव यांचा समावेश आहे. रिझर्व्ह बँकेच्या या अपात्रतेच्या निर्णयाबद्दल राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी तात्काळ प्रतिक्रिया देण्यास नकार देऊन योग्यवेळी प्रतिक्रिया देऊ असे सांगितले. रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांच्या संचालकांसाठी लागू केलेल्या सलग १० वर्षांच्या कार्यकाळाच्या

आणि ३ वर्षांच्या 'कूलिंग-ऑफ कालावधी'नियमाची कायदेशीर माहिती लागू केली आहे.२५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांनुसार सहकारी बँकांच्या संचालक मंडळाच्या रचनेत पारदर्शकता आणण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.



बँकिंग नियमन कायदा, १९४९ मधील तरतुदींनुसार, कोणताही संचालक (अध्यक्ष आणि पूर्णवेळ संचालक वगळून) कोणत्याही सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर सलग १० वर्षांपेक्षा जास्त काळ पदावर राहू शकत नाही.जर एखाद्या संचालकाने सलग १० वर्षे पूर्ण केली असतील, तर त्याला त्याच बँकेत पुन्हा संचालक म्हणून निवडून येण्यासाठी किंवा नामनिर्देशित होण्यासाठी किमान ३ वर्षांचा 'कूलिंग-ऑफ' (ब्रेक) कालावधी पूर्ण करणे बंधनकारक आहे.या ३ वर्षांच्या कूलिंग-ऑफ कालावधीत ती व्यक्ती संबंधित सहकारी बँकेत एक सामान्य सभासद किंवा ग्राहक या व्यतिरिक्त इतर कोणत्याही पदावर किंवा क्षमतेने काम करू शकत नाही. बँकेच्या कोणत्याही अंतर्गत व्यवहारात किंवा प्रशासनात त्यांचा हस्तक्षेप चालणार नाही.हा नियम 'बँक-स्पेसिफिक' (विशिष्ट बँकेपुरता) आहे. म्हणजेच, ३ वर्षांच्या कूलिंग-ऑफ काळात ती व्यक्ती इतर नियमांच्या अधीन राहून दुसऱ्या कोणत्याही सहकारी बँकेत संचालक म्हणून नियुक्त होण्यास पात्र असते.लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाचा कार्यकाळ संपण्यास अगदी थोडासा अवधी असून कोणत्याही क्षणी आता निवडणूक कार्यक्रम घोषित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तत्पूर्वीच आरबीआयच्या या निर्णयाने अपात्र संचालकांसमवेतसर्वचसंचालकांना



धक्का बसला आहे. त्यामुळे निवडणुकीसाठी पॅनल उभा करताना आता नेत्यांना नवीन चेहरे शोधावे लागणार आहेत. कोणत्याही परिस्थितीत आता या आठ संचालकांना किमान तीन वर्ष तरी जिल्हा बँकेचे दरवाजे बंद होणार आहेत. जिल्हा बँकेवर मागच्या अनेक वर्षांपासून सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे वर्चस्व राहिले आहे. विरोधकांनी ही बँक ताब्यात घेण्याचे खूप प्रयत्न केले. मात्र, त्यात आजपर्यंतकोणालाही यश आले नाही. या निवडणुकीत भाजप नेते नेमकी कोणती भूमिका घेतात यावरही या निवडणुकीचेभवितव्य अवलंबून आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेचे विद्यमान आमदार बसवराज पाटील मुरूमकर याबाबतीत कोणता निर्णय घेतात याकडेही सगळ्यांचे लक्ष लागून आहे. अपात्र ठरविण्यात आलेले संचालक बाबासाहेब पाटील हे महायुती सरकारमधील एका घटक पक्षाचे नेते आहेत. त्यामुळे त्यांना जरी यावेळची निवडणूक लढवता येत नसली तरी ते आपला एखादा उमेदवार निश्र्चित देऊ शकतात. अशावेळी महायुती जर स्वतंत्र पॅनल ठेवणार असेल तर बाबासाहेब पाटील यांचा उमेदवार महायुतीच्या पॅनलकडून मैदानात उतरणार कीबँकेवर पूर्वीपासून सत्तास्थानी असलेल्या देशमुख प्रणित पॅनलकडूनउतरणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आपले आरोग्य – आपलीच जबाबदारी फाउंडेशन तर्फे डॉ. राजेश दरडे यांचा सन्मान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे सदस्य म्हणून डॉ. राजेश दरडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल आपले आरोग्य - आपलीच जबाबदारी फाउंडेशनच्या वतीने त्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.



महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने १५ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या राजपत्रातील अधिसूचनेद्वारे डॉ. राजेश दरडे यांची महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवर सदस्य म्हणून नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

याच पार्श्र्वभूमीवर आपले आरोग्य - आपलीच जबाबदारी फाउंडेशन व सप्तफेरे मेट्रोमनी यांच्या वतीने आयोजित गणपती आरती कार्यक्रमात डॉ. राजेश दरडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी गणरायाची आरती करून डॉ. दरडे यांचे अभिनंदन केले.

यावेळी 'आपले आरोग्य - आपलीच जबाबदारी फाउंडेशन'च्या 'एक व्यक्ती - सहा संकल्प' या सामाजिक उपक्रमाचेही खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी विशेष कौतुक केले. 'उज्ज्वल भविष्य घडवूया' या संकल्पनेतून रसायनमुक्त शेती, व्यसनमुक्त जीवन, पर्यावरण संरक्षण, कापडी पिशवीचा वापर, दररोज एक तास व्यायाम आणि दरवर्षी पाच झाडांची लागवड हे सहा संकल्प समाजातील प्रत्येक व्यक्तीने स्वीकारावेत, असा संदेश फाउंडेशनच्या माध्यमातून दिला जात आहे. या उपक्रमातून आरोग्य, पर्यावरण आणि सामाजिक जबाबदारीबाबत जनजागृती करण्याच्या कार्याचे खासदारांनी कौतुक केले.

## संगीता महाजन यांना 'उत्कृष्ट प्राध्यापक पुरस्कार'

### दयानंद शिक्षण संस्थेतर्फे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त गौरव



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : दयानंद शिक्षण संस्था, लातूर यांच्या वतीने दयानंद विधी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला 'ग्रंथमंदिरम्'चे स्वरूप देत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीत मोलाची भूमिका बजावणाऱ्या डॉ. संगीता अजय महाजन यांना *उत्कृष्ट प्राध्यापक पुरस्कार - २०२५-२६'* प्रदान करून सन्मानित करण्यात आले. १७ सप्टेंबर रोजी 'मराठवाडा मुक्तिसंग्राम दिना'निमित्त आयोजित हृदयस्पर्शी समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संस्था अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी संस्था सचिव रमेश बियाणी यांसह मान्यवरांची उपस्थिती होती. गेल्या तीन दशकांपासून ज्ञानसेवेत कार्यरत असलेल्या डॉ. महाजन यांनी ग्रंथालयाला केवळ पुस्तके उपलब्ध करून देणारे ठिकाण न ठेवता, विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, शिस्त आणि मार्गदर्शनाचे केंद्र बनविण्यात योगदान दिले आहे. कामकाजातील शिस्त, समान न्यायाचा दृष्टिकोन आणि उत्तम प्रशासकीय नियोजन ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये आहेत. विशेषतः नवीन विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेदरम्यान आपुलकीने व पालकाच्या मायेने केलेले मार्गदर्शन अनेक विद्यार्थ्यांसाठी आधार ठरले आहे. कुटुंबातील जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळत व्यावसायिक क्षेत्रात निष्ठा, शिस्त आणि समर्पणाने केलेल्या त्यांच्या तीन दशकांच्या कर्तव्यनिष्ठ ज्ञानसेवेचा गौरव म्हणून या पुरस्काराकडे पाहिले जात आहे. या सन्मानाबद्दल डॉ. संगीता महाजन यांचे सहकारी, विद्यार्थी, मित्रपरिवार आणि हितचिंतकांसह सर्व स्तरांतून मनःपूर्वक अभिनंदन होत आहे.

## डॉ.संजय गवई यांचा सोलापूर विद्यापीठात सत्कार

तभा वृत्तसेवा

लातूर दि.१९ सप्टेंबर : महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील डॉ.संजय गवई यांची महाराष्ट्र शासन, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्याद्वारे समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विस्तारासाठी वार्षिक सम्यक योजना निर्मिती निकष समिती सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील संशोधन केंद्रीय प्रवेश समितीद्वारे सत्कार करण्यात आला.



यावेळी मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई येथील प्रोफेसर तथा संशोधन केंद्रीय संशोधन प्रवेश समितीचे अध्यक्ष डॉ.नजीर शेख, डिपार्टमेंट ऑफ सोशल वर्क, सेंट्रल यूनिवर्सिटी ऑफ कर्नाटक येथील डॉ.पवित्रा आलूर, सोलापूर विद्यापीठ समाजकार्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप जगदाळे, वालचंद समाजकार्य महाविद्यालय, सोलापूर येथील विभाग प्रमुख डॉ.विजया महाजन, संशोधक मार्गदर्शक डॉ.अभय जाधव, डॉ.जितेंद्र गांधी आणि संशोधक विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

या समितीच्या दोन ऑन लाईन आणि दि.०९ व १० सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास प्रबोधनी, पुणे येथील कॉन्फरन्स हॉलमध्ये महाराष्ट्रात समाजकार्य अभ्यासक्रमांच्या विस्तारासाठी वार्षिक सम्यक योजना तयार करण्यासाठी निकष ठरवण्याबाबत राज्यस्तरीय समितीची बैठक स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू तथा समिती अध्यक्ष डॉ.मनोहर चासकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ.शैलेंद्र देवनाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली बैठका संपन्न झाल्या.

या बैठकीला कर्वे समाजसेवा संस्था, पुणे येथील संचालक तथा समिती सदस्य सचिव डॉ.महेश ठाकूर, सदस्य यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथील माजी कुलसचिव डॉ.दिलीप भरड, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील वरिष्ठ कायदा अधिकारी डॉ.परविन सय्यद, फुले-आंबेडकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली येथील प्रभारी संचालक डॉ.रुपेंद्र कुमार गौर आणि टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई येथील अधिष्ठाता डॉ. बिपिन जोजो यांची उपस्थिती होती.

या तीनही बैठकांमध्ये महाराष्ट्रातील शैक्षणिक वर्ष २०२७-२८ पासून समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विस्तारासाठी वार्षिक सम्यक योजना निकष, विद्यमान महाविद्यालयांना बीएसडब्ल्यू/एमएसडब्ल्यू अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त तुकडीस मान्यता देण्याकरिता प्रस्तावित सूक्ष्मदर्शी निकष अ, ब, क आणि ड यावर सविस्तर चर्चा होऊन यासंबंधीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालक, पुणे यांच्याकडे लवकरच सादर केला जाणार आहे. या बैठकीला सदस्य सचिव, सर्व सदस्य आणि संचालक कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते. अशी माहिती समिती सदस्य डॉ.संजय गवई यांनी दिली.

## लातूरमधील पाणीटंचाई मानवनिर्मित; साखर कारखान्यांमुळे लातूरकरांचे जगणे मुश्कील : दयानंद पाटील

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १९ सप्टेंबर : लातूर जिल्हा आणि शहरात सध्या निर्माण झालेली तीव्र पाणीटंचाई ही केवळ नैसर्गिक नसून पूर्णपणे मानवनिर्मित आहे, असा थेट आरोप शिवा लिंगायत युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद पाटील यांनी केला आहे. प्रशासनाकडून पाणी बचतीचे केवळ नाटक केले जात असून, टंचाईचे मुख्य कारण असलेल्या साखर कारखान्यांवर कारवाई करण्याचे धाडस अधिकारी दाखवत नसल्याने लातूरकरांमध्ये तीव्र संताप असून आगामी काळात याचा मोठा उद्रेक होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे.



कृषी तज्ज्ञ आणि 'साउथ एशिया नेटवर्क ऑन डॅम्स, रिव्हर्स अँड पिपल' सारख्या संस्थांच्या अभ्यासाचा हवाला देत दयानंद पाटील म्हणाले की, १ किलो साखर तयार करण्यासाठी सुमारे २,५०० लीटर पाण्याची आवश्यकता असते. लातूरसारख्या कायम दुष्काळी भागात हजारो हेक्टरवर उसाची लागवड केली जात असल्याने भूजल पातळी कमालीची खालावली आहे. सद्यस्थितीत सामान्य नागरिकांना १५-१५ दिवस पिण्याचे पाणी मिळत नसतानाही, राजकीय वरदहस्त असलेल्या कारखान्यांकडून धरणांच्या मृत साठ्यातून ) थेट जॅकवेलद्वारे पाणी उपसा सुरू असल्याचा आरोप पाटील यांनी केला आहे.

या जलसंकटावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी शिवा लिंगायत युवक संघटनेने पुढील मागण्यांवर भर दिला आहे: उसासाठी ठिबक सिंचन पूर्णपणे बंधनकारक करावे, ज्यामुळे ५०% ते ६०% पाण्याची बचत होईल. तीव्र टंचाई असलेल्या क्षेत्रांमध्ये नवीन साखर कारखान्यांना मंजुरी देऊ नये. शेतकऱ्यांना उसाऐवजी कमी पाण्यात येणाऱ्या तेलबिया, कडधान्ये व फळबागा यांसारख्या पर्यायी पिकांकडे वळवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे.लातूरकरांच्या हक्काचे पाणी साखर कारखान्यांना दिले जात असल्यामुळे जनतेमधील असंतोष शिगेला पोहोचला असून, प्रशासनाने तातडीने कठोर पावले न उचलल्यास नाईलाजाने शिवा लिंगायत युवक संघटनेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दयानंद पाटील यांनी दिला आहे.

### प्रशासकीय कारवाई केवळ कागदावर?

जिल्हा प्रशासनाने पाण्याची अवैध उचल रोखण्यासाठी संयुक्त गस्त घालणे, खाजगी विहिरींचे संपादन करणे आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा करणे यांसारख्या आपत्कालीन उपाययोजना सुरू केल्या आहेत. मात्र, मूळ समस्येला हात न लावता केवळ सामान्य जनतेवर निर्बंध लादले जात आहेत. सत्ता दिली याचा अर्थ असा नाही की आमचे जगणे मुश्कील करावे. तीव्र टंचाईच्या काळातही साखर कारखाने बंद करण्याचे आदेश काढण्याची ताकद सध्याच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये नाही, अशी घणाघाती टीका दयानंद पाटील यांनी केली.